सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर बुधवार, दि. ०६ ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १२५ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तारीख ठरली

मुंबई : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत अखेर मोठा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य निवडणूक आयोगाने महत्त्वाची घोषणा करत ग्रामीण भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. यात नगरपंचायती, नगरपरिषद, जिल्हा परिषद, पंचायत समित्या या सर्वच प्रकारच्या संस्थांचा समावेश आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका दिवाळीनंतर म्हणजेच डिसेंबर-जानेवारीमध्ये होणार आहेत असं राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली आहे.

नव्या प्रभाग रचनेनुसार होणार निवडणुका, व्हीव्हीपॅट मशीन नसेल वापरात

राज्यात दिवाळीनंतर होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत राज्य निवडणूक आयोगाने महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. यंदाच्या निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅट (ततझ-ढ) मशीनचा वापर केला जाणार नाही, अशी स्पष्ट माहिती आयोगाने दिली आहे. यासोबतच या निवडणुका टप्प्याटप्प्याने पार पाडण्यात येणार आहेत, असेही सांगण्यात आले. महत्त्वाचे म्हणजे, नवीन प्रभाग रचनेनुसार आणि ओबीसी आरक्षणासह या निवडणुका घेण्यास अधिकृत मंजुरी मिळाली आहे. सोमवारी यासंदर्भातील परवानगी राज्य निवडणूक आयोगाला मिळाली. यापूर्वी नव्या प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या काही याचिका सुप्रीम कोर्टात दाखल करण्यात आल्या होत्या, मात्र सर्वोच्च न्यायालयाने त्या याचिका फेटाळून लावल्या, त्यामुळे या निवडणुकांचा मार्ग आता मोकळा झाला आहे. राज्यातील अनेक महत्त्वाच्या महापालिकांमध्ये मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक नव्या प्रभाग रचनेनुसार बदल करण्यात आले होते. हे बदल आता वैध ठरले असून त्याच पद्धतीने आणि ओबीसी आरक्षण लागू करूनच निवडणुका घेतल्या जाणार आहेत. ही निवडणूक प्रक्रिया केवळ राजकीय पक्षांसाठी नव्हे, तर स्थानिक स्तरावर काम करणाऱ्या नेतृत्वासाठीही अत्यंत निर्णायक ठरणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार पारदर्शक आणि सर्वसमावेशक करण्याच्या दृष्टीने ही निवडणूक पायाभूत ठरणार आहे.

मुंबईमध्ये जुन्याच प्रभागानुसार निवडणुका होणार

मुंबईतील महापालिका निवडणुकीसंदर्भात मोठा निर्णय घेण्यात आला आहे. या निवडणुका जुन्याच प्रभाग रचनेनुसार, म्हणजेच २२७ एकसदस्यीय प्रभागांनुसार पार पडणार आहेत. मुंबई महानगरपालिकेतील प्रभागांची संख्या पूर्वीही २२७ इतकीच होती, मात्र महाविकास आघाडी सरकारच्या काळात या प्रभागांमध्ये वाढ करून २३६ प्रभागांची नव्याने रचना करण्यात आली होती. मात्र नंतर राज्यात महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर, या निर्णयावर पुनर्विचार करण्यात आला आणि पुन्हा एकदा २२७ प्रभागांवरच अंतिम शिक्कामोर्तब करण्यात आले. या नवीन निर्णयाला आव्हान देत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती, मात्र सुप्रीम कोर्टाने ती याचिका फेटाळून लावल्यामुळे, मुंबईतील महापालिका निवडणुका आता पूर्वीप्रमाणे २२७ प्रभागांमध्येच होणार हे निश्चित झाले आहे. दरम्यान, मुंबई वगळता इतर प्रमुख शहरांमधील महापालिकांमध्ये जसे की पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, नवी मुंबई, पिंपरी चिंचवड, छत्रपती संभाजीनगर चार सदस्यीय प्रभाग रचना लागू राहणार आहे. त्यामुळे मुंबईत जरी जुनी प्रभागरचना कायम ठेवण्यात आली असली, तरी इतर ठिकाणी नव्या चौकटीत निवडणुका होणार आहेत. हा निर्णय मुंबईतील राजकीय समीकरणांवर आणि निवडणूक रणनीतीवर मोठा परिणाम करणारा ठरणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाने अलीकडेच राज्यातील विविध महानगरपालिकांमध्ये प्रभाग रचनेसंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. 'अ', 'ब' आणि 'क' वर्गातील महानगरपालिकांमध्ये आता चार सदस्यीय प्रभाग रचना लागू करण्यात येणार आहे. या आदेशानुसार, या महापालिकांमध्ये निवडणुका एकाच प्रभागातून चार नगरसेवक निवडण्याच्या पद्धतीने पार पडणार आहेत.

## अमित शहांनी लालकृष्ण अडवाणींचा विक्रम मोडला! भूषविले सर्वाधिक काळ गृहमंत्रीपद

नवी दिल्ली: केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नावे एक विक्रम प्रस्थापित झाला आहे. सर्वाधिक काळ देशाचे गृहमंत्रीपद भूषविण्यच्या विक्रमाची शाह यांच्या नावे नोंद झाली आहे. त्यांनी भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांचा सर्वाधिक काळ गृहमंत्री म्हणून विक्रम मोडला आहे. याच पार्श्वभूमीवर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमित शाहांचे कौतुक केले आहे.



मोदी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळात ३० मे २०१९ रोजी शहा यांनी गृहमंत्री म्हणून पदभार स्वीकारला. शहा यांनी गृहमंत्री म्हणून त्यांचा पहिला कार्यकाळ ९ जून २०२४ रोजी पूर्ण केला. १० जून २०२४ रोजी ते पुन्हा गृहमंत्री झाले आणि तेव्हापासून ते या पदावर आहेत. माजी गृहमंत्री लालकृष्ण अडवाणी यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीत १९ मार्च १९९८ ते २२ मे २००४ पर्यंत एकूण २ हजार २५६ दिवस गृहमंत्रीपद भुषवले. अडवाणींनंतर काँग्रेस नेते गोविंद वल्लभ पंत हे सर्वाधिक काळ गृहमंत्री राहिलेले तिसरे आहेत. सरदार वल्लभभाई पटेल हे १ हजार २१८ दिवस देशाचे गृहमंत्री राहिले. योगायोगाने, शहा यांनी ५ ऑगस्ट रोजी सर्वात जास्त काळ गृहमंत्री राहण्याचा पराक्रम केला. गृहमंत्रालया व्यतिरिक्त अमित शाह देशाचे पहिले सहकार मंत्री देखील आहेत. यापूर्वी शहा भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि गुजरातचे गृहमंत्री राहिले आहेत. अमित शाह यांनी त्यांच्या कार्यकाळात अनेक मोठे निर्णय घेतले.

शाह यांनी २०१९ मध्ये याच दिवशी त्यांनी संसदेत जम्मू आणि काश्मीरमधून कलम ३७० रद्द करण्याची घोषणा केली. त्यानंतर जम्मू आणि काश्मीरचा विशेष दर्जा संपुष्टात आला,ज्याला आज सहा वर्षे पूर्ण झाली आहेत. शिवाय, नागरिकत्व सुधारणा कायदा मंजूर करण्यात आला. त्याच वेळी, समान नागरी संहिता देखील लागू करण्यात आली. शिवाय, त्यांनी तिहेरी तलाकबाबत मोठा निर्णय घेतला आणि तो बेकायदेशीर घोषित केला. यासोबतच त्यांनी दहशतवादाविरुद्ध कठोर कारवाई केली.एनडीए खासदारांसोबत झालेल्या बैठकीदरम्यान पंतप्रधान मोदींनी गृहमंत्री अमित शहा यांचेही कौतुक केले.

## जम्मू काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचे निधन

नवी दिल्ली: जम्मू काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांचे मंगळवारी दिल्लीतील राम मनोहर लोहिया रुग्णालयात दीर्घ आजाराने निधन झाले. ते बऱ्याच काळापासून मूत्रपिंडाच्या आजाराने ग्रस्त होते. दिल्लीतील आरएम रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते, अखेर आज त्यांची प्राणज्योत मालवली. ते ७९ वर्षांचे होते.



सत्यपाल मलिक यांनी गोवा, मेघालय, ओडिशा आणि जम्मू काश्मीरचे राज्यपाल म्हणून कार्यभार सांभाळला आहे. त्यांच्या निधनाने राजकीय वर्तुळातून शोक व्यक्त होत आहे.

सत्यपाल मालीक यांचा राजकीय प्रवास

सत्यपाल मलिक यांचा प्रवास सपामधून सुरु झाला होता, ते काही काळ भाजपमध्येही कार्यरत होते. मात्र, अनेकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर थेट टीका केल्याने त्यांच्याकडे देशभरातील राजकीय नेत्यांचे लक्ष लागले होते. सत्यपाल मलिक हे ऑगस्ट २०१८ ते ऑक्टोबर २०१९ पर्यंत जम्मू काश्मीर राज्याचे शेवटचे राज्यपाल होते. त्यांच्या कार्यकाळात ५ ऑगस्ट २०१९ रोजी कलम ३७० रद्द करण्यात आले आणि जम्मू आणि काश्मीरचा विशेष दर्जा रद्द करण्यात आला आणि त्याचे जम्मू आणि काश्मीर आणि लडाख या दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभाजन करण्यात आले. योगायोगाने, आज या निर्णयाचा सहावा वर्धापन दिन आहे आणि याच दिवशी सत्यपाल मलिक यांनी अखेरचा श्वास घेतला. ते ऑक्टोबर २०१७ ते ऑगस्ट २०१८ पर्यंत बिहारचे राज्यपाल होते. २१ मार्च २०१८ ते २८ मे २०१८ पर्यंत त्यांना ओडिशाचे राज्यपाल म्हणून अतिरिक्त कार्यभारही देण्यात आला. जम्मू आणि काश्मीरचे दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभाजन झाल्यानंतर, सत्यपाल मलिक यांची गोव्याचे १८ वे राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी ऑक्टोबर २०२२ पर्यंत मेघालयाचे २१ वे राज्यपाल म्हणूनही काम पाहिले.

## उत्तरकाशीच्या धारलीमध्ये ढगफुटी, वाहत आले हजारो टन पाणी

### चार जणांचा मृत्यू, अनेक लोक ढिगाऱ्यात गाडले गेल्याची भिती

उत्तरकाशी: उत्तरकाशीमध्ये झालेल्या ढगफुटीमुळे सर्वत्र हाहाकार पसरला आहे. येथील धारली गावात आलेल्या अतिवृष्टीमुळे एक नाला ओसंडून वाहू लागला. ज्यांचे पाणी डोंगरावरून अतिशय वेगाने खाली वाहत आले, या पाण्यासोबत भरपूर कचरा असेच गाळ देखील वाहून आल्यामुळे लोकवस्तीची प्रचंड हानी झाली आहे. पाण्याचा प्रवाह जोरदार असल्यामुळे अनेक घरं वाहून गेली असून, या नैसर्गिक आपत्तीमध्ये आतापर्यंत ४ जणांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे, तर अनेकजण ढिगाऱ्यात गाडले गेल्याची भीती वर्तवण्यात येत आहे.

गंगोत्री धाम आणि मुखवा जवळील धारली गावात मंगळवारी अचानक झालेल्या ढगफुटीमुळे तेथील एक नाला ओसंडून वाहू लागला. या नाल्याचे पाणी



डोंगरावरून सखल भागात खूप वेगाने वाहत आले, ज्यामुळे अनेक घरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहेत. ही घटना अतिशय गंभीर आहे आणि त्यामुळे स्थानिक लोक चिंतेत आहेत. नाल्याच्या पाण्यासोबत कचरा आणि गाळदेखील आला आहे, ज्यामध्ये अनेक लोक गाडले जाण्याची भीती आहे. प्रभावित क्षेत्र गंगोत्री धाम जवळ आहे.

ढगफुटीनंतर नाल्यात पाणी भरून वाहू लागल्याने संपूर्ण परिसरात घबराट पसरली होती, आता परिसरात मदत आणि बचाव कार्यालय सुरुवात झाली आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाने अपघाताची पुष्टी केली आहे आणि परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात असल्याचे सांगितले आहे.

मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी म्हणाले, 'धाराली (उत्तरकाशी) परिसरात ढगफुटीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे वृत्त अत्यंत दुःखद आणि वेदनादायक आहे. एसडीआरएफ, एनडीआरएफ, जिल्हा प्रशासन आणि इतर संबंधित पथके मदत आणि बचाव कार्यासाठी युद्धपातळीवर कार्यरत आहेत.'

लोकांना सतर्क राहण्याचा सल्ला

धाराली गावात ढगफुटीमुळे प्रचंड नुकसान झाले आहे प्रशासनाने लोकांना सतर्क राहण्याचा सल्लाही दिला आहे. प्रशासनाने सांगितले की हर्षिल परिसरातील खिर गडच्या पाण्याची पातळी वाढत असल्याने धाराली शहरात मोठे नुकसान झाले आहे.

या घटनेची माहिती मिळताच पोलीस, एसडीआरएफ, महसूल, सैन्य आणि आपत्ती पथके घटनास्थळी मदत आणि बचाव कार्यात गुंतली आहेत. प्रशासनाने लोकांना नदीपासून अंतर राखण्याचे आवाहन केले आहे आणि लोकांना सुरक्षित ठिकाणी जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

ढगफुटीच्या या घटनेनंतर, गंगोत्री धामचा जिल्हा मुख्यालयाशी असलेला संपर्क पूर्णपणे तुटला आहे. धारली येथे वाढत्या पाण्याच्या पातळीमुळे बाजारपेठ आणि घरांचे बरेच नुकसान झाले आहे. उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशसारख्या डोंगराळ राज्यांमध्ये सतत मुसळधार पाऊस आणि ढगफुटी होत आहेत. या अपघातांमध्ये अनेक लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे आणि अनेक घरांचेही मोठे नुकसान झाले आहे.

## मराठी सिनेमाचे अतिरिक्त शोज मल्टीप्लेक्समध्ये लागणार! शासनाचा सर्वात मोठा निर्णय

मुंबई: मराठी सिनेमांना मल्टीप्लेक्समध्ये अतिरिक्त शोज मिळवून देण्यासाठी सरकारने कायमस्वरूपी तोडगा काढण्याचा विचार केला आहे. त्यासाठी शासन स्तरावर एक स्पेशल कमिटी स्थापन केली जाणार आहे. सरकारने याबाबत मल्टीप्लेक्स आणि थिएटर मालकांसोबत बैठक घेऊन यावर तोडगा काढण्यासाठी समिती नेमली आहे. या समितीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार येत्या दीड महिन्यात शासनाला अहवाल सादर करायचा आहे.

सध्या मराठी सिनेमांना थिएटर मिळत नसल्यामुळे मोठा वाद सुरु आहे. अनेक हिंदी सिनेमे प्रदर्शित झाल्यानंतर मराठी चित्रपट मल्टीप्लेक्समधून हटवण्यात आल्याच्या घटना घडत आहेत. यावर काही राजकीय पक्षांनी आपला आवाज उठवला होता. याच पार्श्वभूमीवर, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात ही बैठक पार पडली आहे. ज्यात मराठी सिनेमांसाठी एक विशेष समिती स्थापन केली गेली आहे. या समितीने दीड महिन्यात शासनाला अहवाल सादर करावा, मराठी सिनेमा जगला पाहिजे अशी राज्य शासनाची भुमिका असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

मराठी सिनेमांना मल्टिप्लेक्स मध्ये मिळणाऱ्या कमी स्क्रीन, तसेच त्यांना कोणतीही माहिती न देता तीन दिवसात सिनेमा थिएटरमधून उतरवणे, आठवड्याभराचे शुल्क घेऊन उर्वरित रक्कम परत न करणे, तसेच



सेन्सॉर बोर्डाला वारंवार विनंत्या करूनही मराठी सिनेमांना सेन्सॉर संमती देण्याला विनंती करणे, मराठी सिनेमाच्या खेळांच्या वेळा ऐनवेळी बदलणे अथवा रद्द करणे यासारख्या अनेक प्रश्नांबाबत मराठी सिनेमांचे निर्माते, वितरक आणि विविध पक्षांच्या सिने कर्मचारी संघटनांसमवेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने आज मंत्रालयात बैठक झाली.

यावेळी सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल, गृहराज्यमंत्री योगेश कदम, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नविन सोना, नगरविकास प्रधान सचिव डी. गोविंदराज, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव किरण कुलकर्णी आणि इतर विभागांचे अधिकारी, मनसे चित्रपट सेनेचे अमेय खोपकर, शिवसेना चित्रपट सेनेचे सुशांत शेलार, राष्ट्रवादी चित्रपट सेनेचे बाबासाहेब पाटील, व्हिडीओ पॅलेसचे नानूभाई जयसिंघानी, वितरक समीर दीक्षित, चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले, संदीप घुगे हेदेखील उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी निर्माते, वितरक, मल्टीप्लेक्स मालक आणि इतर अधिकाऱ्यांचे म्हणणे जाणून घेतले. तसेच मराठी सिनेमाला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे धोरण असून मराठी सिनेनिर्माता जगला तरच मराठी सिनेमाला

## शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासाचे निर्णय घेणार: कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

### दत्तात्रय भरणेंनी हाती घेतला कृषीमंत्री पदाचा पदभार

मुंबई: शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वो तोपरी प्रयत्न करणार असून राज्यातील कृषी क्षेत्राच्या विकासासाठी सर्वसमावेशक धोरणे राबविणार असल्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. कृषिमंत्री भरणे यांनी आजपासून मंत्रालयातून कामकाजास सुरवात केली, त्यावेळी ते बोलत होते.

विधिमंडळाचे कामकाज सुरु असताना रमी खेळत असलेल्या व्हिडीओमुळे अडचणीत सापडलेल्या माणिकराव कोकाटे यांची कृषीमंत्रिपदावरून उचलबांगडी करत दत्तात्रय भरणे यांना राज्याचे नवे कृषिमंत्री म्हणून नियुक्त करण्यात आले. आज दत्तात्रय भरणे यांनी कृषीमंत्री पदाचा पदभार स्वीकारला आहे. यावेळी बोलताना ते म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी मला कृषीमंत्री म्हणून काम करण्याची संधी दिली आहे. आज मी कृषीमंत्री पदाचा पदभार स्वीकारला आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न, त्यांच्या अडचणी मला



माहिती आहेत, त्यामुळे मला हे खातं मिळालं आहे. शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय मी घेणार आहे, असंही पुढे भरणेंनी म्हटलं आहे. कृषिमंत्री भरणे म्हणाले की, मी स्वत: शेतकऱ्याचा मुलगा असून शेती व शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय हाच माझा प्राधान्याचा विषय असेल.

## वसईत डॉक्टरच्या ऑटोमॅटीक ईव्ही कारचा थरकाप उडवणारा अपघात

वसई : वसई येथील सन सिटी परिसरात एका डॉक्टरचा आणि त्याच्या पत्नीचा भयानक अपघात झाला. मिथिलेश मिश्रा असं या डॉक्टरचे नाव असून त्यांच्याकडे चऋ नड एत टॉप मॉडेल कार आहे. डॉ. मिश्रा यांच्यासोबत झालेल्या प्रकारामुळे संपूर्णपण ऑटोमॅटीक असलेल्या ईव्ही एमजी कारच्या सुरक्षेबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. डॉक्टर मिथिलेश मिश्रा आणि त्यांची पत्नी त्यांच्या पूर्णपणे ऑटोमॅटिक चऋना कारमधून बाहेर जाण्यासाठी निघाले होते. त्यांच्या गाडीची सिस्टम अचानक फेल झाल्यामुळे ही दुर्घटना घडली असा आरोप करण्यात येत आहे.हा प्रकार सोसायटीच्या पार्किंगमध्ये घडला. डॉक्टर मिश्रा आपल्या बायकोसोबत बाहेर जेवायला निघाले होते. डॉ.मिश्रा हे गाडीत आपल्या पत्नीची वाट पाहत होते. त्यांची गाडी न्यूट्रलवर होती आणि हँडब्रेकही लावलेला होता. पत्नी गाडीत बसल्यानंतर गाडी ड्रायव्हिंग मोडवर टाकण्यासाठी ब्रेक रिलीज होत नव्हता. मिश्रा यांनी बराचवेळ ब्रेक काढण्यासाठी प्रयत्न केला.सीसीटीव्हीमध्ये ही घटना कैद झाली असून काही सेकंद ही गाडी जागीच उभी असल्याचे दिसून आले आहे. मिश्रा यांनी सांगितले की गाडीचा ब्रेक आपोआप निघाला आणि गाडीने प्रचंड वेग घेतला. गाडी थेट इमारतीच्या भिंतीवर आदळली आणि जागीच उलटली. ही कार भिंतीला धडकत असताना गाडीच्या समोरून एक तरुण जात होता. मिश्रा यांची अनियंत्रित झालेली कार या तरुणाला चिरडू शकली असती. मिश्रा यांनी सांगितले की स्टेअरींग डावीकडे वळवल्याने त्या तरुणाचा जीव वाचला. मात्र कार भिंतीला धडकून उलटली आणि मिश्रा दाम्पत्य आतच अडकले होते. गाडी इतक्या वेगाने धडकल्यानंतरही एकही एअरबॅग उघडली नाही आणि दरवाजेही उघडले नाहीत, ज्यामुळे डॉक्टर दांपत्य गाडीत काही काळ अडकले. स्थानिक रहिवाशांनी गाडीचे सनरूफ तोडून त्यांना बाहेर काढले. या अपघातात कोणीही जबर जखमी झाले नाही.

## देवगिरी बँक ठरली शेड्यूल्ड दर्जा प्राप्त करणारी मराठवाड्यातील पहिली सहकारी बँक

छत्रपती संभाजीनगर - येथील देवगिरी नागरी सहकारी बँक लि. ला रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने 'शेड्यूल्ड बँक' दर्जा प्रदान केला असून, ही मान्यता मिळवणारी देवगिरी बँक ही मराठवाड्यातील पहिली सहकारी बँक ठरली आहे. तब्बल वीस वर्षांनंतर देशभरातील फक्त तीन सहकारी बँकांना हा दर्जा देण्यात आला असून, त्यात देवगिरी बँकेचा समावेश होणे ही अत्यंत गौरवाची बाब आहे. बँकेने रिझर्व्ह बँकेचे बँकिंग क्षेत्रातील गुणवत्तेचे अत्यंत कठोर आर्थिक व प्रशासकीय निकष पूर्ण केल्यामुळे देवगिरी बँकेस हा दर्जा मिळाला आहे.

शेड्युल्ड बँकेचा दर्जा मिळाल्याने देवगिरी बँकेच्या सेवा, कार्यक्षमता, आर्थिक सक्षमतेत तसेच सामाजिक विश्वासार्हतेला अधिक बळकटी मिळणार आहे. या दर्जामुळे बँकेला रिझर्व्ह बँकेकडून थेट व्यवहार करण्याची



मुभा मिळते, सरकारी योजनांची थेट अंमलबजावणी करता येते, शासकीय अनुदान, पेन्शन, DBT (Direct Benefit Transfer) इ. थेट खातेदारांच्या खात्यात जमा करणे अधिक सुलभ होते. यामुळे रिझर्व्ह बँकेचे सूक्ष्म नियंत्रण बँकेवर रहात असल्याने बँकेप्रती ठेवीदार तसेच ग्राहक यांचा विश्वास अधिक दृढ होईल.

या नव्या मान्यतेमुळे देवगिरी बँकेला आता स्थानिक स्वराज्य संस्था तसेच ट्रस्ट यांची खाती उघडून घेण्यास परवानगी मिळेल, बँकेला आता स्वबळावर बँक गॅरंटी जारी करता येईल, ज्यामुळे ग्राहकांना अधिक सुलभदरात ही सेवा उपलब्ध होईल. विदेशी चलनात (foreign currency) ठेवी स्वीकारण्याची अधिकृत परवानगी मिळू शकत असल्यामुळे प्रवासी, आयातदार, आणि परदेशी व्यवहार करणाऱ्या ग्राहकांसाठी ही एक महत्त्वाची सुविधा ठरणार आहे. तसेच बँक आता NABARD च्या विविध योजना राबवू शकेल.

३१ मार्च २०२५ अखेर बँकेची ठळक आर्थिक स्थिती:

एकूण ठेवी: रु.१,४६७ कोटी,कर्जवाटप: रु.९५३ कोटी,निव्वळ नफा: रु.३९.२४ कोटी,

एनपीए: ०%,CRAR: ३०.८२%,ऑडिट वर्ग: 'अ' (कायम अ वर्ग),शेअर भांडवल: रु.३७.६० कोटी,शाखा संख्या: ३३,बँकेच्या मजबूत आर्थिक स्थितीमुळे गत ४ वर्षापासून आपली बैंक रिझर्व्ह बँकेच्या आर्थिकदृष्ट्या सुदृड व सुव्यवस्थापित बँक (FSWM) ह्या श्रेणीत आहे. ज्यात भारतातील मोजक्याच नागरी सहकारी बँका आहेत. यामुळे देवगिरी बँकेस नुकतीच ग्राहकांसाठी इंटरनेट बैंकिंग सुविधा सुरू करण्यास परवानगी मिळाली असून, सदर सुविधा बँक आपल्या ग्राहकांसाठी लवकरच कार्यान्वित करणार आहे.

याच बरोबर बँक आर्थिकदृष्ट्या सुदृढ व सुव्यवस्थापित बँक (FSWM) श्रेणीत असल्याकारणाने रिझर्व्ह बँकेच्या पूर्वपरवानगी शिवाय नवीन शाखा सुरू करु शकते. देवगिरी बँक लवकरच ३ नवीन शाखा सुरू करून आपला कार्यविस्तार करणार आहे.

या ऐतिहासिक यशाबद्दल बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे म्हणाले, हा शेड्यूल्ड बँक' दर्जा म्हणजे केवळ आमच्या संस्थेचा सन्मान नसून, आमच्या लाखो खातेदारांचा, ठेवीदारांचा व भागधारकांचाही सन्मान आहे. आम्ही याच प्रकारे भविष्यातही वाटचाल करत राहू.

देवगिरी बँकेच्या या वाटचालीमागे ग्राहकवर्गाचा अढळ विश्वास, कर्मचाऱ्यांची निष्ठा, आणि पारदर्शक, नियमबद्ध कार्यपद्धती हीच खरी शिल्पकार ठरली आहेत. देवगिरी बँक भविष्यातही समाजाच्या प्रत्येक स्तरासाठी आर्थिक समावेश व डिजिटल सेवा पुरविण्यास कटिबद्ध असेल.

या सभेस बँकेचे अध्यक्ष किशोर दादा शितोळे, उपाध्यक्ष उमेश दाशरथी, संचालक सजनराव मते, नागनाथ काजळे, Adv. सागर विद्वन्स तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण नांदेडकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे यांची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## विष्णु नगर, जैन मदिरात नवीन वेदी प्रतिष्ठा व प्रतिमा स्थापना महोत्सव आयोजन

छत्रपती सभाजीनगर (प्रतिनीधी) : श्री. १००८ चंद्रप्रभु दिगंबर जैन मंदिर विष्णु नगर, छ. संभाजी नगर,येथे नवीन वेदी प्रतिष्ठा व प्रतिमा स्थापना महोत्सव आयोजन . ६, ७ ऑगस्ट रोजी केले असुन , दि. ६ ऑगस्ट सकाळी: ७ वाजता : मिरवणूक शोभायात्रा व मंदीर द्वार उद्घाटन ध्वजारोहण व मंडप शुद्धीकरण भगवंत अभिषेक, सकली करण, इंद्र प्रतिष्ठा विधान, आरती, शास्त्र वाचन व धर्मप्रभावना कार्यक्रम होनार आहे तसेच दि. ७ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता अभिषेक वास्तुविधान, वेदी



शुद्धी, संस्कार व प्रतिमा स्थापना हवन व विसर्जन होनार आहे यावेळी दुपारी २:०० वाजता – महाप्रसाद सिंधी भवन, सिंधी कॉलनी, होनार आहे . या महोत्सव साठी प्रतिष्ठाचार्य संदीपजी जैन दौंड हे लाभले आहे साग्रसंगीता मध्येरूपाली रावका पारंपरिक जैन संगीत व भजन संध्या होनार आहे तरी समाज बाधवानी वरील धार्मिक कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन श्री. १००८ चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदीर ट्रस्ट मंडल प्रतिष्ठा आयोजन समिती व जैन समाज परिवार केले आहे .

## पंचायत समिती लोहा येथे मंत्री बोर्डीकर यांच्या विरोधात काळ्या फिती लावून ग्रामसेवकांनी निषेध व्यक्त



लोहा – परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजनेचे प्रमाणपत्र वाटपाच्या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डिकर यांनी ग्रामपंचायत अधिकारी यांना अर्वाच्य भाषेत दमदाटी करून कानाखाली मारण्याची व सेवेतून बडतर्फ करण्याची धमकी दिली त्यांच्या निषेधार्थ ग्रामपंचायत अधिकारी युनियन उछ्ए १३६ पंचायत समिती लोहाच्या वतीने काळ्या फिती लावून निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी ग्रामसेवक संघटनेचे तालुकाध्यक्ष गजानन शिंदे,तालुका सचिव शैलेश बिसमिले, उपाध्यक्ष रमेश राठोड, अशोक मंगनाळे,बालाजी घुमलवाड, कमलेश पवळे, हरिहर विश्वासराव,पठाण कालेखान,भास्कर सरोदे, शरद गिते, मोहारे, स्वप्नाली चव्हाण, राजश्री कांबळे, बसवदे मॅडम, उपरवाड मॅडम, जामगे मॅडम, मोरे मॅडम,मुंडे बालाजी,सय्यद साहेब, आऊलवाड ,माळवे आदींसह मोठ्या संख्येने ग्रामविकास अधिकारी उपस्थित होते

## भाजप मोर्चा ग्रामीण जिल्हा चिटणीस पदी आऑड सुनील मते तर जिल्हा सचिव पदी सुधाकर जाधव यांची निवड




जितुर तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांची निवड जिल्हा ग्रामीणची कार्यकारणीची परभणी येथे मीटिंग संपन्न झाली पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर साकोरे माननीय आमदार रामप्रसादजी बोर्डीकर यांच्या नेतृत्वाखाली व भाजप जिल्हा अध्यक्ष सुरेश भुमरे यांनी जाहीर केली आहे जिल्हा कार्यकारणीत भाजप मोर्चा ग्रामीण चिटणीस पदी सुनील मते यांची निवड करण्यात आली तर जिल्हा सचिव पदी सुधाकर जाधव यांची निवड करण्यात आली आहे परभणी ग्रामीणची जबाबदारी त्यांच्यावर देण्यात आली आहे जबाबदारी यशस्वीरित्या सांभाळणार असल्याची त्यांनी सांगितले मागील काही दिवसापासून भाजप पक्षाची एकनिष्ठा असून त्यांचे ग्रामीण भागात चांगले कार्य असून पुढील काळात त्यांचे योगदान पक्ष कार्यरत सक्रिय सहभागी त्यांची एक निष्ठा समापन संघटन कौशल्य आणि सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग लक्षात घेऊन पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर साकोरे माननीय आमदार रामप्रसादजी बोर्डीकर जिल्हा अध्यक्ष सुरेश भुमरे यांनी त्यांची निवड करण्यात आली या निवडेचे पत्र देण्यात आले निवड झाल्याबद्दल त्यांचे पालकमंत्री माननीय मेघनाताई बोर्डीकर साकोरे माजी आमदार रामप्रसादजी बोर्डीकर जिल्हा अध्यक्ष सुरेश ची घुमरे जिंतूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गंगाधर रावजी बोर्डीकर माजी जिल्हा परिषद चेउपाध्यक्ष वसंतरावजी शिंदे माजी नगराध्यक्ष प्रतापराव देशमुख माजी नगराध्यक्ष सचिन गोरेडॉक्टर पंडितराव दराडे विलास भंडारी आदींनी त्यांचे अभिनंदन केले

## ‘स्त्री–पुरुष समानता’ विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन : करंजी येथील विद्यासागर हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद

परभणी,दि.०५(प्रतिनिधी) : जिल्हा महिला बाल विकास, एस.बी.सी ३/युनिसेफ मुंबई आणि सेवा संस्था, परभणी यांच्या संयुक्त विद्यमानाने सोमवारी (दि.४) करंजी येथील विद्यासागर हायस्कूलमध्ये ‘बालविवाह आणि त्याचे दुष्परिणाम त्याचबरोबर लिंग भेदभाव स्त्री–पुरुषसमानता’ या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सेवा संस्थेच्या स्वयंसेवीका सुनीता काळे यांनी विविध खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी गाण्याच्या माध्यमातुन लग्नाचे योग्य वय, स्वावलंबन, योग्य निर्णय, शिक्षणाचे महत्व याबाबत चर्चा केली. विद्यार्थ्यांना बालविवाह प्रतिबंध, स्त्री पुरुष समानते विषयी संदेश देण्यात आला. मुलीचे वय १८ पूर्ण झाल्यावर तसेच मुलाचे वय २१ वर्ष झाल्यावर लग्न करावे असे मुलांना मार्गदर्शन केले. मुले आणि मुलींने जर उच्चशिक्षण घेतले तर ते स्वावलंबी बनतील. शाळेतील विद्यार्थ्यांना चाईल्ड हेल्प लाईन नंबर १०९८ याचा उपयोग विविध ठिकाणी कसा करावा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मुख्याध्यापक वसेकर व शिक्षकांनी हा उपक्रम पार पाडण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. एस. बी सी.३/ युनिसेफ संस्थेचे वरिष्ठ प्रकल्प समन्वयक बाळू राठोड यांनी सर्वांचे आभार मानले.

## शुक्रवारी पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांच्या व्याख्यानाचे आयोजन : कै.ऍड.वसंतराव खारकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त उपक्रम



सेलू ता.५ : सेलू शहराचे जेष्ठ नेते, माजी नगराध्यक्ष,जेष्ठ विधिज्ञ तथा श्री केशवराज बाबासाहेब शिक्षण संस्थेचे तत्कालीन सचिव कै.ऍड.वसंतराव खारकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त येथील वसंत प्रतिष्ठानच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार व निस्सीम राष्ट्रभक्त पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांचे ' विश्वगुरू भारत ' या विषयावर शुक्रवार, दि.८ ऑगस्ट रोजी येथील साई नाट्यमंदिर येथे सायंकाळी ६ वाजता व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. वसंत प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी कै.वसंतराव खारकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमास जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने श्री के.बा.शिक्षण संस्थेचे सचिव तथा उद्योजक महेशराव खारकर व ॲड. उमेशराव खारकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# परभणी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक संपन्न; ग्राहकांच्या विविध तक्रारींवर चर्चा



परभणी, दि ५ : परभणी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी (दि. ४) जिल्हा पुरवठा अधिकारी विलास मुसळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी ग्राहकांच्या प्राप्त विविध तक्रारींवर चर्चा करून त्या सोडवण्यात आल्या.

यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायत देवगिरी प्रांत अध्यक्ष डॉ. विलास मोरे, अन्न औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त श्री. चौधरी, वैद्यमापन शास्त्र विभागाचे ग.मा. कांबळे, आरोग्य विभागाच्या डॉ. रेवती महाजन, महावितरणचे सहाय्यक अभियंता हनुमंत सरडे, सहाय्यक अभियंता नागनाथ शंकरवाड, ग्राहक परिषदेच्या सदस्य प्राचार्या डॉ. संगीता आवचार, गुलाब शिंदे, डॉ. संदीप चव्हाण, जनार्दन आवरगंड, सोपान टोले, मधुकर मुळे, शाम रनेर, गंगाधर देशमुख ग्राहक संरक्षण परिषदेच्या लेखापाल श्रीमती कोलगणे आदींची उपस्थिती होती.

ग्राहकाची फसवणूक झाली तर त्वरित प्रशासनाच्या व अशासकीय सदस्यांच्या माध्यमातून संबंधिताला न्याय मिळावा यासाठी जिल्हास्तरावर ग्राहक संरक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने परभणी जिल्हाधिकारी कार्यालयात ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक आयोजित करण्यात आली होती.

प्रारंभी मागील बैठकीचा आढावा घेण्यात आला. तदनंतर बैठकी दरम्यान दाखल झालेल्या ग्राहक/ नागरीकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत सविस्तर व सकारात्मक चर्चा झाली. सदर तक्रारीवर केलेल्या कार्यवाहीचा लिखीत अहवाल ग्राहक संरक्षण परिषदेत व त्याची एक प्रत संबंधित तक्रारदारास पुढील बैठकीत देण्याचा ठराव घेण्यात आला. दरम्यान या महिन्यात दाखल झालेल्या तक्रारीपैकी चार तक्रारी निकाली काढण्यात आल्या.

# शेतकरी आंदोलनाला नौटंकी म्हणणाऱ्या बावनकुळे यांच्या प्रतिमेला जोडे मारून व प्रतिमा दहन करून प्रहार जनशक्ती पक्षाचा निषेध



परभणी – शेतकरी कर्जमाफी आंदोलन व शेतकऱ्यांचे होणारे विविध आंदोलन हे नौटंकी आहेत म्हणणाऱ्या महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे वक्तव्याचा निषेध करत प्रहार जनशक्ती पक्षाने आज यांच्या प्रतिमेला जोडे मारून व प्रतिमा दहन करून रोष व्यक्त केला. राज्यभरात आजपर्यंत झालेल्या सहा लाख शेतकऱ्यांच्या आत्महत्या व रस्त्यावर दिसणारा शेतकऱ्यांचा आक्रोश ही नौटंकी आहे का असा संतप्त सवाल यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाप्रमुख शिवलिंग बोधने यांनी उपस्थित केला.

माननीय बच्चुभाऊ कडू यांनी राज्यभर सुरू केलेल्या कर्जमाफी व हमीभाव आंदोलन हे दोन्ही आंदोलने शेतकऱ्यांच्या हिताची आणि शेतकऱ्यांच्या हक्काचे आहेत. निवडणुकीपूर्वी सातबारा कोरा व हमीभाव आश्वासन देणाऱ्या भारतीय जनता पार्टी सरकार त्यांनीच दिलेली आश्वासन विसरले त्याच आश्वासनाची आठवण करून देण्यासाठीच शेतकरी राज्यभर आंदोलन करीत आहेत या आंदोलनाला नौटंकी म्हणून शेतकऱ्यांच्या भावनांवर मीठ चोळणाऱ्या महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विरोधामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणावर लाट असून आज प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने परभणी येथील उपोषण मैदानात चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रतिमेला जोडे मारून प्रतिमा दहन करून आंदोलन केले. संतप्त झालेल्या आंदोलकांनी बावनकुळे व सरकार विरोधी प्रचंड घोषणाबाजी या वेळी केली.

आंदोलनात प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाप्रमुख शिवलिंग बोधने, दिव्यांग आघाडी जिल्हाप्रमुख केशव जाधव, जिल्हा सचिव रामेश्वर पुरी, उपजिल्हाप्रमुख रामेश्वर जाधव, तालुकाप्रमुख उद्धव गरुड, शहर प्रमुख अंकुश गिरी, ऑटो आघाडी शहर प्रमुख शंकर दामोदर, सरचिटणीस वैभव संघई, सर्कल प्रमुख सुरेश आगलावे,हेमराज गरूड, राहुल शिवभगत, रामराज कांगणे, नारायण धुमाळ, रमेश जोंधळे, गोपीनाथ जोंधळे इत्यादी उपस्थित होते.

## करंजीत बालविवाह व त्याचे दुष्परिणाम, स्त्री–पुरुष समानता विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन





परभणी, दि ५ : जिल्हा महिला बाल विकास, एस.बी. सी ३/युनिसेफ मुंबई आणि सेवा संस्था, परभणी यांच्या संयुक्त विद्यमानाने सोमवारी (दि.४) रोजी विद्यासागर हायस्कूल, करंजी येथे बालविवाह आणि त्याचे दुष्परिणाम त्याचबरोबर लिंग भेदभाव स्त्री–पुरुषसमानता या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

सेवा संस्थेच्या स्वयंसेवीका सुनीता काळे यांनी विविध खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी गाण्याच्या माध्यमातुन लग्नाचे योग्य वय, स्वावलंबन, योग्य निर्णय, शिक्षणाचे महत्व याबाबत चर्चा केली. विद्यार्थ्यांना बालविवाह प्रतिबंध, स्त्री पुरुष समानते विषयी संदेश देण्यात आला. मुलीचे वय १८ पूर्ण झाल्यावर तसेच मुलाचे वय २१ वर्ष झाल्यावर लग्न करावे असे मुलांना मार्गदर्शन केले. मुले आणि मुलींने जर उच्चशिक्षण घेतले तर ते स्वावलंबी बनतील. शाळेतील विद्यार्थ्यांना चाईल्ड हेल्प लाईन नंबर १०९८ याचा उपयोग विविध ठिकाणी कसा करावा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

मुख्याध्यापक श्री. वसेकर व शिक्षकांनी हा उपक्रम पार पाडण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. एस. बी सी.३/ युनिसेफ संस्थेचे वरिष्ठ प्रकल्प समन्वयक बाळू राठोड यांनी सर्वांचे आभार मानले.

# देवगाव धानोरा येथे महिला शेतकरी शेतीशाळेला उत्फूर्त प्रतिसाद



जिंतूर : तालुक्यातील देवगाव धानोरा, येथे तालुका ' कृषी अधिकारी नितीन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विभाग, जिंतूर यांच्या वतीने महिला शेतकरी शेतीशाळा आयोजन करण्यात आले. सदर शेतीशाळेत गावातील महिला व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. कार्यक्रमात कृषी विभाग जिंतूर येथील सहाय्यक कृषी अधिकारी स्वप्निल दिलीपराव देशमुख , राजेश मानवते यांनी मार्गदर्शन केले. सोयाबीन पिकाची लागवड, संरक्षण व काढणी प्रक्रिया यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

तज्ञांचे प्रात्यक्षिकासह सादरीकरण शेतकऱ्यांसाठी उपयक्त ठरले. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत सोयाबीन उत्पादक महिला शेतकऱ्यांसाठी शेतीशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महिलांचा सहभाग विशेष उल्लेखनीय असून शेतीशाळेत 'त्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. कायंक्रमात सहाय्यक कृषी अधिकारी स्वप्निल देशमुख यांनी मित्र किड व शत्र किड यांची ओळख करून देत प्रात्यक्षिकांसह माहिती दिली, तर सहाय्यक कृषी अधिकारी, राजेश मानवते यांनी किड व रोग नियंत्रणाचे प्रभावी उपाय शेतकऱ्यांपुढे मांडले. तर सांघिक खेळ उपक्रम गजानन बोबडे यांनी सादर केले.

शेतीशाळा यशस्वी पार पाडण्यासाठी सरपंच अंबादास ईप्पर यांचे तसेच गावातील महिला व पुरुष मंडळींचे विशेष सहकार्य लाभले, अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे शाश्वत शेतीकडे वाटचाल करणाऱ्या शेतकऱ्यांना नव्या दिशा लाभत असन, ज्ञानवृद्धीसाठी ही शेतीशाळा उपयुक्त ठरत आहत.

# एमजीएममध्ये प्राचार्य प्रताप बोराडे स्मृती सन्मानाचे वितरण संपन्न

### मंगल कक्कड आणि मिलिंद गोडबोले यांना केले सन्मानित



छत्रपती संभाजीनगर, दि.५ : एमजीएमचे विश्वस्त प्राचार्य प्रताप बोराडे यांचा दुसरा स्मृती दिन आज एमजीएम विद्यापीठामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करीत पाळण्यात आला. याचाच भाग म्हणून जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या २ माजी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत ‘प्राचार्य प्रताप बोराडे स्मृती सन्मान’ देऊन सन्मानित करण्यात आले. वर्ष २०२५ चा ‘प्राचार्य प्रताप बोराडे स्मृती सन्मान’ मंगल कक्कड आणि मिलिंद गोडबोले यांना आज रुक्मिणी सभागृहात प्रदान करण्यात आला.

यावेळी,एमजीएमचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, उपाध्यक्ष डॉ. पी.एम.जाधव, सचिव अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, शिक्षणतज्ज्ञ भाऊसाहेब राजळे, अरविंद गोरे, श्रीमती शशिकला बोराडे, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, प्राचार्या डॉ.विजया मुसांडे, सन्मानार्थी मंगल कक्कड आणि मिलिंद गोडबोले, बोराडे कुटुंबीय, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आरती साळुंके आणि प्रा.मेधा नाईक यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांनी केले तर आभार प्राचार्या प्रा.डॉ.विजया मुसांडे यांनी मानले.

## मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी जनजागृती, प्रशिक्षण आणि तपासणी प्रभावीपणे राबवा– दिलीप स्वामी


छत्रपती संभाजीनगर,दि.५ – जिल्ह्यात दर हजार मुलांमागे ९२७ मुली असे प्रमाण आहे. मुलींच्या जन्मदरात गेल्या वर्षाच्या तुलनेत वाढ झाली असली तरी ही वाढ समाधानकारक नाही. यासंदर्भात कायद्याच्या आधारे अपप्रवृत्तींवर कारवाई करणे व मुलींच्या जन्माबाबत समाजाची मानसिकता, दृष्टिकोन बदलवणे या गोष्टीवर भर देणे आवश्यक आहे. तरी जनजागृती. प्रशिक्षण आणि तपासणी प्रभावीपणे राबवाव्या,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले. तसेच रुग्ण कल्याण समितीसाठी जिल्ह्यातील दानशूर व्यक्तिंनी निधीचे योगदान द्यावे,असे आवाहनही केले. जिल्हाधिकारी कार्यालयात आरोग्य विभागाशी संबंधित जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, रुग्ण कल्याण समिती, गर्भलिंगनिदान प्रतिबंधक समिती, सुमन जिल्हास्तरीय समिती अशा विविध विषयांवर आधारीत बैठक घेण्यात आली.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. मुदखेडकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रशांत बढे, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे, कार्यक्रम अधिकारी श्रीमती साधना गंगावणे, ड. रश्मी शिंदे, डॉ. प्रज्ञा सोनवणे तसेच अन्य वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग जिल्हा रुग्णालय अंतर्गत दि.१२ ऑगस्ट ते १२ ऑक्टोबर दरम्यान जनजागृतीसाठी आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त बाईक रॅली, १५० गावात जनजागृती, ६५० माध्यमिक शाळेत एच.आय.व्ही./ एड्स जनजागृती, ९५ महाविद्यालयीन युवक युवती यांना जनजागृती अंतर्गत मार्गदर्शन करण्यात येणार आहे, अशी माहिती देण्यात आली. जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, रुग्ण कल्याण समितीमार्फत रुग्णांसाठी विविध सोई सुविधा राबविल्या जातात. त्यासाठी सामाजिक व स्वयंसेवी संस्थांनी सढळ हाताने मदत करावी. जिल्ह्यात मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी जनजागृती करुन लोकांचे प्रबोधन करावे. ज्या भागात जन्मदर कमी आहे त्या भागात लक्ष केंद्रीत करावे. कारणांचा शोध घ्यावा. अधिक कडक तपासणी करुन अपप्रवृत्तींवर कारवाया कराव्या. जिल्ह्यात सुरक्षित मातृत्वासाठी सुद्धा जनजागृती करावी. माता व बालकांचे आरोग्य चांगले कसे राहिल याबाबत प्रयत्न करावे,असे निर्देश त्यांनी दिले.

## ‘एआय’ तंत्रज्ञानाशी करा मैत्री; जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रशिक्षणात एआय चे धडे

छत्रपती संभाजीनगर,दि.५ – कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय या तंत्रज्ञानाशी मैत्री करा. ही मैत्री नक्कीच आपल्या फायद्याची आहे. यामुळे आपले श्रम,वेळ वाचून आपल्या कामात अचूकता आणता येते,असे प्रतिपादन विनायक कदम यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात महसूल सप्ताहानिमित्त ‘कृत्रिम बुद्धिमत्ता आणिसुयोग्य माहिती तंत्रज्ञानाचा प्रशासनातील वापर’, या विषयावर प्रशिक्षण पार पडले. महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचे पुणे व उत्तर महाराष्ट्र विभागाचे विभागीय व्यवस्थापक विनायक कदम यांनी या प्रशिक्षणात जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, डॉ. सुचिता शिंदे, नीलम बाफना तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सर्व कर्मचारी आणि अधिकारी यांना एआय तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याविषयी आवाहन केले. हे तंत्रज्ञान आता आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झाले आहे. त्याचा अंगिकार करणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठीच या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचा सर्व कर्मचाऱ्यांनी लाभ घ्यावा. विनायक कदम यांनी एआयच्या विविध उपयोगी प विषयी आपल्या सादरीकरणात माहिती दिली. एआय प्रणालीचा इतिहास समजावून सांगितला. तसेच त्याच्या विविध प विषयी प्रात्यक्षिक दाखवून माहिती दिली. एआय हा अत्यंत विश्वासू मित्र असून त्यास योग्य त्या पद्धतीने सुचना देता यायला हव्या. ते तंत्र शिकायला हवे. जिवनाच्या विविध क्षेत्रात एआय चा वापर होत आहे. एआय आपल्या दैनंदिन जीवनात खूप ठिकाणी उपयोगी ठरत आहे. आपल्या कळत न कळत उपयोग होत आहे. प्रशासनात एआय चा वापर केल्यास अधिकाधिक लोकाभिमुख प्रशासन राबविता येईल,असेही त्यांनी सांगितले.

# हेडगेवार मध्ये फिजिओथेरपी पदवी अभ्यासक्रमाला सुरूवात -नाशिकच्या आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्नित



छत्रपती संभाजीनगर : डॉ.हेडगेवार रूग्णालयाच्या श्रीरामचंद्र इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस फिजिओथेरपी महाविद्यालयात बॅचलर ऑफ फिजिओथेरपी (बीपीटी) अभ्यासक्रमाला सुरूवात झाली आहे. महाविद्यालय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकशी संलग्नीत असून २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेशाला सुरूवात झाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेंद्र वाणी यांनी दिली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान अर्थात डॉ. हेडगेवार रूग्णालया अंतर्गत श्रीरामचंद्र इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस कॉलेज ऑफ फिजिओथेरपी संचलित आहे. महाविद्यालयाचे फिजिओथेरपी पदवी अभ्यासक्रमाचे हे पहिलेच वर्ष आहे. येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकद्वारे खास तयार केलेला कौशल्याधारित फिजिओथेरपी अभ्यासक्रम शिकवला जाईल. याचे क्लिनीकल प्रशिक्षण डॉ. हेडेगेवार रूग्णालयात दिले जाईल. ह्या अभ्यासक्रमात आधुनिक आरोग्य सेवेच्या गरजेनुसार कौशल्याधारित शिक्षण, क्लिनिकल प्रशिक्षण व संशोधन यावर विशेष भर देण्यात आल्याचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेंद्र वाणी यांनी केले आहे सांगितले.

फिजीक्स, केमिस्ट्री आणि बायोलॉजी विषयांसह १२वी उत्तीर्ण आणि नीट परीक्षा दिलेले विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र ठरतील. एमएच-सीईटी कॅप राऊंडसाठी महाविद्यालयाचा कोड ०६३८४ आहे. अभ्यासक्रमाचा एकुण कालावधी ४.५ वर्षाचा असून ४ वर्षे शिक्षण आणि ६ महिन्यांची इंटर्नशिप असेल. पहिल्या वर्षाच्या प्रवेशासाठी ४० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता आहे. शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजना येथे उपलब्ध असतील.

अनुभवी प्राध्यापक, अत्याधुनिक प्रयोगशाळा, प्रगत फिजिओथेरपी उपकरणे, निसर्गरम्य परिसर आणि आरोग्यदायी शैक्षणिक वातावरण ही श्रीरामचंद्र इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसची वैशिष्ट्ये आहेत. भविष्यात सामाजिक जाणिवा आणि नैतिक मूल्ये असलेले कुशल फिजिओथेरपिस्ट घडविण्याचा महाविद्यालयाचा संकल्प असल्याचे संस्थेतर्फे महाविद्यालयाचे कार्यकारी विश्वस्त डॉ. अविनाश बुचे यांन्नी सांगीतले.

फिजिओथेरपी पदवीधारकांना नॅशनल कमिशन फॉर अलायड एण्ड हेल्थकेअर प्रोफेशनल कायदा २०२१ अंतर्गत फिजिओथेरपी डॉक्टर म्हणून मान्यता मिळाली आहे. यामुळे एकुणच या व्यवसायाचा दर्जा आणि रुणांचा विश्वास वाढला आहे. फिजिओथेरपीस्टना रुणालयांसोबतच क्रीडा, न्युरो, ऑर्थोपेडीक्स, कार्डिओ- पलमोनरी, जेरियाट्रिक्स, महिलांचे आरोग्य, ग्रामीण आरोग्यसेवा अशा विविध क्षेत्रात करीअरच्या संधी उपलब्ध आहेत. यासोबतच पदव्युत्तर शिक्षण, स्वतंत्र क्लिनिकल प्रॅक्टिस, हॉस्पीटल एडमिनीस्ट्रेशन, सरकारी व खाजगी रुणालये, पुनर्वसन केंद्र, फिटनेस सेंटर येथेही काम करता येत असल्याचे प्रोजेक्ट इनचार्ज डॉ.आदीत्य वैद्य यांनी सांगितले. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठानचे सह-कार्यवाह व महाविद्यालयाचे कार्यकारी विश्वस्त डॉ. अविनाश बुचे, प्रोजेक्ट इनचार्ज डॉ. आदित्य वैद्य व फिजीओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेंद्र वाणी आदी उपस्थित होते.

## कन्नड अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटीत मोठी आर्थिक अफरातफर

# कर्ज वाटपात ८७ लाखांचा गैरव्यवहार; संचालक मंडळाविरुद्ध गुन्हा दाखल

सहयोग प्र.जावळे

तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.०५ ऑगस्ट - कन्नड अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि.मध्ये तब्बल ८७ लाख २३ हजार ७३८ रुपयांचा गैरव्यवहार उघड झाला असून, या प्रकरणी संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक व व्यवस्थापक यांच्यासह एकूण १४ जणांविरोधात कन्नड पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई सरकारी लेखापरीक्षक शेख सलाउद्दीन कुतुबुद्दीन यांच्या लेखापरीक्षण अहवालाच्या आधारे करण्यात आली आहे.

शेख सलाउद्दीन हे सन २०१६-१७ पासून सहकारी संस्थांचे उपलेखा परीक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कन्नड यांच्या आदेशान्वये २०२१-२२ या आर्थिक वर्षातील लेखापरीक्षण केले. या तपासणीत गंभीर आर्थिक अनियमितता व अफरातफर उघड झाली.



### चार प्रकारच्या अनियमितता उघड

**१) एकरकमी कर्ज परतफेड योजनेत अनियमितता :** कोणतीही अधिकृत योजना मंजूर न करता, ठराव न घेता काही निवडक कर्जदारांना परतफेडीत सूट दिल्यामुळे संस्थेचे ९७,९८८ रुपयांचे नुकसान झाले.

**२) कर्ज मागणी अर्ज व कागदपत्रांशिवाय कर्ज वाटप :** विशेषतः सौ. श्वेता शाम माडीवाले यांना कोणताही अर्ज नसताना ३० लाखांचे कर्ज देण्यात आले.

**३) लिंकींग शेअर्स रकमेचा अपहार :** कर्ज मंजुरीवेळी कपात केलेल्या लिंकींग शेअर्सची रक्कम संस्थेच्या भागभांडवलात न भरता, ती वेगळी नोंदवून १२ लाख २५ हजार ७५० रुपयांचा गैरव्यवहार केला गेला.

**४) पोटनियमबाह्य विनातारणी कर्ज वाटप :** संस्थेच्या नियमानुसार कर्ज मर्यादा १० लाख असताना, काही कर्जदारांना ३० लाखांपर्यंत कर्ज दिले गेले. या प्रकारात ४४ लाखांचे गैरकृत्य आढळून आले.

### १४ संचालकांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा

**संचालक मंडळाने संगनमताने संस्थेचा अपहार केला असून, सभासद व ठेवीदारांची विश्वासघाताने फसवणूक केल्याचे लेखा परीक्षण अहवालात स्पष्ट झाले आहे. यावरून जयंत कुलकर्णी, मनिषा कुलकर्णी, दशरथ सोमासे, आप्पासाहेब दळे, संजय पांडे, सचिन जाधव, युवराज चव्हाण, राजू नवले, उमेश नाटाणी, शिवाजी धनेधर, अर्जुन चव्हाण, सतीश शेजवळ, प्रियंका साळुंके, व कल्पना थेटे या संचालकांविरुद्ध भादंवि कलम ४०९, ४०६, ४२०, ३४ तसेच सहकारी संस्था कायदा कलम १४६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी हे करीत आहेत.**

## बुरशीनाशक क्षेत्रातील एक लिगसी ब्रँड

मुंबई - भारतातील आघाडीची संशोधन आधारित कृषी-रसायन कंपनी क्रिस्टलक्रॉप प्रोटेक्शन लिमिटेड ने आज त्यांच्या प्रमुख बुरशीनाशक ब्रँड बविस्टिनच्या५० वर्षांच्या यशस्वी प्रवासाचा गौरव केला आहे. १९७५ मध्ये सादर करण्यात आलेले बविस्टिन हे भारतीयशेतीतील सर्वात विश्वासार्ह आणि काळाच्या कसोटीवर उतरलेले सिस्टीमिक बुरशीनाशकम्हणून ओळखले जाते. याच्या ब्रॉड-स्पेक्ट्रम प्रतिबंधक आणि उपचारात्मक प्रभावामुळे,बविस्टिनने पिकांच्या विविध वाढीच्या टप्प्यांमध्ये लाखो हेक्टर क्षेत्राचे यशस्वीसंरक्षण केले आहे, त्यामुळे ते भारतीय शेतकऱ्यांसाठी एक अतूट साथीदार बनले आहे. बविस्टिनच्या सिस्टिमिक वैशिष्ट्यामुळे त्यातील सक्रियघटक संपूर्ण झाडामध्ये प्रवास करतो, ज्यामुळे प्रत्येक वाढणाऱ्या भागाचे रक्षण होतेआणि अनेक प्रकारच्या बुरशीजन्य आजारांपासून संपूर्ण सुरक्षा मिळते. दशकानुदशके त्यांच्यासातत्यपूर्ण आणि विश्वासार्ह कार्यक्षमतेमुळे बविस्टिन केवळ एक उत्पादन न राहतापक आदर्श लिगसी ब्रँड ठरले आहे - जे क्रिस्टलच्या संरक्षण आणि नफाया शाश्वत वचनाशी सुसंगत आहे.

## स्टायलिश, शक्तिशाली आणि टिकाऊः विवो वाय ४०० ५ जी लाँच केला

पुणे - जागतिक स्मार्टफोन ब्रँड विवो हा नावीन्यपूर्णता आणि शैलीच्या अद्वितीय मिश्रणासाठी ओळखला जातो आणि आता विवो ने वाय ४०० ५ जी सादर केला आहे जो वाय मालिकेतील नवीन मॉडेल आहे, विशेषतः जेन-झेड वापरकर्त्यांसाठी डिझाइन केलेले आहे जे नेहमी प्रवासात असतात. सतत चालत रहा आणि ते अत्याधुनिक टिकाऊपणा, शक्तिशाली कामगिरी आणि ट्रेंडसेटिंग डिझाइनचे मिश्रण करते, सर्व अल्ट्रा-स्लिममध्ये फक्त ०.७९ सेमी फ्रेम.

## नेक्स्ट-जेन रॉर ईझी सिग्मा लाँच केली

मुंबई : ओबेन इलेक्ट्रिक भारतातील स्वदेशी संशोधन आणि विकास-चालित इलेक्ट्रिक मोटरसायकल उत्पादक कंपनीने, आज रॉर ईझी सिग्मा - ही धाडसी इलेक्ट्रिक, पुढच्या पिढीची इलेक्ट्रिक प्रवासाची मोटरसायकल मर्यादित कालावधीसाठी १.२७ लाख पासून सुरू होणाऱ्या विशेष प्रारंभिक किंमतीत लॉंच करण्याची घोषणा केली आहे. आधुनिक भारतीय रायडरसाठी शहरी प्रवासाची पुनर्परिभाषा करण्यासाठी डिझाइन केलेली, रॉर ईझी सिग्मा ही मजबूत कम्प्युटर-फर्स्ट रचनेवर आधारित आहे ज्यामुळे रॉर ईझी यशस्वी झाली आहे, अनुभव आणि उपयुक्तता दोन्ही वाढवण्यासाठी प्रमुख हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर अपग्रेड सादर करण्यात आले आहे.

## शक्ती पंप्सची उत्कृष्ट कामगिरी

पुणे - शक्ती पंप्स (इंडिया) लिमिटेड ने ३० जून २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीचे आर्थिक निकाल जाहीर केले.शक्ती पंप्स (इंडिया) लिमिटेडचे अध्यक्ष श्री. दिनेश पाटीदार यांनी कंपनीच्या कामगिरीवर भाष्य करताना सांगितले, आम्हाला आर्थिक वर्ष २०२६ च्या मजबूत सुरुवातीची घोषणा करताना आनंद होत आहे, जी आमच्या वैविध्यपूर्ण व्यवसाय मॉडेलची ताकद दर्शवते. या तिमाहीतील आमची कामगिरी सोलर पंप सेगमेंटमधील मजबूत अंमलबजावणी, सातत्यपूर्ण निर्यात वाढ आणि क्षमता व तंत्रज्ञानातील दीर्घकालीन गुंतवणुकीमुळे प्रेरित झाली आहे. आम्ही पीएम-कुसुम योजनेत सुमारे २५% बाजारपेठेतील हिस्सा राखून, प्रमुख भारतीय कृषी राज्यांमध्ये आघाडीवर आहोत. १ ऑगस्ट २०२५ पर्यंत आमची ऑर्डर बुक सुमारे १,३५० कोटी इतकी होती, ज्याला महाराष्ट्र, मध्यप्रदेश, राजस्थान, हरियाणा, पंजाब, उत्तर प्रदेश आणि झारखंड यांसारख्या राज्यांकडून स्थिर ऑर्डर्सचा पाठिंबा मिळाला आहे.

## आयडीएफसी फर्स्ट बँकेकडून 'रेमिटफर्स्ट२इंडिया' लाँन्च

पुणे : आयडीएफसी फर्स्ट बँकेने 'रेमिटफर्स्ट२इंडिया' लाँन्च करण्याची घोषणा केली आहे. हा पुढील पिढीचा डिजिटल रेमिटन्स प्लॅटफॉर्म असून अनिवासी भारतीयांना (एनआरआय) त्यांच्या भारतातील कुटुंबियांना जलद, सुरक्षित आणि शून्य हस्तांतरण शुल्कासह पैसे पाठवण्याची परवानगी आहे. आयडीएफसी फर्स्ट बँक एनआरआय ग्राहक फक्त मोबाइल बँकिंग ॲपमध्ये लॉग इन करून व्यवहार करू शकतात. आयडीएफसी फर्स्ट बँक एनआरआय नसलेल्या वापरकर्त्यांसाठी, हे प्लॅटफॉर्म समर्पित वेब-पोर्टलद्वारे एक सोपी, पेपरलेस ऑनबोर्डिंग सुविधा देत आहे.

## 'घरवाली पेडवाली'मध्ये निहारिका रॉय सावीच्या भूमिकेत!

एण्ड टीव्हीवरील 'घरवाली पेडवाली' भावना, हास्य आणि भयावह सरप्राइजेजच्या धमाल रोलरकोस्टरचे मनोरंजन देण्यास सज्ज आहे. या नवीन संकल्पनेमध्ये अधिक मोहकतेची भर करत आहे उत्साही व प्रतिभावान निहारिका रॉय, जी उत्साही, धाडसी, फॅशन-फॉरवर्ड जनरेशन झेड गर्ल सावीची भूमिका साकारणार आहे. या असामान्य प्रेम त्रिकूटामधील 'घरवाली' म्हणून तिची उपस्थिती अनपेक्षितपणे कथानकाला रोमांचक वळण देते. विनोदी व प्रेमळ निहारिका दीर्घकालीन छाप निर्माण करण्यास सज्ज आहे. सावी भूमिकेबाबत सांगताना निहारिका रॉय म्हणाली, ''सावी फक्त भूमिका नाही तर पूर्णत: नवीन उत्साह घेऊन येते. ती आजची तरूण, आत्मविश्वासू व स्वावलंबी मुलींचे प्रतिनिधीत्व करते, ज्या नीडरपणे आपले जीवन जगतात. टेलिव्हिजनवरील इतर महिला पात्रांच्या तुलनेत ती अधिक नीडर व अभिव्यक्त होणारी आहे, जे मला खूप आवडले आहे.

## सूर्य देवाने हनुमानाला असूर्य लोकात पाठवले

सोनी सबवरील 'वीर हनुमान' मालिकेचे दमदार कथानक आणि त्यातील दिव्य साहस प्रेक्षकांना आकर्षित करत आहे. या मालिकेत आन तिवारीने बाल हनुमानाची भूमिका केली आहे, तर सायली साळुंखे आणि आरव चौधरी अनुक्रमे माता अंजनी आणि केसरीच्या भूमिकेत दिसत आहेत. माहिर पांधीने वाली आणि सुग्रीव यांची दुहेरी भूमिका साकारली आहे. मालिकेत आता हनुमानाच्या जीवनातील परिवर्तनाचा अध्याय सुरू झाला आहे. आत्तापर्यंत प्रेक्षकांनी हनुमानाची जिज्ञासू वृत्ती आणि त्याचा दृढ निर्धार पाहिला आहे, आणि आता सुजाणता आणि सामर्थ्य मिळवण्याच्या दिशेने त्याने पहिले पाऊल उचलले आहे. नवीन आव्हानांना तोंड देत देत तो काही छुपी रहस्यं उघडकीस आणतो आणि त्याचा मार्ग त्याला एका महान उद्देशाकडे घेऊन जातो. त्याची नियती कशी उलगडते याकडे प्रेक्षकांचे लक्ष लागून राहिले आहे.

## एचपीएल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे सुरक्षा समिती अंतर्गत विद्यार्थ्यांना सुरक्षा विषयी मार्गदर्शन

बिडकीन दि ५ ऑगस्ट पैठण तालुक्यातील एच.पी.एल ,माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कृष्णापुर ,पैठण येथे आज दि ४ रोजी सुरक्षा समिती अंतर्गत उपक्रम घेण्यात आला .यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बिडकीन पोलीस ठाण्याचे पोलीस सहाय्यक निरीक्षक



निलेश शेळके उपस्थित होते .कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक संभाजी जाधव होते. बिडकीन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांनी कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सुरक्षित वाहतूक नियमांचे महत्त्व पटवून देण्यात आले. झेब्रा क्रॉसिंग, सिग्नलचे महत्त्व व हेल्मेट वापरण्याचे फायदे सांगितले.आणि घोषवाक्यांच्या माध्यमातून सुरक्षित वाहतुकीचा संदेश दिला .तसेच विद्यार्थी सुरक्षिततेसाठी विद्यार्थिनींना त्यांच्या सुरक्षिततेबाबत काही सूचना दिल्या ,त्याचप्रमाणे त्यांनी छे, ऋ, रपव ढशश्रश्र असा मंत्र दिला विद्यार्थ्यांनीही त्या गोष्टी आत्मसात केल्या व त्याचे अमूल्य मार्गदर्शन त्यांना मिळाले .कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन . आव्हाने सर यांनी करत कार्यक्रमाचा समारोप केला. या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.

## आराध्या इग्लीश शाळेत दिलीप पवार सेवापुर्ती निरोप समारंभ

खुलताबादः येथील आराध्या इंग्लिश शाळेत , दिलीप पवार खुलताबाद जिल्हा परिषद शाळेचे उत्कृष्ट मुख्याध्यापक म्हणून सेवा विद्यार्थी घडवण्याचं काम केल्याची जाणीव ठेवून, व वाळूज केंद्र प्रमुख सेवापुर्ती निरोप समारंभात सपत्नीक आदर्श व्यक्तिमत्व गौरवार्थ गौरव, सन्मान चौथा स्तंभ पत्रकार संघर्ष समिती मार्फत स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.



यावेळी पत्रकार संघर्ष समितीचे अध्यक्ष वसंता शिरसाट गल्लेबोरगावकर यांनी मनोगत व्यक्त करताना आराध्या इंग्लिश शाळेचे विद्यार्थी व विद्यार्थिनीचे कौतुक केले कारण हे लहान विद्यार्थी विद्यार्थिनी एकदम शिस्तीने, शांत मनाने मनोगत ऐकत होते यावरून असे वाटत होते की शाळेतील शिक्षक उत्कृष्ट शिकवण मुलांना देत असल्याचे दिसून आले. शाळेतील शिक्षक वृंद व मुख्याध्यापिका यांच्या शिकवणीचा खरंच सन्मान करायला पाहिजे. हेच अवचित्य साधून सौ. शीतल देशमुख सोनवणे यांचा आदर्श मुख्याध्यापिका आणि सोनवणे सर यांचाही आदर्श व्यक्तिमत्व पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला . या वेळी सोलापूर तरुण भारत पत्रकार संतोष करपे आजिनाथ बारगळ ज्येष्ठ पत्रकार वसंता शिरसाट गल्लेबोरगावकर , तसेच अश्विनी नागे यांच्यासह सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे आराध्या इंग्लिश शाळेचे मुख्याध्यापिका शितल देशमुख सोनवणे यांनी सत्कार केला.

## छत्रपती सभाजीनगरचा गुरु भक्तानी घेतले साध्वी काचनकवरजी म. सा याचे दर्शन

छत्रपति सभाजीनगर प पु काचनकवरजी म. सा याचा २०२५ चातुर्मास बेगलोर येथे सुरु असून चातुर्मासासाठी उपस्थित असलेल्या गुरु भक्ताना साध्वी म्हणाल्या की, जैन धर्मात, जिनशानमध्ये, शिष्य आणि भक्तांसाठी आत्मकल्याणाची उत्सुकता खरोखरच महत्त्वाची आहे. आज लोक आज्ञांचे पालन करण्याचा प्रयत्न करत नाहीत. जे काम करायला हवे आहे त्याबद्दल ते बेफिकीर आहेत आणि जे काम करायला नको आहे ते उत्साहाने करतात. तीर्थंकर भगवानांनी



दिलेला आदेश पूर्णपणे पाळला पाहिजे

तक्रारी केल्याने ते अहंकाराने भरलेले आणि पुढे जाण्यास असमर्थ होतात. दुसरीकडे, तक्रार केल्याने माणूस दुःखी आणि निष्क्रिय होतो. जर तुम्हाला जीवनात यश हवे असेल तर तक्रार करणे थांबवा. सांगितले की,यावेळी छत्रपती सभाजीनगर चे जैन कान्फ्रेंस पदाधिकारी ची गुरू दर्शन यात्रा मध्ये ऑल इंडिया स्थानकवासी जैन कान्फ्रेंस चे पदाधिकारी मंडल नुकतेच विविध ठिकाणी गुरू दर्शन व चातुर्मास शुभेच्छा देण्यासाठी गेलेत

जयनगर बैंगलौर येथे चातुर्मासार्थ विराजमान असलेल्या अरिहंत आराधिका उपप्रवर्तनी परम पूज्य श्री कंचनकवरजी म सा यांच्या दर्शनार्थ पदाधिकारी मंडल आले असता संघाच्या वतीने त्यांच्या विषेश सम्मान व देव गुरु धर्म सेवेचा गौरव करण्यात आला अहमदनगर येथील सतीश लोढा महामत्री मिठालाल कांकरिया, तनसुख झांबड, मदनलाल लोढा सहमत्री दिलीप मुगदिया हजर होत यावेळी स्वागत संघाचे अध्यक्ष दीपचंद भन्साळी व बोहरा यांनी अतीथीचे स्वागत केले.

## अजिंठा परिसरात पावसाअभावी पिके सुकू लागली

तभा वृत्तसेवा

अजिंठा दि, ५ ऑगस्ट : अजिंठा परिसरातील अनाड , मुकपाट, बाळापूर , पिंपळदरी, सराटी, बोधवड, वसई, पानस डिग्रस , शिवणा आदी परिसरातील पिके पावसाअभावी सुकू लागली आहेत.

गेल्या वर्षीच्या दुष्काळातून परिसरातील शेतकऱ्यांनी कसाबसा धीर धरून या वर्षीची खरीप पेरणी मोठ्या आशेने केली आहे. खरीप हंगाम सुरू होऊन दोन महिन्यांच्यावर कालावधी होऊनही परिसरात जोरदार पाऊस न झाल्याने परिसरातील पिके रिमझिम पावसावर कशीतरी तग धरून होती. सध्या पिके उगवून डोलू लागली आहेत. परंतु पावसा अभावी ती सुकून चालली असल्याने शेतकरी पावसाची वाट पाहत आहे. कापूस सोयाबीन, बाजरी, मका, व अन्य पिके शेतात जोमात आली आहेत.



दिवसभर पावसाळी वातावरण असते पण पाऊस पडतच नाही! यामुळे शेतकर्यांच्या नजरा पावसाच्या आगमनाकडे खिळून आहेत. कधीतरी अधून मधून पावसाच्या बारीक सरी दाखल होतात. पण त्याचा उपयोग नाही. कडक उन्हात पिके सुकू लागली आहेत. खरीप पिकात वाढलेले तण काढण्यासाठी खुरपणी, कोळपणी याची कामे सुरू आहेत. या मशागतीमुळे शेतातील वरचा थर मोकळा होऊन खाली थोडा फार असलेला ओलावाही नष्ट होत आहे. त्यामुळे कोळपणी, खुरपणी नंतर पिकांना पाण्याची नितांत गरज आहे,

गेल्या चार पाच दिवसांपासून वेगाने वारे वाहत आहेत. हे वारे पाऊस आणतात की, येणार्या पावसाचे ढग पळवितो, याबाबत साशंकता आहे. प्रचंड वेगाने वारे वाहू लागले आहेत. यामुळे शेतकर्यांच्या चिंतेत आणखीच भर पडत आहे. यंदा सिल्लोड तालुक्यात अजिंठा सह बहुतांशी गावांमध्ये जोरदार पाऊस झाला नाही . बहुतांशी भागात शेतातील बांधणींना, व नदीनाल्याना पाणी तुंबलेले नाही, रस्त्याच्या कडेला असणार्या खड्ड्यांमध्ये अजूनही पाणी साठले नाही. गेल्या वर्षी समाधानकारक पाऊस झाला होता,

यावर्षी त्या तुलनेत पावसाचे प्रमाण कमी आहे. दोन तीन मुसळधार पाऊस शेतकर्यांना हवे आहेत. त्यातून खरीप तगेल, आणि जमिनीतील पाण्याची पातळीही वाढेल. परंतु अजूनही अजिंठा परिसरात मुसळधार पाऊस झालेला नाही. काही ठिकाणी मका पिके तु र्यात आहे तर सोयाबीन मुग उडीद फुलाऱ्यामध्ये आहे .भरण्याच्या वेळीस पावसाअभावी पिके सुकू लागल्याने ती हातातून जाण्याची स्थिती निर्माण झाली आहे. जोरदार पाऊस झाला नसल्याने पिकांना देण्यास परिसरातील विहिरी, बांधमध्ये पाणी नसल्याने शेतकरी हतबल झाला आहे. आतापर्यंत प्रतिएकर वीस ते तीस हजारांच्यावर शेतकऱ्यांनी पिकांना खते, औषधीसाठी खर्च केला आहे. आठ दिवसापासून पावसाने पाठ फिरविल्यामुळे पावसाअभावी उन्हाने पिके कोमजली आहेत. परिसरातील शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे लागल्या आहेत.

## ६ व ७ ऑगस्ट रोजी पावसाचा अंदाज : सतर्क राहण्याचे जिल्हा प्रशासनाचे आवाहन

अहिल्यानगर, दि.५ - जिल्ह्यात ६ व ७ ऑगस्ट रोजी विजांच्या कडकडाटासह हलक्यांपासून मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि सोसाट्याचा वारा येण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. यामुळे जिल्ह्यासाठी पिवळा इशारा (यलो अलर्ट) जारी करण्यात आला आहे.

पुणे, नाशिक आणि अहिल्यानगर जिल्ह्यांत मध्यम ते मुसळधार पाऊस होण्याची शक्यता असून जिल्ह्यातून वाहणाऱ्या भीमा, प्रवरा, गोदावरी, सीना आणि हंगा या नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होऊ शकते. मुळा धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील कोतुळ येथून मुळा नदीपात्रात विसर्ग सुरू असल्यामुळे नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी विशेष सतर्कता बाळगावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

वादळी वारा, विजा आणि पावसाच्या वेळी नागरिकांनी खबरदारी घ्यावी. झाडाखाली, टॉवर्सजवळ, ध्वज वा वीजखांबाजवळ, ट्रान्सफॉर्मर किंवा धातूच्या कुंपणाजवळ थांबू नये. विजा चमकत असताना घरातच सुरक्षित राहावे. कोणतेही विद्युत उपकरण वापरू नये. ट्रॅक्टर, शेती अवजारे, सायकल, मोटारसायकलपासून दूर राहावे. लोंबकळणाऱ्या केबल्सपासून सावध रहावे. जाहिरात फलक (होर्डिंग्ज) कोसळण्याची शक्यता असल्याने त्यांच्या आसपास थांबू नये. मोकळ्या जागेत असताना विजा चमकत असल्यास गुडघ्यांवर बसून, हातांनी कान झाकावेत आणि डोके गुडघ्यांमध्ये ठेवून जमिनीशी कमी संपर्क ठेवावा.

धरण परिसरात किंवा नदीच्या प्रवाहात उतरू नये. पर्यटनासाठी गेलेल्या नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी. धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. वादळी वारे, पाऊस आणि गारपिटीमुळे शेतीमालाचे नुकसान होऊ नये, यासाठी शेतकऱ्यांनी माल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीत माल विक्रीसाठी नेला असल्यास त्याचे नुकसान होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. जनावरेही सुरक्षित ठिकाणी हलवावीत व त्यांचे रक्षण होईल, यासाठी तयारी ठेवावी.

आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी जवळच्या तहसील कार्यालय, पोलीस ठाणे किंवा जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. जिल्हाधिकारी कार्यालयातील टोल फ्री क्रमांक १०७७ तसेच ०२४१-२३२३८४४ किंवा ०२४१-२३५६९४० या दूरध्वनी क्रमांकांवरही संपर्क करता येईल, असे प्रशासनाने कळवले आहे.

## पैठण व्यापारी महासंघाच्या अध्यक्षपदी स्वदेश पांडे



पैठण दि ०५ : पैठण शहर व्यापारी महासंघ अध्यक्ष पद तसेच ईतर कार्यकारिणी निवडी बाबत अध्यक्ष पदाचे दावेदार असलेल्या चार उमेदवारांपैकी तीन उमेदवारांनी सर्वसंमतीने श्री स्वदेश राजेंद्र पांडे यांना अध्यक्ष पदासाठी संमती दिली असता सर्व संमतीचा उमेदवार म्हणून श्री स्वदेश पांडे यांच्या अध्यक्षपदाची घोषणा तालुका व्यापारी महासंघाचे अध्यक्ष माननीय ज्ञानेश्वर उगले तसेच सचिव श्री रामेश्वर सुसे तसेच माजी व्यापारी शहराध्यक्ष पवन शेठ लोहिया बलराम सेठ लोळगे यांनी आज सर्व व्यापारी बांधवांच्या उपस्थितीत घोषणा केली. सोबतच सचिव पदी श्री उमेश भगवानराव तट्टू यांची नियुक्ती करण्यात आली. याप्रसंगी वरिष्ठ व्यापारी सोमनाथ परदेशी, महेश मुंदडा,नगराध्यक्ष सूरज लोळगे,जितू परदेशी, नगरसेवक भूषण काका कावसनकर , संजय पापडीवाल ,बाळासाहेब पठाडे, सुनील शेठ रासने कपिल काका कावसान कर, प्रकाश वानोळे, सुनीलशेठ बलदवा, विजय पापडीवाल, विलास पहाडे ,पवन शिसोदे ,उमेश बाहेती ,जुगल सेट लोहिया ,किशोर भाकरे, संतोष गोबरे, सचिन शेठ लखोटिया, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माऊली मुळे, जगदीश शेठ नागोरी, राहुल पहाडे , निवृत्ती भाऊ आदींसह व्यापारी बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

## सोयगाव येथील नॅशनल मराठी विद्यालयात मोफत दंतरोग तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे संपन्न



सोयगांव,दि.५ ऑगस्ट - येथील नॅशनल मराठी विद्यालयात गजानन डेंटल क्लिनिक शेंदुर्णी यांच्या वतीने दंतरोग तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले.यावेळी विदयार्थ्यांची मोफत दंत तपसणी करण्यात आली व टूथपेस्ट व ब्रश चे मोफत वाटप करण्यात आले. संपूर्ण शरीराचे उगमस्थान असलेल्या मौखिक आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे,शालेय जीवनापासून आरोग्याबाबत काळजी घेणे आवश्यक आहे.तसेच विदयालय राबवित असलेल्या विविध उपक्रमांचे सोयगाव पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे यांनी कौतुक केले.याप्रसंगी सोयगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर,डॉ.चैतन्य कासार,डॉ.पूजा कासार,ज्येष्ठ सामाजिक कर्यकर्ते संजय शहापूरकर,कृषिभूषण अरुण सोहनी,नगरसेवक राजू दुतोंडे, नगरसेवक हर्षल काळे,नगरसेवक गजानन कुडके, समाजसेवक विष्णू मापारी,दिगंबर वाघ,दिनेश पंडित, ह.भ.प.सुदनवा केणेकर,आदिसह विद्यालयाचे मुख्याध्यापक अमजद पठाण,प्रगती उर्दू हायस्कुलचे मुख्याध्यापक नदीम खान,पोपटराव साखळे,भाऊसाहेब सिरसाठ,ज्ञानेश्वर पांडव,नितीन पाटील,संतोष पिसे,विजय पाटील,कलीम पठाण,अन्वर खान, शेख रफिक,गजानन खराटे,सुबोध बिचारे,तुकाराम चव्हाण आदी शिक्षक वृंदासह रामेश्वर चौधरी,कदीर देशमुख,शेख जाकीर,इम्रान पठाण आदी शिक्षेकत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भगवान पाटील यांनी तर आभार पंकज साखरे यांनी मानले.

## 'बिन लग्नाची गोष्ट' - नात्यांच्या चौकटी मोडणाऱ्या गोष्टीचा हटके प्रवास

छत्रपती संभाजीनगर - नात्यांच्या पारंपरिक चौकटींना धक्का देणारा आणि एक नव्या विचारांची झलक देणारा 'बिन लग्नाची गोष्ट' या आगामी मराठी चित्रपटाचा टीझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. प्रेक्षकांची उत्सुकता वाढवणारा हा टीझर लिव्ह-इन रिलेशनशिपसारख्या आधुनिक संकल्पनेवर आधारित असून, नात्यांची नवीन व्याख्या मनोरंजनात्मकरित्या मांडतो.

चित्रपटाच्या टीझरमध्ये उमेश कामत आणि प्रिया बापट यांची जबरदस्त केमिस्ट्री पाहायला मिळत आहे. लिव्ह-इनमध्ये राहात असलेल्या या जोडप्याच्या आयुष्यात लग्नाआधीच गरोदरपणाचे वळण येते आणि त्यात एक अनपेक्षित ट्विस्टही दिसतो. याचबरोबर गिरीश ओक आणि निवेदिता सराफ यांचे नातेही पारंपरिक चौकटींपेक्षा काहीसे वेगळे असल्याचे दिसत आहे. दिग्दर्शक आदित्य इंगळे म्हणतात,प्रेक्षकांकडून टीझरला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. हा चित्रपट एक वेगळी संकल्पना घेऊन येतोय आणि त्यात नात्यांचा भावनिक प्रवास उलगडतो. उमेश आणि प्रिया यांच्या नैसर्गिक अभिनयामुळे ही कथा अधिक वास्तवदर्शी वाटते. निर्माते नितीन वैद्य म्हणतात, चित्रपटाची गोष्ट हटके असली तरी ती आपलेपणाची भावना देणारी आहे. निवेदिता सराफ आणि गिरीश ओक यांसारखे अनुभवी कलाकार या कथेला अधिक भावनिक खोली प्रदान करतात. प्रेक्षकांना हा चित्रपट नक्कीच भावेल, असा विश्वास वाटतो. 'बिन लग्नाची गोष्ट' हे चित्रपट गॉडगिफ्ट एंटरटेन्टमेंट प्रा. लि. आणि एस. एन. प्रॉडक्शन्स यांनी निर्मित केला असून, तेजश्री अडिगे आणि नितीन वैद्य प्रॉडक्शन प्रस्तुत आहे. या चित्रपटात प्रिया बापट, उमेश कामत, निवेदिता सराफ आणि गिरीश ओक यांच्या प्रमुख भूमिका आहेत.


## जाहीर प्रगटन

**(गट नं. ८६/पार्ट, प्लॉट नं. ६४, एकुण १९६० चौ. फुट, मी. नं. ६४८६ मौजे देवळाई, ता.जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद))**

तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार शोयब कदीर देशमुख, रा. सोयगांव ता. सोयगांव जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद) यांना बबन फत्तु जाधव रा. सिंदोन ता. जि.छ. संभाजीनगर (औरंगाबाद) यांनी त्यांच्या मालकीची मिळकत मौजे देवळाई ता.जि.छ. संभाजीनगर (औरंगाबाद) मनपा हद्दीतील गट नं. ८६ मधील गंगोत्रीनगरचा प्लॉट नं. ६४ ज्याचे क्षेत्रफळ २९ बाय ४० म्हणजे ११६० चौ. फुट ज्याचे चौ. मी. १०७.८० होतात ही कायमस्वरुपी विक्री करण्याचा निर्णय केला आहे.

सदरील प्लॉट नं. ६४ ची चतुःसिमा खालील प्रमाणे.

पुर्वेस : १५ फुटाचा रोड

पश्चिमेस : प्लॉट नं. ६३,

दक्षिणेस : प्लॉट नं. ६५

: गट नं. ८६ पार्ट उत्तरेस

तरी सदरील प्लॉट मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम असुन दोषमुक्त आहे व कसल्याही प्रकारची कोणाचाही हितसंबंध नाही. असे कळविलेले आहे. येणेप्रमाणे सदर प्लॉट मिळकतीबाबत किंवा कसल्याही प्रकारचा कोणाचाही आक्षेप/उजर, हितसंबंध असेल किंवा कोणत्याही प्रकारचे व्यवहार किंवा करार, विक्री, दान, गहाण, तारण, लिज, बांध, चर्तुसिमा, सिमा हद्दी, चोळी- बागडी इत्यादी असल्यास किंवा कोणत्याही कारणाने आक्षेप असल्यास मिळकतीशी किंवा व्यवहाराशी असलेले हितसंबंध /आक्षेप खालील दिलेल्या पत्त्यावर मुळ कागदपत्रांसह लेखी स्वरुपात हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन (८) दिवसाच्या आत आपले आक्षेप/उजर नोंदवावा. सदरील मुदतीत कोणताही आक्षेप / उजर न आल्यास सदर मिळकत पुर्णपणे निर्विवाद व दोषमुक्त व वरील उल्लेखित मालक व्यतिरिक्त कोणताही मालकी हक्क नाही असे समजुन आमचे पक्षकार खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर कोणताही उजर /आक्षेप आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी. करीता हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

दिनांक : ०४/०८/२०२५

ठिकाण : सोयगांव

ॲड. योगेश आर जावळे

कार्यालय : सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद,

मो. ९४०३२५१७४६/९८९०५९०३४७

## अग्रलेख...

# टवाळी नावडे विनोदास...

विनोद हे आनंदी मनाचे पहिले लक्षण असते. जेव्हा मन आनंदी असते, चिंतामुक्त असते आणि सर्वत्र सारे काही आलबेल असल्याची शाश्वती असते, तेव्हा विनोदबुद्धीला बहर येतो. आजकाल विनोदाचे वावडे असलेल्यांची संख्या झपाट्याने वाढत असल्याने, विनोदबुद्धीची कदर करण्याची मानसिकता त्याच वेगाने कमी होत चालली असावी. अन्यथा, विनोदाने केलेल्या कोट्या, टीका, व्यंगात्मक टिप्पण्या किंवा टोमणे हलकेच घेण्याची सवय समाजाने समंजसपणे जोपासली असती. विनोद हे निर्भेळ जगण्याचे निखळ माध्यम आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. विनोदाची एवढी महती जर सत्य असेल, तर विनोदाने केलेल्या कोणत्याही वक्तव्याचा बाऊ करून त्यावरून एखाद्यास लक्ष्य करत गदारोळ माजविणे हे मनाच्या कमकुवतपणाचे लक्षणच म्हणावे लागेल. 'टवाळा आवडे विनोद' असे गंभीर प्रवृत्तीच्या माणसांचे अकारण झालेले मत असते.

कोणत्याही प्रसंगोपात्त विनोदास माफक अशी दिलदार दाद द्यावी, विनोदाच्या दर्जानुसार कमी-अधिक हसून त्यास खुला प्रतिसाद द्यावा किंवा त्यातील व्यंगाचे मर्म नेमके ओळखून ते व्यंग दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करावा, हे सामाजिक सुदृढतेचे खरे लक्षण असते. अलिकडे मात्र ते काहीसे बिघडत चालले आहे. अन्यथा, विनोदाने केलेल्या टिप्पणीची खुमारी लक्षात न घेता त्याचे काटे बोचल्याचा बाऊ करणाऱ्यांनी एखाद्या मंत्र्यांच्या विनोदबुद्धीचा एवढा गहजब केला नसता. खरे म्हणजे, जेव्हा राज्यकर्त्यांना विनोद सुचतात, तेव्हा सारे काही आलबेल आहे असे समजावयास हवे. कारण परिस्थिती जेव्हा चिंताजनक असते, राज्यातील सामाजिक वातावरण बिघडलेले असते, समाज कोणत्या ना कोणत्या समस्यांशी सामना करताना मेटाकुटीस आलेला असतो आणि समस्यामुक्तीच्या आशेने समाजाच्या नजरा जेव्हा सरकारांकडे किंवा संबंधित मंत्र्यांकडे लागलेल्या असतात, तेव्हा समाजाच्या अपेक्षांची गांभीर्याने दखल घेण्याएवढा समंजसपणा मंत्री वा सरकारांकडे खचितच असतो. त्यामुळे हे गांभीर्य खुंटीवर टांगून कोणीही जबाबदार व्यक्ती अकारण विनोदाची कारंजी फुलवत बसणार नाही आणि अशा कारंज्यातून मनाचे व समाजाचे मनोरंजन करण्याची बुद्धीही कोणास सुचणार नाही, हे लक्षात घ्यावयास हवे. राज्याचा एखादा मंत्री जनतेवर उदारहस्ते सुविधा, सोयींची अथवा कोणत्याही योजनांची खैरात करत असेल आणि त्यासाठी कोणत्याही समस्यांचा अडथळा नसल्याची त्यास खात्री वाटत असेल, तर राजा उदार झाला आहे, हे जनतेने समजून घ्यायला हवेच; पण उदारहस्ते उधळण्याइतपत त्याच्या खजिन्यात पुरेसा साठादेखील आहे, याची खात्री वाटून आनंदी असावयास हवे. शेवटी, जनतेच्या खिशात हात घालून करांच्या रूपाने वा अन्य महसुलाच्या रूपाने सरकारच्या तिजोरीत येणारा प्रत्येक पैसा हा जनतेच्या हितासाठीच वापरला जाणे हे कल्याणकारी राज्यव्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण असते. त्यामुळे जनतेकडून घेतलेले पुन्हा जनतेला देताना हात सैल सोडणाऱ्या राज्यकर्त्याच्या मनात, हा पैसा आपल्या बापजाद्यांचा नाही, याची जाणीव असणे हे त्याच्या प्रामाणिकपणाचे लक्षण समजावयास हवे. जे जनतेकडून गोळा केले, त्याचाच हिस्सा जनतेसाठी उधळताना, आपल्या बापजाद्यांचे काय जाते हा विचार म्हणजे उच्च पातळीच्या निरिच्छपणाचे आदर्श उदाहरण मानावयास हवेच, पण तसे बोलून दाखविण्याचे औदार्य हे त्याहूनही वेगळ्या उंचीच्या मानसिकतेचे उदाहरण मानावयास हवे. राज्याच्या कोणा मंत्र्याने जनतेस काही आश्वासने देताना, हीच निरिच्छ भावना त्याच्या हलक्याफुलक्या मानसिकतेने व्यक्त केली. खरे तर याकडे विनोदाने पाहावयास हवे आणि तसे पाहावयाचे ठरविले, तर राज्याच्या तिजोरीची स्थिती भक्कम असल्याच्या निश्चिंततेची खात्री संबंधित मंत्र्यास नक्कीच असावी, याचीही खूणगाठ मनामनात बांधली गेलेली असावयास हवी. मंत्र्याचे मन चिंतामुक्त असल्याखेरीज तो एवढ्या आश्वस्तपणे जनतेस दिलासा देण्यास धजावला नसता, हेही लक्षात घ्यावयास हवे. विनोदाच्या अंगाने त्याच्या या निश्चिंततेकडे पाहिल्यास, राज्यात सारे काही आलबेल आहे आणि कोणत्याही समस्येस तोंड देण्याएवढा भदकमपणा तिजोरीतील पुंजीकडे आहे, याची खात्री पटते. तसे न होता, राज्याच्या एका मंत्र्याच्या अशा हलक्याफुलक्या टिप्पणीचा गदारोळ माजावा आणि त्या मंत्र्याच्या सैल जिभेतून उमटलेला सहजबुद्धीचा विनोद समाजास समजावून सांगण्याची वेळ खुद्द मुख्यमंत्र्यांवरच यावी हे काही ठीक नाही. महाराष्ट्र ही विनोदाची कदर करणारी, विनोदाचा आदर करणारी आणि विनोदास निखळ दाद देणाऱ्या संस्कृतीची भूमी आहे. या भूमीत आचार्य अत्रे यांनी आपल्या विनोदी शब्दांच्या फटकाऱ्यांनी राज्यकर्त्यांस गुदगुल्या केल्या आणि हसवत हसवत अनेकांना वठणीवरही आणले. पु.ल. देशपांड्यांचा विनोद याच मातीत बहरला. विनोदाचा असा प्रदीर्घ वारसा असलेल्या या भूमीत एखाद्या मंत्र्याने हलकेच केलेल्या एखाद्या विनोदाचे एवढे वावडे वाटावे आणि त्यावरून राजकारणाचे रंगच ढवळून निघावेत, हे विनोदाचा वारसा असलेल्या महाराष्ट्रात घडावयास नको होते. मंत्रीदेखील माणूसच असतो आणि सारे काही ठाकठीक, आलबेल असल्याच्या जाणिवेने तो निश्चिंत असतो, तेव्हा एखादा विनोद सुचावा आणि विनोदास दाद देण्याच्या परंपरेस जागून राजकारणाच्या गदारोळातही त्या विनोदाची कारंजी फुलावीत या अपेक्षेने त्याने आपली जीभ जराशी सैल सोडली, तर त्यास त्याचा जिभेचे घसरणे मानून त्यावर सर्वांनी घसरून पडावयास हवेच असे नाही. बरे, एकंदरीत समाजच गंभीर आहे, राजकारणातही सारे काही गांभीर्याने सुरू आहे असेही नाही.

एकीकडे समाजजीवनही वेगवेगळ्या कारणांनी विनोदी वाटू लागावे अशी परिस्थिती आहे. राजकारणातही अनेक जण टोमणे, कोट्या आणि विनोद करत रंग भरण्याचा प्रयत्न करत असतात. एकूणच गांभीर्याचे वातावरण सगळीकडेच कमी होत गेलेले असताना, दररोजचे जगणेच काहीसे विनोदी होत चालले असताना, त्यामध्ये आपल्याही विनोदाचा खारीचा वाटा उचलावा असे वाटून एखाद्या मंत्र्याने अशी काही टिप्पणी केलीच, तर तेही उदार मनाने समजून घ्यावयास हवे. तसे होत नसल्यामुळे समाजास विनोदाचे मर्म समजावून सांगण्याची वेळ आली तर विनोदबुद्धीचा बहर ओसरत चालल्याचे ते सामाजिक लक्षण समजावे लागेल. वसतिगृहासाठी हवा तेवढा निधी मागा, नाही दिला तर नाव सांगणार नाही, तसेही हा पैसा सरकारचा आहे, तो द्यायला आपल्या बापाचे काय जाते, हा राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांचा विचार दोन दिवसांपासून राज्यात आणि राजकारणात काहीसा गदारोळ माजवत आहे. पण विनोदाचे अंग जागृत असलेल्यांनी त्याकडे त्याच नजरेने पाहिले, तर शिरसाट यांच्यासारखा उदार राजा मिळाल्याच्या जाणिवेने त्यांना आनंदाचे भरते येईल. हा पैसा आपला नाही आणि आपल्या बापाचाही नाही, तर तो सरकारचा म्हणजेच जनतेच्या करातून वा अन्य महसुलातून जमलेला असल्याने जनतेने मागत जावे आणि आपण देत जावे ही उदार मानसिकता म्हणजे स्थैर्याच्या शाश्वतीचे उत्तम उदाहरणच म्हणावे लागेल. त्यामुळेच त्यांची जीभ घसरली असे वाटून अनेकांनी त्यांच्या वक्तव्यास आक्षेप घेण्यास सुरुवात केली, तेव्हा खुद्द मुख्यमंत्र्यांना तो विनोद समजावून सांगण्याची वेळ आली. एखादा विनोद समजावून सांगण्याची वेळ कोणावरही येणे आणि एखाद्या नामवंताचे चित्र रेखाटल्यानंतर त्याची ओळख पटावी म्हणून त्याखाली त्या व्यक्तीचे नाव लिहावे लागणे या दोन्ही बाबी कलेस कमीपणा आणणाऱ्याच असतात. विनोद ही एक कलाच आहे. प्रत्येकास ती चपखलपणे जोपासता येतेच असे नाही. काही जणांकडे विनोदबुद्धी असते, पण आपल्या विनोदावर लोकांनी निखळ दाद देऊन मोकळेपणाने हसावे व विनोदाचा आस्वाद घ्यावा अशा रीतीने तो सादर करण्याची कला प्रत्येकाकडे असतेच असे नाही. शिरसाटांचे तसेच काहीसे झाले असावे. विनोद सादर करताना स्थळकाळाचे भान असावे लागते. अन्यथा, विनोदाचे अस्त्र अंगावरच उलटते. शिरसाटांचा विनोद त्यांच्यावर उलटला, त्यामागेही हेच कारण असावे. यापुढे विनोद करताना त्यांनी या बाबींचे भान राखले, तर मुख्यमंत्र्यांना पुढे येऊन तो समजावून सांगण्याची वेळ येणार नाही आणि समाजासही मोकळेपणाने दाद देण्याची मुभा राहील, एवढे त्यांनी करायलाच हवे!

## आंतरराष्ट्रीय

# भारत-अमेरिका दुराव्याचा पाकला फायदा?

प्रा. जयसिंग यादव

२०१९ मध्ये अमेरिकेतील टेक्सास येथे झालेल्या 'हाऊडी मोदी' कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या संदर्भात 'अबकी बार ट्रम्प सरकार'चा नारा दिला. पुढच्या वर्षी ट्रम्प भारतात आले, तेव्हा अहमदाबादमध्ये त्यांच्या स्वागतासाठी 'नमस्ते ट्रम्प' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ट्रम्प आणि मोदी यांची वैचारिक नाळ जुळली आहे, दोघे परस्परांचे मित्र आहेत, असे चित्र जगभर रंगवले गेले. २०२४ मध्ये पंतप्रधान मोदी तिसऱ्यांदा सत्तेत आले, तर ट्रम्प हेही चार वर्षांनंतर पुन्हा सत्तेत आले. माध्यमांनी पुन्हा दोन्ही नेत्यांमधील संबंधांच्या दृष्टिकोनातून भारत-अमेरिका संबंधांकडे पाहण्यास सुरुवात केली; परंतु गेल्या सुमारे सहा महिन्यांमध्ये असे दिसते की, दोन्ही नेत्यांमधील संबंध पूर्वीसारखे राहिलेले नाहीत. अध्यक्ष झाल्यानंतर ट्रम्प यांनी अनेक देशांवर शुल्क म्हणजेच व्यापार शुल्क लादण्याची घोषणा केली. त्यात त्यांचा भारतावर अधिक रोष आहे. भारत जगात सर्वाधिक आयात शुल्क आकारतो, असा आरोप त्यांनी वारंवार केला आहे. अमेरिकेने भारताला रशियाकडून एस-४०० क्षेपणास्त्र खरेदी करू नका, असे सांगितले होते; परंतु भारताने अमेरिकेला न जुमानता रशियाकडून ही क्षेपणास्त्रे खरेदी केली. युक्रेन-रशिया युद्ध सुरू झाल्यानंतर अमेरिका आणि 'नाटो'ने रशियावर अनेक निर्बंध लादले. हे निर्बंध धुडकावून भारत आणि चीनने रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी सुरू केली. भारताला रशियातून स्वस्तात कच्चे तेल मिळते. भारतीय कंपन्यांनी रशियातून कच्चे तेल खरेदी करून, त्यावर प्रक्रिया करून जगातील अनेक देशांना विकले. यामुळे अमेरिकेचा तिळपापड झाला आहे. रशिया आणि अमेरिकेत सध्या तणावाचे वातावरण आहे. या पृष्ठभूमीवर ही भारताने रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणे सुरूच ठेवले आहे. ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के शुल्क लावण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतरही भारताने रशियाशी मैत्रीसंबंध पूर्वीसारखेच राहतील, असे जाहीर केल्यामुळे ट्रम्प यांचे पित्त खवळले. याच वळणावर अमेरिकेने पाकिस्तानसोबत तेलाचे साठे विकसित करण्यावर करार केला. अर्थात पाकिस्तानला ते इतक्या सहजासहजी करता येणार नाही. त्याचे कारण हे साठे बलुचिस्तान प्रांतात आहेत आणि तिथे आता बंडखोरांची सत्ता चालते. अमेरिका आणि पाकिस्तानच्या करारानंतर बलुचिस्तानमधून या कराराविरोधात भाष्य व्हायला लागले आहे. ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के कर लादल्यामुळे अल्पकालीन काळात निर्यात निश्चितच कमी होईल. निर्यातदारांचे उत्पन्नही कमी होईल. त्याचा दीर्घकालीन परिणाम अधिक महत्त्वाचा आहे, कारण जर हे शुल्क एका वर्षापेक्षा जास्त काळ असेच राहिले, तर पुरवठा साखळीत बदल होऊ शकतो. पहलगाम हल्ल्यानंतर ट्रम्प यांनी आगाऊपणा केला. 'ऑपरेशन सिंदूर' आपणच थांबवायला भाग पाडले, असे त्यांनी वारंवार सांगितले. त्यामुळे विरोधकांच्या हाती आयते कोलित आले. विरोधकांनी प्रश्न उपस्थित केला की, तुम्ही द्विपक्षीय बाबींमध्ये अमेरिकेचा हस्तक्षेप कसा होऊ दिला? विशेषतः संरक्षण बाबींमध्ये नेहमीच कठोर भूमिका घेणाऱ्या भाजपाला बॅकफूटवर जावे लागले. पंतप्रधानांना संसदेत स्पष्टीकरण द्यावे लागले.

अमेरिकेला भारताकडून हवे आहे, ते भारत देऊ शकत नाही. ट्रम्प यांना वाटते की, अमेरिकेच्या कृषी उत्पादनांसाठी भारताने दरवाजे खुले केले पाहिजेत. भारताने या उत्पादनांवर आधीच कर लादून भारतीय शेती क्षेत्र संरक्षित केले आहे. याशिवाय मांसभक्षक अमेरिकन गायींचे दूध आणि दुग्धजन्य पदार्थ भारतात येऊ द्यायला अनेकांचा विरोध आहे. हा प्रश्न भावनिक झाला असून अमेरिकेशी असणाऱ्या मैत्रीसाठी भाजपा आपली मतपेढी दुखावू शकत नाही. ट्रम्प यांचा झालेला सत्कार, त्यांना मिळालेली वागणूक यामुळे त्यांचा असा समज झाला की आपण म्हणू ते मोदी करतील; परंतु तसे झाले नाही. त्यामुळे त्यांचे पित्त खवळले. ट्रम्प यांनी ज्या प्रकारे भारतावर शुल्क लादले आहे आणि रशियाकडून तेल आणि संरक्षण उपकरणे खरेदी केल्याबद्दल दंड लावला आहे, तो एक प्रकारे आपल्या सार्वभौमत्वावर हल्ला आहे. आपण कुठून काय खरेदी करावे हे अमेरिका कसे सांगू शकते? इराणसोबत व्यवसाय केल्याबद्दलही अमेरिकेने सहा भारतीय कंपन्यांवर बंदी घातली आहे. एकीकडे भारत आणि अमेरिका संबंधांमध्ये कटुता येत असताना अमेरिका आणि पाकिस्तानमध्ये तेलाच्या साठ्यांबाबत करार झाला. दोन्ही देशांमधील व्यापार कराराचीही चर्चा झाली. पाकिस्तानमध्ये या कराराचे स्वागत केले गेले आहे. त्या देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी हा एक अतिशय महत्त्वाचा करार आहे. अमेरिका आणि इतर देशांसोबतच्या राजनैतिक संबंधांसाठीही हा एक मोठा विजय मानला जात आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये पाकिस्तानची अर्थव्यवस्था खूप वाईट परिस्थितीतून गेली आहे. आता सरकार दावा करत आहे की, ती 'टेक ऑफ पोझिशन'वर आली आहे. या प्रसंगी पाकिस्तानी निर्यातीला चालना मिळाली, तर पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेला मोठा आधार मिळेल. गेल्या २० वर्षांपासून किंवा त्याहूनही अधिक काळ पाकिस्तान सरकार विविध खासगी कंपन्या आणि देशांना तेलाच्या साठ्यावर किंवा वायूच्या साठ्यावर काम करण्यासाठी आवाहन करत होते; परंतु सुरक्षेच्या कारणास्तव आणि तंत्रज्ञानामुळे किंवा इतर कारणांमुळे कंपन्या येत नव्हत्या. या पृष्ठभूमीवर ट्रम्प यांनी पाकिस्तानला आश्वस्त केले आहे. एखादी मोठी अमेरिकन कंपनी त्यांच्या तंत्रज्ञानासह आली, तर ती त्यांच्याकडे असलेल्या तेल आणि वायूच्या साठ्यांचा शोध घेण्यासाठी खूप उपयुक्त ठरेल. याचा अर्थ असा की, गेल्या २० वर्षांपासून पाकिस्तान सामना करत असलेले ऊर्जा संकट सोडवण्यास मदत होईल. पाकिस्तान सरकार हा आपला राजनैतिक विजय म्हणूनही साजरा करत आहे. दरम्यान, अधिक शुल्क लादण्यात आल्याचा फटका भारतीय वस्त्रोद्योगासह अन्य उद्योगांना बसणार आहे. त्याचा फायदा पाकिस्तान आणि बांगलादेशमधील कापड उद्योगाला होईल. पाकिस्तानच्या निर्यातीत कापड उद्योगाचा वाटा ८० टक्के आहे. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताचा विजय झाला असला, तरी पाकिस्तान मात्र आपलाच विजय झाल्याचा दावा करतो. आता तर त्याने राजनैतिक आघाडीवरही भारताचा पराभव केला आहे, असे सांगायला सुरुवात केली आहे. भारताची विमाने पाडल्याचे सांगत ट्रम्प यांनी पाकिस्तानची तळी उचलून धरली.

अमेरिकेत सरकारी तेल कंपन्या नाहीत. तिथल्या सर्व कंपन्या खासगी आहेत, मग कोणत्या कंपनीने हा करार केला आणि कधी केला, असा प्रश्न उपस्थित केला जातो. अमेरिका आणि पाकिस्तान जगाच्या डोळ्यात धूळफेक करत असल्याचा सूर तज्ज्ञांनी लावला आहे. कोणत्याही कंपनीने कोणताही करार केलेला नाही. ट्रम्प काहीही बोलतील आणि कंपन्या पाकिस्तानात येतील, असे अजिबात घडणार नाही. अमेरिकन सरकार पाकिस्तानमध्ये जाऊन काम करण्याचा आपला हेतू व्यक्त करू शकते; पण कंपन्या सुरक्षित वातावरण असतील तरच जातील. बलुचिस्तानमध्ये काम करणे किती अवघड आहे, याचा अनुभव चिनी कंपन्यांना आला आहे. या पृष्ठभूमीवर अमेरिकन कंपन्या हे कच्च्या तेलाच्या संशोधनासाठी बलुचिस्तानमध्ये कितपत येतील, याबाबत साशंकता आहे. पाकिस्तान काही काळापासून म्हणत आहे की, त्यांच्याकडे गॅस आणि तेलाचे मोठे साठे आहेत. म्यानमार आणि बांगलादेश अनेक वर्षांपासून म्हणत आहेत की, त्यांच्याकडे मोठे साठे आहेत; परंतु आंतरराष्ट्रीय कंपन्या ते प्रमाणित करेपर्यंत हे साठे वैध नाहीत. या कंपन्या वैज्ञानिक आधारावर ते प्रमाणित करतात आणि संपूर्ण जग तो डेटा पाहू शकते. अजून असे काहीही घडलेले नाही.


(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

# नैराश्याच्या खोल गर्तेत राहुल गांधी

चंद्रकांत लोहाणा

नैराश्याने ग्रासलेल्या राहुल गांधी यांनी देशविरोधी वक्तव्य करून या देशामधील १४० कोटी जनतेचा अपमान केला आहे. सत्तेसाठी वाटेल ते करण्याची परंपरा काँग्रेस पक्ष इमाने इतबारे पुढे रेटत असला, तरी त्या पक्षाच्या या नीतीने देशाचे फार मोठे नुकसान होऊ शकते, याची तमा न बाळगता राहुल गांधी मुक्ताफळे उधळीत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी देशहिताच्या आड येणारी प्रत्येक कृती उधळून लावत असून आपल्या धमक्यांना भीक घालीत नसल्याचे बघून चवताळलेल्या अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताच्या अर्थव्यवस्थेला 'डेड इकॉनामी' म्हणून भारताला हिणवण्याचा गंभीर प्रयत्न केला. डोनाल्ड ट्रम्प यांच्या सुरात सूर मिसळून राहुल गांधी नरेंद्र मोदी यांच्यावर तुटून पडले. डोनाल्ड ट्रम्प अगदी सत्य बोलतात असा ढिंढोरा पिटायला सुरुवात केली. राहुल गांधी यांच्या या बेताल वक्तव्याने राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाच्या देशभक्तीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. सत्तेसाठी देशहित वेशीवर टांगून राहुल गांधी कोणत्याही थराला जाऊ शकतात, याचे हे ज्वलंत उदाहरण आहे. खरे तर असे वक्तव्य देशद्रोहाचा गुन्हा ठरायला हवा. परंतु, दुर्दैवाने असे होत नाही. अमेरिका स्वतःला संपूर्ण जगाचा दादा मानत असला, तरी भारताच्या प्रगतीने त्यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. भारतीय अर्थव्यवस्था जगामध्ये चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत आहे. हेच डोनाल्ड ट्रम्प यांचे खरे दुखणे आहे. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेची वाढ १.९ टक्के असून चीनची ४.८ टक्के, ब्रिटनची १.२ टक्के, जर्मनी ०.१ टक्के तर जपानची अर्थव्यवस्था ०.७ टक्के एवढ्या कमी दराने पुढे सरकत आहे. तर, भारताची अर्थव्यवस्था ६.४ टक्क्याने वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. 'राष्ट्र सर्वोपरी' हे ध्येय समोर ठेवून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या एकाही कृतीला भीक घातली नाही. भविष्यामध्ये भारत जर आपल्या बरोबरीने येऊन बसला तर जगामध्ये आपणास कुत्राही विचारणार नाही, या गहन चिंतेने डोनाल्ड ट्रम्प यांची झोप उडाली आहे. संपूर्ण जग मंदीच्या सावटाखाली असताना भारतीय अर्थव्यवस्था उभारी घेत आहे. अमेरिकेच्या दादागिरीला कंटाळलेले अनेक देश त्यामुळेच भारताकडे आशेने बघत आहे. आपल्या अथक प्रयत्नांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आम्ही सर्व एक समान आहोत असा दृढ विश्वास जगामध्ये रुजविला आहे. आजमितीस प्रत्येक आघाडीवर भारत आपला ठसा जगावर उमटवित आहे. ज्या भारतीय अर्थव्यवस्थेला राहुल गांधी डेड इकॉनामी म्हणून संबोधतात त्याच राहुल गांधींनी नरेंद्र मोदी यांच्या ११ वर्षांच्या कार्यकाळामध्ये शेअर मार्केटमध्ये करोडो रुपयांची कमाई केली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या परिवारानेही भारतामध्ये उद्योगामध्ये करोडो रुपये गुंतविले आहेत. भारताच्या मुंबई, पुणे, गुरुग्राम आणि कोलकाता या चार शहरांमध्ये ट्रम्प टॉवरची मालमत्ता आहे. ट्रम्प टॉवरमध्ये लक्झरी अपार्टमेंट असून या प्रॉपर्टीची किंमत फार जास्त आहे असे म्हणतात. डोनाल्ड ट्रम्प परिवाराने भारतात ट्रम्प कार्ड खेळून मोठी कमाई केली आहे. त्यामुळे राहुल गांधी यांनी डोनाल्ड ट्रम्प यांना जाब विचारायला हवा. जर भारतीय अर्थव्यवस्था मृतप्राय असेल तर ट्रम्प टॉवरची करोडोंची मालमत्ता कशी विकली जात आहे. परंतु, काँग्रेस पक्षाचा इतिहास बघता राहुल गांधींकडून अशा देशहिताच्या गोष्टींची अपेक्षा करताच येऊ शकत नाही. मताच्या लालसेपायी लांगूलचालन करणाऱ्या काँग्रेस पक्षाचे ओझे भारतीय जनतेने कधीचेच फेकून दिले आहे. हे अजूनही राहुल गांधी यांच्या लक्षात येत नाही. देशहित बाजूला ठेवून परकीय शक्तीशी हातमिळवणी करणाऱ्या काँग्रेसला जनतेने गव्हामधील खड्यासारखे उचलून बाहेर फेकले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वारंवार अपमानित करूनही आपले ध्येय साध्य होत नाही, हे लक्षात येताच राहुल गांधी आता देशविरोधी वक्तव्य करून स्वतःचे हसे करून घेत आहेत. आपल्या नावापुढे 'गांधी' हे बिरूद लावलेल्या या परिवारास देशाने काय नाही दिले; त्याची परतफेड तर दूरच, उलट राहुल गांधी यांनी भारताला जगामध्ये बदनाम करण्याचा चंग बांधल्याचे दिसून येत आहे. हे कोणाच्या इशाऱ्यावर होत आहे, हे शोधण्याची खरी गरज आहे.



९८८१७१७८५६

## इतस्ततः

# शिक्षण आणि रोजगार : सारे बेजार!

दत्तात्रेय आंबुलकर

आपल्याकडे गेल्या ५० वर्षांत एकीकडे शैक्षणिक क्षेत्रातील उच्च-शिक्षणाचा प्रसार आणि व्याप वाढत आहे. दरवर्षी वाढणाऱ्या या संख्येत उच्च-माध्यमिक, पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्यांची संख्याही वाढत आहे. अनेक विद्यार्थी उच्च शिक्षण घेत असतानाच आज मोठ्या प्रमाणात सुशिक्षित बेरोजगारांची संख्याही देश आणि समाजापुढे उभी ठाकली आहे. या सुशिक्षित विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण मिळत नाही; विविध उद्योग क्षेत्रांना त्यांच्या कौशल्यविषयक गरजांची पूर्तता करणारे विद्यार्थी-उमेदवारही त्यामुळे मिळत नसल्याची तक्रार विद्यार्थी-पालक व उद्योग क्षेत्रातून सातत्याने होत असल्याचे दिसून येते.

१९६० च्या दशकातील शैक्षणिक अभ्यासक्रम व पद्धतीनुसार विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील उच्च शिक्षणामध्ये, कौशल्य विकास शिक्षणासंबंधित विकासाची जोड देण्यावर औपचारिकपणे पहिल्यांदाच विचार करण्यात आला. कोणत्याही स्वरूपातील शिक्षणाला प्रत्यक्ष प्रशिक्षणाची जोड मिळाली, तरच त्यातून संबंधित विद्यार्थी-उमेदवारांना नोकरी मिळून रोजगार निर्मिती होऊ शकते. अभ्यासक्रमावर आधारित पुस्तकी ज्ञान वा पदविका-पदवी, प्रत्येक नोकरी-रोजगारासाठी पूरक ठरेलच असे नाही. यातूनच शैक्षणिक अभ्यासक्रमांना व त्यातही विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या जोडीला, कौशल्याची जोड देण्याची वाढती मागणी उद्योगविश्वातून होऊ लागली.

महाविद्यालये वा विद्यापीठांमधून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना, कौशल्य प्रशिक्षण देण्याची कल्पना शिक्षण व उद्योग क्षेत्रांतर्गतच्या विचारविनिमयातून पुढे आली. यातूनच अभियांत्रिकी-तंत्रज्ञानासारख्या विषयांमधून नव्याने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना, त्यांच्या शैक्षणिक विषयाशी संबंधित प्रत्यक्ष सराव व विषयतज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळण्यासाठी, उमेदवारी प्रशिक्षण कायद्यांतर्गत व्यापक प्रशिक्षण योजना अस्तित्वात आली. यामुळे महाविद्यालयीन शिक्षणामध्येच विषयाशी संबंधित प्रशिक्षणाची जोड मिळू लागली. त्यापूर्वी चीनसारख्या उद्योगप्रधान देशाने जागतिक स्तरावर दाखवून दिले होते की, जेव्हा तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये विविध विषयातील शिक्षणाला मार्गदर्शनासह प्रत्यक्ष सरावाची योजनापूर्वक जोड दिली जात नाही, तोपर्यंत देशाच्या उद्योग-व्यवसायाच्या वाढीसाठी त्याचा परिणामकारक उपयोग होत नाही. चीनने ३० वर्षांमध्ये ४५ हजार किमीचे बुलेट ट्रेनचे जाळे जागतिक स्तरावर सर्वप्रथम विणल्याचा व्यावहारिक दाखला त्यावेळी दिला गेला.

विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्राप्रमाणेच इतर क्षेत्र व अभ्यासक्रमांमध्ये केवळ पाठ्यपुस्तके व शैक्षणिक अभ्यासक्रम कधीच पुरेसा ठरू शकत नाही. गैर अभियांत्रिकी अभ्यासक्रमामध्येही, शैक्षणिक अभ्यासक्रम व पात्रतेला संबंधित क्षेत्र वा विषयातील ज्ञानाची जोड मिळणे तेवढेच महत्त्वाचे ठरते. अशा प्रकारे अभ्यासासह ज्ञान असणारे विद्यार्थी-उमेदवार, स्वाभाविकपणे अधिक रोजगारक्षम ठरतात. एवढेच नव्हे, त्यांच्या संबंधित क्षेत्रातील ज्ञानाचा उपयोग त्यांना, प्रसंगी संबंधित विषय-क्षेत्रातील अधिक जाणकार बनवतात. उद्योग-व्यवसायाला नेहमी अशाच अनुभवी आणि ज्ञानसंपन्न कौशल्यप्राप्त उमेदवारांची गरज भासते. अर्थात त्याचवेळी शासन-शिक्षण क्षेत्राला या मुद्याची जाणीव झाली की, विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील फक्त शिक्षण दिल्याने, विद्यार्थ्यांमध्ये त्या त्या क्षेत्रातील कौशल्ये निर्माण होतातच असे नाही. मात्र, त्यांच्यामध्ये शिक्षण व कौशल्य विकास दोन्ही केल्यास, त्यांना नोकरी-रोजगार मिळण्यासाठी त्याचा फायदा नक्कीच होऊ शकतो. गैर-अभियांत्रिकी शिक्षण-कौशल्याच्या संदर्भात हीच बाब सांगता येईल. यासंदर्भातील प्रमुख उदाहरण पुणे-खडकवासला येथील 'राष्ट्रीय संरक्षण अकादमी' (एनडीए) चे देता येईल. त्याठिकाणी प्रशिक्षित युवा उमेदवार संरक्षण क्षेत्राशिवाय संगणकशास्त्र, प्रशासन, कायदा, वित्तीय सेवा इ. क्षेत्रांत, सहज व सक्षमपणे कार्यरत होऊ शकतात. हीच बाब वाणिज्य, कर क्षेत्र, बँकिंग इ. क्षेत्रांतील प्रशिक्षित उमेदवारांच्या संदर्भातही सांगता येईल. अशा प्रशिक्षित व कौशल्यपूर्ण उमेदवारांचा फायदा, उद्योग-व्यवसाय क्षेत्राला कायमस्वरूपी व दीर्घकालीन संदर्भात होतो.

शिक्षण-प्रशिक्षण व त्याद्वारे नोकरी-रोजगारासाठी आवश्यक कौशल्यप्राप्ती व विद्यार्थी-उमेदवारांना मिळणाऱ्या प्रत्यक्ष संधी यासंदर्भात करण्यात आलेल्या एका अभ्यासानुसार, ३.५ कोटी विद्यार्थ्यांपैकी सुमारे ६० टक्के विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमाशी संबंधित नसणाऱ्या क्षेत्रात नाईलाजाने नोकरी स्वीकारावी लागत असल्याचे समोर आले. हीच आजची समाजातील वस्तुस्थिती आहे. या अभ्यासात स्पष्ट झालेली अन्य बाब म्हणजे, अभ्यासात समाविष्ट दोन कोटी विद्यार्थ्यांनी घेतलेल्या शिक्षणातून, त्यांना रोजगाराची संधी मिळू शकली नाही व त्यांचे शिक्षण यासंदर्भात पूर्णपणे निरुपयोगी ठरले. यासंदर्भात शासन, शैक्षणिक संस्था व शिक्षक-प्रशिक्षक या साऱ्यांपुढे निर्माण होणारा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, पदवी-पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात शिक्षण-पात्रता व कौशल्यांसह रोजगार क्षमता यांची नेमकी सांगड कोण व कशी घालणार? अशा प्रकारचे प्रयत्न आणि त्यांची यशाची अंमलबजावणी यावरच विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास व त्याद्वारे रोजगार क्षमता अवलंबून राहणार असून त्यासाठी उद्योग-व्यवसायांचा सक्रिय सहभाग अत्यावश्यक असणार आहे.

उद्योगांसह शिक्षण व कौशल्य क्षेत्रांचे संयुक्त प्रयत्न यासंदर्भात यशस्वी होतात, असे प्रयोग काही सरकारी व खासगी कंपन्यांनी केले आहेत. ज्या कंपन्यांनी नव्याने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थी-उमेदवारांसाठी कौशल्य विकासाचे उपक्रम राबविले, त्यांनी त्यासाठी प्रसंगी आर्थिक, मार्गदर्शनपर प्रशिक्षण, संसाधनांचा वापर व आवश्यक अशा सर्व प्रकारची गुंतवणूक केली होती, हे उल्लेखनीय आहे. विद्यार्थ्यांच्या कौशल्यवाढीसाठी उद्योग-व्यवसायातील विज्ञान-तंत्रज्ञान व संशोधन-विकास, याच धर्तीवर प्राधान्यासह गुंतवणूक करणे गरजेचे ठरते. ही गुंतवणूक त्यांना व्यावसायिकदृष्ट्या फायदेशीर ठरते. कारण संबंधित व्यवसाय-उद्योगाला त्यांच्यासाठी आवश्यक असेच शिक्षित-प्रशिक्षित उमेदवार सहजगत्या मिळतात. यासाठी त्यांना वेगळा खर्च करावा लागत नाही. शिक्षण क्षेत्र व विद्यापीठ स्तरावरसुद्धा नव्या संदर्भासह विशेष प्रयत्नांची नेहमीच गरज भासते. विशेषतः अभियांत्रिकी, विज्ञान-तंत्रज्ञान, संशोधन, व्यवस्थापनशास्त्र, आर्थिक पैलू, व्यवसायविस्तार इ. विषयांचा विचार व समावेश शैक्षणिकदृष्ट्या केला जाणे आवश्यक ठरते. यासाठी शासन, प्रशासन व व्यवस्थापन या सर्वच स्तरांवरील प्रयत्न लक्षात घेऊन, तशी अंमलबजावणी करायला हवी.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### हिंदू आतंकवाद हा वदतोव्याघ्यात

१७ वर्षांपूर्वी काँग्रेसने मालेगाव बॉम्बस्फोट केसमध्ये हिंदू आतंकवाद हा विकृत शब्द चलनात आणला. हिंदू जन्माने, मनाने, विचाराने मानवतेचा पूजक होता, आहे आणि राहील. हिंदू आतंकवाद हा वदतोव्याघ्यातच म्हणावा लागेल. थंडगार आग किंवा गरम बर्फ जसे वदतोव्याघ्यातचे उदाहरण आहे तसेच हिंदू आतंकवाद. मुंबई साखळी स्फोटात १२ बॉम्बस्फोट झाले असताना काकांनी मुस्लिम वस्तीत १३ वा बॉम्बस्फोट झाला, असे स्फोटक(?) विधान करून त्याची आता कबुलीही दिली. किती हा सच्चेपणा(?). शुक्रवार असल्याने पकडलेले गुन्हेगार शुक्रवारी असा भयानक अपराध करूच शकत नाही, असे म्हणत गुन्हेगार शोधाचा बट्ट्याबोळ केला. खरे अपराधी वाचवण्याकरिता हिंदू आतंकवादी हा नरेटिव्ह सेट केला गेला, जर शांततेत प्रार्थना करणारे सात लोक धर्मस्थानाजवळ मारले गेले असतील तर ते निश्चितच अयोग्य आहे; पण खरे अपराधी सापडू नये म्हणून एका खरोखर शांतिप्रिय धर्मालाच आतंकवादी म्हणणे ही काँग्रेसची (अ)नीती राहिली आहे. पुलवामा, सर्जिकल स्ट्राईक, पहलगाम, ऑपरेशन सिंदूरवर सतत भ्रम निर्माण करणारे आता तरी माफी मागतील का?

**रवी वाघमारे**/नागपूर

●● ●●

### शिवाला बेल अर्पण करण्याचे शास्त्र

श्रावण मासात महादेवाची आराधना करतात. श्रावण सोमवारी उपवास करून शिवाची विधिवत पूजा करतात. श्रावण महिन्यातील दर सोमवारी शंकराच्या देवळात जाऊन त्याची पूजा करावी आणि शक्य असल्यास निराहार उपवास करावा. शिवाला बेल अतिशय प्रिय आहे आणि म्हणूनच बेलपत्राचे फार महत्त्व आहे. तीन पाने असलेले बेलाचे पान त्रिगुणाचे प्रतीक असून भगवान शंकराच्या तीन डोळ्यांप्रमाणे आहे. बेलाचे पान शिवपिंडीवर उपडे वाहिल्यावर शिवतत्त्वाचा अधिक प्रमाणात लाभ होतो. बेलाच्या पानाचे अग्र देवाकडे आणि देठ आपल्याकडे करून बेलाचे पान वाहावे. शिवाला



बेल ताजा न मिळाल्यास शिळा चालतो; परंतु सोमवारचा बेल दुसऱ्या दिवशी चालत नाही. समुद्र मंथनातून निघालेले विष प्राशन केल्यावर भगवान शंकराला घशात जळजळ होऊ लागली; तेव्हा त्यांच्या डोक्यावर बेलाचे पान ठेवण्यात आले. बेलामध्ये विषनिवारक गुणधर्म आहेत. त्यामुळेच विषाचा प्रभाव कमी झाला. तेव्हापासून शिवाला बेल अर्पण करण्याची परंपरा सुरू झाली. असे म्हणतात की, शंकराच्या पुजेत इतर कुठले साहित्य नसले तरी चालेल; फक्त एक बेलाचे पान शिवपिंडीवर अर्पण केले तरी शंकर पुजेचा स्वीकार करून आशीर्वाद देतात.

**वर्षा आवदे**/नागपूर

●● ●●

### काँग्रेसवर कायदेशीर कारवाई करा

मालेगाव बॉम्बस्फोट खटल्याचा न्यायालयाने निकाल दिल्यानंतर अनेक धक्कादायक खुलासे, माहिती बाहेर येत आहे. मालेगाव मधील २००६ आणि २००८ या वर्षांमध्ये दहशतवाद्यांनी केलेल्या दोन वेगवेगळ्या बॉम्बस्फोटात अनेक निरपराध नागरिक मारले गेले आणि शेकडो जखमी झाले. २००६ चा दहशतवादी हल्ला 'सिमी'ने पाकिस्तानी अतिरेक्यांच्या मदतीने केला होता. नंतर या अतिरेक्यांवरील आरोप महाराष्ट्रातील तत्कालीन काँग्रेस सरकारने रद्द केले. पाकिस्तानी अतिरेक्यांना पाकिस्तानात जाऊ दिले आणि ती केस बंद केली. त्यानंतर २००८ मध्ये मालेगावात पुन्हा बॉम्बस्फोट घडवले. यावेळी काँग्रेसच्या नेत्यांनी केलेल्या कारस्थानाप्रमाणे त्यांना हिंदू आतंकवादाला जन्म द्यायचा होता. या खटल्याचा निकाल देताना न्यायालयाने अत्यंत गंभीर टिप्पणी केल्या आहेत. या खटल्याच्या तपासात सहभागी असलेल्या तत्कालीन महाराष्ट्र एटीएसचे अधिकारी महबूब मुजावर यांनी केलेल्या खुलाशांमुळे या प्रकरणाचे गांभीर्य खूपच वाढले आहे. मुंबईतील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यांमध्येही हिंदू संघटनांच्या नेत्यांना अडकवण्याचा काँग्रेसचा डाव असल्याचाही खुलासा होत आहे. ही सगळी देशविरोधी कारस्थाने करून देशात, आपल्या तथाकथित मतपेढीला खूश करण्यासाठी, धार्मिक तणाव निर्माण करण्याचा काँग्रेसच्या नेत्यांचा मनसूबा होता, हे स्पष्ट आहे. न्यायालयाने सगळ्या संशयित आरोपींना निर्दोष सोडल्यामुळे बॉम्बस्फोट करून सर्वसामान्य नागरिकांना मारणारे मूळ आरोपी कोण होते, याचा तपास करणे अत्यावश्यक आहे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# हर घर तिरंगा व रक्षाबंधनाचा कार्यक्रम घरोघरी पोहचवा- जिल्हाध्यक्ष घुगे

## हिंगोलीत भाजपची महत्वपूर्ण बैठक, पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ ऑगस्ट**

भारतीय जनता पक्षाच्यावतीने दि १२ ते १५ ऑगस्ट या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या हर घर तिरंगा तसेच ९ ते १४ ऑगस्ट या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या रक्षाबंधनाचा कार्यक्रम घराघरात पोहचवा असे आवाहन जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी केले.

येथील शासकीय विश्रामगृहात दि ५ ऑगस्ट रोजी भाजपची महत्वपूर्ण बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, शिवदास बोड्डेवार, पांडुरंग पाटील, सुरजितसिंह ठाकूर, उमेश नागरे, खोब्राजी नरवाडे, उज्ज्वला तांभाळे, गोवर्धन वीरकुंवर सुनीता मुळे, रजनीश पुरोहीत, माणिक लोडे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सज्ज राहण्याचे आवाहन केले. केंद्र व राज्य शासनाच्या योजना सर्वसामान्य लाभार्थ्यापर्यंत पोहचविण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सतत परिश्रम करणे गरजेचे असून या योजनांची माहीती घराघरापर्यंत पोहचविण्याचे आवाहनही केले. केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार आहे. मित्र पक्षांच्या मदतीने आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत चांगली कामगिरी करण्यासाठी बुथ प्रमुख, शक्तीकेंद्र प्रमुख यांनी कामाला लागण्याच्या सुचनाही त्यांनी दिल्या. या निवडणुकीत भाजपची सत्ता आणण्यासाठी अनुकुल वातावरण असून विरोधकांच्या फेक नरेटीव्हला कामाने उत्तर द्यावे तसेच जनतेला वास्तव परिस्थिती समजावून सांगावी असा सल्ला दिला.

भारतीय जनता पक्षाच्यावतीने दि १२ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीत हर घर तिरंगा घराघरावर लावून देशभक्ती, राष्ट्रप्रेम या प्रत्यय द्यावा, तसेच ९ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट या कालावधीत भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी रक्षाबंधनाचा कार्यक्रम घरोघरी राबवावा असे आवाहन केले.

यावेळी जिल्ह्यातील भाजपचे केंद्रीय पदाधिकारी, प्रदेश पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी, मंडळ पदाधिकारी, शक्ती केंद्र प्रमुख, सर्व मोर्चाचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीनंतर भाजपच्या जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी यांना जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी नियुक्तीपत्रे देत त्यांचा सत्कार केला तसेच पक्षसंघटन वाढवून जिल्ह्यात भाजपची ताकद वाढविण्याचे आवाहनही केले.

# दरोड्याच्या तयारीत असणाऱ्या सहाजणांना केली अटक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ ऑगस्ट**

शहरात दरोड्याच्या उद्देशाने आलेल्या नांदेड येथील सहाजणांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली असून त्यांच्यावर शहर पोलिस ठाण्यात मंगळवार दि ५ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींकडून पोलिसांनी अॅटो, स्कुटी, खंजीर, मिरचीपूडसह १.०७ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली शहरासह जिल्हाभरात चोरी व दरोड्याचे गुन्हे रोखण्यासाठी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली १३ पोलिस ठाण्यासोबतच स्थानिक गुन्हे शाखेची विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत.

नांदेड येथून सहा जण एक अॅटो व स्कुटी घेऊन हिंगोली शहरात दरोड्याच्या उद्देशाने आल्याची माहीती गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यावरून गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक माधव जिव्हारे, विक्रम विठुबोने, जमादार विकी कुंदनानी, आझम प्यारेवाले, सुभाष घुगे, मगरे, किशोर सावंत, विशाल खंडागळे, सतीश जाधव, स्वामी, लिंबाजी वाहुळे यांच्या पथकाने हिंगोली शहरालगत काही ठिकाणी छापे मारून पाहणी केली. मात्र सहा संशयित रेल्वे पटरीजवळ थांबल्याची माहीती पोलिसांना मिळाली. त्यावरून दोन्ही पथकांनी दि ४ ऑगस्ट रोजी मध्यरात्री रेल्वे पटरीजवळ छापा टाकला. यामध्ये पोलिसांनी नितीन उर्फ नकटा पप्पू वाघमारे, शेख जावेद शेख खाजा, शेख खय्युन शेख बाबु, अब्दुल सिराज अब्बास, जावेदखान अजमल खान पठाण सर्व राह नांदेड तसेच बबलू पठाण रफीक पठाण रा पूर्णा यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांची चौकशी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर पोलिसांनी अटक करून त्यांच्याजवळील अॅटो, स्कुटी, एक खंजर, मिरची पुड, दोरी, पक्कड असा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी उपनिरीक्षक जिव्हारे यांच्या तक्रारीवरून शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोनि संदीप मोदे, उपनि राहुल महिपाळे करीत आहेत.

# बोगस कागदपत्राच्याआधारे नर्सिंग महाविद्यालयास मान्यता देणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ ऑगस्ट**



बोगस कागदपत्राच्या आधारे दि रायझिंग नर्सिंग महाविद्यालयाला मान्यता देण्यात आली असल्याचा आरोप करीत संबंधित संचालक व प्रबंधक यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते मुनीर खान पठाण, गजानन वैद्य यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे.

निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, माहीती अधिकारात मिळालेल्या माहीतीनुसार नर्सिंग महाविद्यालयाला मान्यता घेण्यासाठी १०० बेडचे हॉस्पीटलची आवश्यकता आहे. परंतु रायझिंग नर्सिंग महाविद्यालयाला मान्यता घेण्यासाठी हिंगोली येथील लक्ष्मी लाईफ केअर हे हॉस्पीटल १०० बेडचे आहे असे दाखवून मान्यता घेण्यासाठी रूग्णालयाचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडण्यात आले आहे. वास्तविक सदरील हॉस्पीटल हे ५० बेडची मान्यता असल्याचे रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र देण्यात आले आहे. या नर्सिंग महाविद्यालयाची तपासणी संबंधित विभागाने केली परंतु संगनमत करून बोगस कागदपत्राच्या आधारे मान्यता देण्यात आली आहे. राज्यात अशाप्रकारचे अनेक नर्सिंग महाविद्यालय चालत असून या नर्सिंग महाविद्यालयाची पारदर्शक चौकशी करावी या मागणीसाठी आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.



**हिंगोली- येथील शासकीय विश्रामगृहात भारतीय जनता पक्षाची बैठक पार पडली. यावेळी जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी जिल्हा कार्यकारणीतील पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी सुनीता मुळे, क्रिष्णा रूहीटीया, संजय ढोके, आशिष जैस्वाल यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शिवदास बोड्डेवार, उमेश नागरे, हिम्मत राठोड आदींची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### बनावट किटकनाशक औषधी दिल्याची तक्रार

हिंगोली- शिरडशहापूर येथे बनावट कीटकनाशक औषध देऊन शेतकऱ्याची फसवणूक केल्या संदर्भात मंगळवारी ५ ऑगस्ट रोजी शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी यांना निवेदन दिले आहे. शिरडशहापूर येथील शेतकरी सुदाम मारोती सूर्यतळ यांनी पठाण कृषी केंद्र या दुकानावरून शेतीमध्ये फवारणी करता औषध खरेदी केले होते. त्यानंतर शेतामध्ये जाऊन फवारणी केली असता पिकावर अथवा तणावर कुठलाही फरक पडला नाही ते संपूर्ण औषध वाया गेले. कृषी केंद्र दुकानदार यांना सांगायला गेलो तर दुकानदारांनी उडवा उडवीचे उत्तरे दिली. यावेळी शेतकऱ्याची फसवणूक झाली असे शेतकऱ्याच्या लक्षात आले. तसेच बऱ्याच शेतकऱ्यांची देखील फसवणूक झाली असेल यात शंका नाही .बनावट कीटकनाशक विक्री करणाऱ्या दुकानाची कृषी विभागाने चौकशी करून कृषी केंद्रावर कारवाई करून न्याय द्यावा अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली या बनावट कीटकनाशक औषधामुळे जवळपास शेतकऱ्यांचे वीस हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. सदरील दुकानाची चौकशी करून त्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे. या निवेदनावर शेतकरी सुदाम मारोती सूर्यतळ यांची स्वाक्षरी आहे.

### निराधारांच्या घरी भेट देत डीबीटी नोंदणी



शिरड शहापूर- औंढा नागनाथ तहसील कार्यालयाच्यावतीने दि १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट या कालावधीत संजय गांधी निराधार योजना तसेच श्रावणबाळ योजनेतील प्रलंबीत असलेल्या लाभार्थ्यांची डीबीटी नोंदणीचे काम शिरड शहापूर व जवळा बाजार येथे करण्यात आले. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या आदेशानुसार उपविभागीय अधिकारी विकास माने व तहसीलदार हरीश गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालयातील कर्मचारी १ ऑगस्टपासून निराधार योजनेतील प्रलंबीत लाभार्थ्यांच्या घरोघरी भेटी देत आहेत. यावेळी लाभार्थ्यांचे बँक पासबुक, आधार कार्ड, मोबाईल क्रमांक आदींची नोंद करण्यात येत असून डीबीटी नोंदणी कर्मचाऱ्यांच्यावतीने करण्यात येत आहे. या मोहीमेला लाभार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. औंढा नागनाथ तालुक्यात सदरील काम युध्दपातळीवर सुरू आहे.

### २७ वाहन चालकांविरूध्द कार्यवाही

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २७ वाहन चालकांविरूध्द विविध पोलिस ठाण्यांतर्गत पोलिसांनी कारवाई करीत या वाहनचालकांकडून २२ हजारांचा दंड वसूल केला आहे.

# राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या वक्तव्याचा निषेध



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली ५ ऑगस्ट**

जिंतूर येथील प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत कार्यक्रमात जाहीर सभेत राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी ग्रामविकास अधिकारी यांना मारहाणीची भाषा व अपमानास्पद वागणुक दिल्याबद्दल ग्रामसेवक संघटनेच्यावतीने जाहीर निषेध करण्यात आला असून मुख्यमंत्र्यांनी त्यांना समज देण्याची मागणी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांचेकडे करण्यात आली आहे. मागील काळात ग्रामपंचायत अंतर्गत प्रधामंत्री आवास योजनेची कामे ग्रामविकास अधिकारी यांनी प्रामाणिकपणे केली आहेत. यावेळी संघटनेचे एस एम झिंजाडे, जी ए बोरकर, व्ही एस होडबे, डी पी सोनटक्के, भागवत काकडे, संतोश मेदाकुदळे, नागसेन कांबळे, भारत कोकरे, सुभाष बांगर, श्रीमती मार्कड, पल्लवी बोरकर, किरण सरकटे, ए एन ससाणे आदींची उपस्थिती होती.

# हिंगोलीतील अवैध ठरलेली ४ हजार ९७५ जन्म नोंदणी प्रमाणपत्रे रद्द, यादी प्रसिध्द

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ ऑगस्ट**

महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील सुधारणा अधिसूचना दि ११ ऑगस्ट २०२३ च्या अनुषंगाने हिंगोली जिल्ह्यातील जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चय कलम १५ अन्वये अवैध ठरलेली ४ हजार ९७५ जन्म नोंदणी प्रमाणपत्रे रद्द करण्यात आली असल्याची माहीती अप्पर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी दिली आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद हिंगोली या यंत्रणेमार्फत २ हजार ६९३ प्रमाणपत्रे देण्यात आली होती. त्यापैकी १ हजार ८३५ प्रमाणपत्रे वैध ठरविण्यात आली आहेत तर ८५८ प्रमाणपत्रे अवैध ठरविण्यात आली आहेत. अवैध ठरविण्यात आलेली ८५८ प्रमाणपत्रे एका वर्षावरील जन्म नोंदणीच्या अनुषंगाने कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार यांच्या वैधानिक आदेशाशिवाय जन्म नोंदणी प्रमाणपत्रे निर्गत केली असल्याने रद्द करण्यात आली आहेत. जिल्हा शल्यचिकीत्सक सामान्य रूग्णालय हिंगोली या यंत्रणेमार्फत १२ हजार ३२६प्रमाणपत्रे देण्यात आली होती. त्यापैकी ९ हजार ८८५ प्रमाणपत्रे वैध ठरविण्यात आली आहेत तर २ हजार ४४१ प्रमाणपत्रे ही एका वर्षावरील जन्म नोंदणीच्या अनुषंगाने कार्यकारी तथा तहसीलदार यांच्या वैधानिक आदेशाशिवाय जन्म नोंदणी प्रमाणपत्रे निर्गत केली असल्याने रद्द करण्यात आली आहेत.

सह आयुक्त नगर पालिका प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली या यंत्रणेमार्फत ९९६ प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली होती. ही सर्व प्रमाणपत्रे अवैध ठरविण्यात आली आहेत. अवैध ठरविण्यात आलेली ९९६ प्रमाणपत्रे ही एका वर्षावरील जन्म नोंदणीच्या अनुषंगोन कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार यांच्याऐवजी नायब तहसीलदार यांनी निर्गत केलेल्या आदेशानुसार जन्म नोंदणी प्रमाणपत्र निर्गत केल्यामुळे रद्द करण्यात आली आहेत. उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद हिंगोली या यंत्रणेमार्फत ६८० प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली होती. ही सर्व प्रमाणपत्रे अवैध ठरविण्यात आली आहेत. तहसीलदर यांच्याऐवजी नायब तहसीलदार यांनी निर्गत केलेल्या आदेशानुसार जन्म नोंदणी प्रमाणपत्र निर्गत करण्यात आली आहेत.

अशाप्रकारे जिल्ह्यात जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ मधील सुधारणा अधिसूचना ११ ऑगस्ट २०२३ नंतर निर्ममित १६हजार ६९५ जन्म नोंदणी प्रमाणपत्रापैकी ११ हजार ७२० प्रमाणपत्रे वैध आढळून आली आहेत. तर ४ हजार ९७५ जन्म नोंदणी प्रमाणपत्रे अवैध ठरविण्यात आली आहेत. रद्द करण्यात आलेली जन्म नोंदणी प्रमाणपत्रांची यादी जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्याची माहीती अप्पर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी दिली. भाजपचे किरीट सोमय्या यांनी नुकतीच यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांचे भेट घेतली होती.

# आज हिंगोलीत पार्थिव शिवलिंग पूजन कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ ऑगस्ट**

येथील आई जगदंबा नवरात्र उत्सव समिती व श्री सद्गुरु सेवा प्रतिष्ठाण यांच्या संयुक्त विद्यमाने पवित्र श्रावण मासामध्ये बुधवार दि.६ ऑगस्ट रोजी पार्थिव शिवलिंग पुजनाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाची जय्यत करण्यात आली आहे.

हिंगोली येथील छत्रपती शिवाजी राजे उद्यान परिसर एनटीसी येथे पवित्र श्रावण मासात आई जगदंबा नवरात्र महोत्सव समिती व श्री सद्गुरु सेवा प्रतिष्ठाण हिंगोली यांच्या वतीने बुधवार दि. ६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता पार्थिव शिवलिंग पुजनाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पावसाळयाचे दिवस आल्यामुळे कार्यक्रम स्थळी उद्यान परिसरात कापडी मंडप, महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पार्थिव शिवलिंग पुजन निःशुल्क असुन भाविकांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रचार, प्रसार, प्रसिद्धी पत्रके वितरण, पुजा विधी साहित्य या विषयी माहिती देण्यात आली. या कार्यक्रमात हजारावर भाविक पुजेसाठी बसणार असल्याची माहिती मुख्य आयोजक कल्याण देशमुख व लक्ष्मीकांत पाठक महाराज, धोंडीराज पाठक गुरु, प्रसाद पाठक गुरु यांनी दिली आहे. या कार्यक्रमासाठी वंदनाताई भुंसाडे, अनिताताई शिंदे, ज्योतीताई कान्हे, कविताताई मद्दीलवार, योगिताताई कान्हे, कावेरीताई रोडगे, योगिताताई देशमुख, कुंजनाताई टाक, राधाताई बियाणी, छायाताई मगर, योगिताताई जोशी, कु.सपना राऊत, कु.वैष्णवी खेत्रे, कु.सायली इंगळे, कु.अंकिता पवार, कु.शितल झाडे, कु.श्रद्धा चौतमल, कु.प्रियल देशमुख, कु. साक्षी दवणे, कु.श्रृती देशपांडे, दिपाताई भक्कड, राखीताई झंवर, दिपालीताई घन, स्वातीताई जोशी, संध्याताई देशमुख, सविताताई चक्रवार, संगिताताई मामडे, शिल्पाताई नर्सीकर, दिपालीताई पोहेकर-घन, संगिताताई निलावार, पुजाताई पारस्कर, मृणालीनीताई पत्की यांच्यासह संयोजन समितीतील महिला भगिंनी परिश्रम घेत आहेत.

# आदर्श महाविद्यालयात एमओयु अंतर्गत अतिथी व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ५ ऑगस्ट**



मराठी विभाग आदर्श महाविद्यालय, हिंगोली व कै. पुष्पादेवी पाटील महाविद्यालय, रिसोड यांच्यातील सामंजस्य करारा-अंतर्गत 'अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील विद्रोह' या विषयावर प्रा. डॉ.केशव कोकाटे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रथम मान्यवरांच्या हस्ते साहित्यसम्राट व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव होते, तसेच विचार मंचावर महाविद्यालयातील चजण व प्लेसमेंट सेलचे संयोजक प्रा. डॉ.आशिष गट्टानी, लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रा. डॉ.दयाराम मस्के तर व्याख्याते म्हणून प्रा. डॉ. केशव कोकाटे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मराठी भाषा- साहित्य यातील साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांच्या वाङ्मयावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना साहित्य वाचनाचे महत्त्व प्रा. डॉ. शत्रुघ्न जाधव यांनी विशद केले. या कार्यक्रमास डॉ.प्रभाकर शिंदे प्रा. विशाल गायकवाड यांची उपस्थिती होती. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुरेश लेकुळे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.महेश मंगनाळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राध्यापकांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## वीरशैव लिंगायत वधू-वर सूचक मेळावा कार्यकारिणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ ऑगस्ट -**
वीरशैव लिंगायत समाज, लातूरच्यावतीने होणाऱ्या वधू-वर सूचक मेळाव्याची कार्यकारिणी येथे झालेल्या एका बैठकीत जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी विश्वेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे यांची एकमताने निवड करण्यात आली.

पवन कल्याणी, दिलीप होनराव, राजाभाऊ हलकुडे, शांतवीरप्पा मुळे, ओमप्रकाश गलबले, मल्लिकार्जुन पेद्दे, सुहास अष्टके, बसवेश्वर हलकुडे, बाबूआप्पा राजट्टे, ॲड. सुमित जेजुरी, ॲड. युवराज कल्याणी यांची कार्यकारणी सदस्य म्हणून निवड करण्यात आली.



यावेळी वीरशैव लिंगायत समाजाचे उमाकांत कोरे, तम्मा चौंडा, नागेश कानडे, बालाजी पिंपळे, विवेक जानते, सुनील देवपुरे यांनी नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला. नियोजित वधू-वर आणि त्यांच्या पालकांनी वीरशैव सांस्कृतिक भवन, खंडोबा गल्ली, लातूर येथे वधू-वर मेळाव्यासाठी नोंदणी करावी, असे आवाहन नूतन अध्यक्ष बसवराज धाराशिवे यांनी केले. हा वधू-वर परिचय मेळावा २६ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. लातूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात प्रचार दौरा करण्याचा संकल्प बालाजी पिंपळे व तम्मा चौंडा यांनी केला. या बैठकीस अप्पा लामतुरे, आनंद सलगरे, ॲड. पंकज कोरे, मन्मथ बोळेगावे, राजाभाऊ पन्हाळे, सतीश कानडे, व्यंकट सोलापुरे, प्रसाद नागुरे, काशीनाथ पानगावे, प्रभाकर कापसे आदी समाज बांधव उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...

## लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ ऑगस्ट -**
मैत्रीचे रुपांतर प्रेमात व त्यातून जवळीक निर्माण होऊन लग्नाच्या आणा-भाका खाऊन शारिरीक संबंध निर्माण केले. तब्बल दीड वर्षे लातूरच्या औसा रोडवरील बांधकाम सुरू असलेल्या इमारतीत, पुण्यात विविध ठिकाणी अत्याचार करणाऱ्या प्रियकराने लग्नास नकार दिल्याने पीडितेच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपीला अटक करण्यात आली आहे.

आरोपी शिवशंकर उर्फ संकेत गरेगावे (वय २२, रा. मुखेड, जि. नांदेड, हा.मु. जुना औसा रोड, लातूर) याने लातूर येथील त्याच्या समवयस्क मुलीशी मैत्री केली. मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले. यातून त्यांच्यात लातूरच्या औसा रस्त्यावरील एका काम सुरू असलेल्या इमारतीत व पुणे येथे अनेकवेळा शारिरीक संबंध निर्माण झाले. दोघांनी एकमेकांशी लग्न करण्याच्या आणा-भाका खाल्ल्या. परंतु, आरोपी शिवशंकर उर्फ संकेत गरेगावे याने पीडितेशी लग्न करण्यास नकार दिला. यामुळे पीडितेने पोलिसांत धाव घेतली. तिच्या फिर्यादीवरून आरोपी शिवशंकर उर्फ संकेत गरेगावे याच्याविरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास शहर उपविभागीय पोलीस अधिकारी रणजित सावंत हे करीत आहेत.

## चर्मकार महासंघातर्फे गुणवंतांचे कौतुक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ ऑगस्ट -**
येथील लातूर जिल्हा राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्यावतीने चर्मकार समाजातील गुणवंतांचे कौतुक करण्यात आले.

विद्यार्थिनी सपना शंकर चित्ते हिने दहावीत ९८ टक्के, श्रध्दा श्रीहरी चित्ते हिने ९० टक्के गुण घेऊन यश संपादन केले. त्याबद्दल राष्ट्रीय उपाध्यक्ष सी. के. मुरळीकर यांच्या नेतृत्वातखाली सपना चित्ते, श्रध्दा चित्ते आणि त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष रवी कुरील, जिल्हा कार्याध्यक्ष अनिल कबाडे, व्ही. एस. पँथर्स संघटनेचे जिल्हाध्यक्ष शरद किनीकर, अजय सूर्यवंशी, सुनील ढवळे, श्रीहरी चित्ते, शंकर चित्ते, अश्विनी चित्ते, श्रेयश चित्ते, कृष्णा चित्ते यांच्यासह अन्य पदाधिकारी व समाजबांधव उपस्थित होते.

## जिल्हा परिषदेसमोर महिलांचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ ऑगस्ट -**
प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील अंशकालीन महिला परिचर



कर्मचाऱ्यांनी मानवाढ व प्रलंबित प्रश्नांसाठी सोमवारी जि. प. समोर ठिय्या मारला. न्याय मिळेपर्यंत कामबंद आंदोलनाचा इशारा जि. प. महिला परिचर महासंघाने दिला. युवा भीम सेनेने आंदोलनास पाठिंबा देत सहभाग नोंदवला.

मागील अनेक दिवसांपासून महिला परिचर आपल्या न्याय हक्कासाठी लढा देत आहेत. शासन दरबारी दखल घेतली जात नाही. केवळ तीन हजार रुपये देऊन पूर्णवेळ काम करायला भाग पाडले जाते. परिचर महिलांना कायम वेतनावर घेऊन भाऊबीज द्यावी, तीन वर्षापासून गणवेश मिळाला नाही तो तात्काळ द्यावा, किमान वेतन २१ हजार रूपये द्यावे, आदी मागण्यांसाठी जि. प. समोर परिचर महिलांनी तसेच युवा भीम सेनेच्या कार्यकर्त्यांनी ठिय्या आंदोलन केले. यावेळी युवा भीम सेनेचे संस्थापक अध्यक्ष पंकज काटे, प्रवक्ते सुफी सय्यद शमशोद्दीन, महेबुब सय्यद, महिला जिल्हाध्यक्षा उमा आदमाने, युवा जिल्हाध्यक्ष शेखर कांबळे, निलेश मस्के, गणेश पोटभरे, रोहन रायभोळे, महेंद्र मोरे, शिरीष मांदळे, संघाच्या जिल्हाध्यक्षा संगीता गवळी, सुवर्णा कळसे, सविता कांबळे, नम्रता गरड, संगीता घोलप, वंदना फुले, साजिदा पठाण, अयोध्या चोले, सुरेखा केसाळे, शिवकांता गायकवाड, अर्चना कांबळे, मंदोदरी हांडे, भाग्यश्री विरकर आदी पदाधिकारी व परिचर उपस्थित होत्या.

## डेंग्यू प्रतिबंधासाठी ॲबेटिंग मोहीम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ ऑगस्ट -**
डेंग्यू प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा महत्त्वाचा भाग म्हणून महापालिका आयुक्त मानसी मीना यांच्या आदेशानुसार व उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या मार्गदर्शनानुसार शहरात ॲबेटिंग मोहिमेची तिसरी फेरी सोमवारपासून राबवण्यात येत आहे.

येथील भालचंद्र रक्तपेढीच्या सभागृहात महापालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती व डॉ. ऋषिकेश खरोळकर यांच्या उपस्थितीत शहरातील सर्व आशा स्वयंसेविका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची कार्यशाळा घेण्यात आली. या मोहिमेत महापालिकेच्या आरोग्य विभागातील २०३ आशा स्वयंसेविका, ४६ आरोग्यसेविका आणि १६ आरोग्य कर्मचारी पुरुषांचा सहभाग असणार आहे. या मोहिमेत घरोघरी जाऊन डासोत्पत्तीच्या ठिकाणांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. आढळलेली ठिकाणे तत्काळ नष्ट करण्यात येणार आहेत.

प्रत्येक घरातील साठविलेल्या पाण्यात औषध टाकण्यात येणार आहे. वारंवार डासोत्पत्तीची ठिकाणे आढळून आल्यास घरमालकांना तंबी देण्यात येणार आहे. डासांवर नियंत्रण आणण्यासाठी धूरफवारणीही करण्यात येणार आहे. २०२४ या वर्षात महापालिकेमार्फत संशयित डेंग्यू रुग्णांचे एकूण १ हजार ६९३ रक्तजल नमुने घेण्यात आले होते. त्यापैकी ३१९ रुग्णांचे रक्तजल नमुने डेंग्यू पॉझिटिव्ह आले होते. यावर्षी डेंग्यूचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. जानेवारी ते जुलै २०२५ अखेरपर्यंत शहरात ३१ डेंग्यू पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले आहेत. नागरिकांनी जागरूक राहून प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा वापर करावा, असे आवाहन डॉ. शंकर भारती यांनी केले.

### एक दिवस कोरडा पाळा

या मोहिमेत डासोत्पत्तीची ठिकाणे नष्ट केली जाणार आहेत. जेथे डासोत्पत्तीची ठिकाणे नष्ट होत नाहीत, त्या ठिकाणी पाण्यात औषधी (अबेट) टाकण्यात येणार आहे. यामुळे डास अळ्या मृत पावतात, डासोत्पत्ती न झाल्याने दूर होण्यास मदत होते. डासांमुळे डेंग्यू, चिकुनगुनिया, मलेरिया आदी आजार जडतात. यासाठी प्रत्येकाने आठवड्यातील एक दिवस कोरडा पाळून डासांचा नायनाट करावा, असे आवाहन डॉ. शंकर भारती यांनी केले आहे.

## १० हजार कोटींची बिले थकली; ठेकेदारांचे शनिवारपासून उपोषण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ ऑगस्ट -**
शासनाच्या विविध विभागांमध्ये विविध ठेकेदारांची सुमारे १० हजार कोटी रुपयांची बिले शासनाकडे थकली असून, ही बिले नाही मिळाली तर ९ ऑगस्ट २०२५ पासून लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा ठेकेदारांनी सोमवारी निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला दिला.



निवेदनात म्हटले आहे, सांगली जिल्ह्यातील हर्षल पाटील नावाच्या ठेकेदाराने शासनाकडील थकीत बिले मिळाली नाहीत म्हणून आत्महत्या केली. तशी वेळ लातूर जिल्ह्यातील ठेकेदारांवर आली आहे. सार्वजनिक बांधकाम, पाणीपुरवठा, जिल्हा परिषद, पी. एम. योजनेसह शासनाची विविध कामे ठेकेदारांनी केली आहेत. मात्र, मागील २ वर्षांपासून लातूर जिल्ह्यातील विविध कामांची सुमारे १० हजार कोटी रुपयांची बिले थकली आहेत. ही बिले न मिळाल्याने ठेकेदार व ठेकेदारांवर अवलंबून असणाऱ्या घटकांवर उपासमारीची वेळ आली आहे. शासनाने ९ ऑगस्ट २०२५ पर्यंत कामाची बिले नाही दिली तर लातूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा निवेदनात ठेकेदारांनी दिला आहे. शनिवारपासून एक ठेकेदार आमरण उपोषण करेल व इतर ठेकेदार पाठिंबा म्हणून उपोषण करतील. १५ ऑगस्टपर्यंत बिले नाही मिळाली तर सर्वच ठेकेदार आमरण उपोषणास बसतील, असा इशाराही देण्यात आला आहे. निवेदन देण्यासाठी जिल्ह्यातील जवळपास २०० ठेकेदार उपस्थित होते.

## ‘सत्संग’ने घडविले ४५० महिला भक्तांना श्री वैद्यनाथाचे दर्शन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ ऑगस्ट -**
श्रावण महिना हा भक्तीभावाचा महिना म्हणून ओळखला जातो. यानिमित्त येथील श्री सत्संग प्रतिष्ठानच्यावतीने नऊ बसेसच्या माध्यमातून ४५० महिला भक्तांना रविवारी बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथील बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या श्री प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घडवून आणले.

रविवारी सकाळी साडेसात वाजता शिवाजीनगर येथील अष्टविनायक मंदिरात महिला भाविक एकत्र आल्या होत्या. मोफत दर्शन यात्रेला सुरुवात करण्यापूर्वी मीनल मोटेगावकर, सुशीलादेवी पारीख, मीरा लड्डा, सुखदा रेड्डी, शोभा लोखंडे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गोविंद पारीख, उपाध्यक्ष दत्ता लोखंडे, सचिव चंदू लड्डा, कोषाध्यक्ष श्याम मुंदडा, सदस्य सीए प्रकाश कासट, रमेशचंद्र भुतडा, जुगलकिशोर झंवर, केतन हलवाई, लक्ष्मीकांत बियाणी, व्यंकट गर्जे, लातूर अर्बन बँकेचे माजी चेअरमन प्रदीप राठी, चेअरमन आकाश राठी, ‘आरसीसी’चे प्रा. शिवराज मोटेगावकर, वसंतराव ढमाले, बालाजी बारबोले, परमेश्वर माने, राम शिंदे, अन्वर शेख, वामनराव जाधव, नाना लोखंडे, गोपाल पारीख, एस.टी. महामंडळाचे आगार व्यवस्थापक बाळासाहेब राठोड यांची उपस्थिती होती.

अल्पोपाहारानंतर बसेस परळीकडे रवाना झाल्या. परळी वैजनाथ येथे महिलांसाठी अभिषेक, दर्शन, पूजा आणि महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. भाविकांनी श्री प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेतले. सायंकाळी ६ वाजता परतीच्या प्रवासाला सुरूवात झाली. बर्दापूर फाटा येथे पुरुषोत्तम बजाज आणि श्यामसुंदर बजाज यांच्यावतीने भाविक महिलांसाठी अल्पोपहाराची सोय करण्यात आली होती. यानंतर भाविक लातूर शहरात दाखल झाले. या उपक्रमाबद्दल सत्संग प्रतिष्ठानचे महिला भाविकांनी आभार मानले.



## पालिकेच्या लोकशाही दिनी नागरिकांच्या तक्रारींचे निवारण



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ ऑगस्ट -**
ऑगस्ट महिन्यातील पहिल्या सोमवारनिमित्त ४ ऑगस्ट रोजी महापालिकेत आयोजित लोकशाही दिनी ८ तक्रारींचे निवारण करण्यात आले. यापैकी ६ तक्रारी वैयक्तिक स्वरूपाच्या तर २ सार्वजनिक होत्या.

यावेळी महापालिका आयुक्त मानसी मीना, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगणे, नागरी सुविधा केंद्र व लोकशाही दिन प्रमुख रंदावनी पवार यांच्यासह सर्व विभाग प्रमुखांची उपस्थिती होती. लोकशाही दिनी सुलतान शमशोद्दीन शेख, काशीबाई कोरे, माधव सूर्यवंशी, रोहिदास वाघचौरे, संतोष चंद्रे, रोहित शेटे, आकाश बाभळे व सुलेमान सय्यद यांनी तक्रारी अर्ज दाखल केले होते. क्षेत्रीय कार्यालय क, मुख्य लेखा परीक्षक विभाग, क्षेत्रीय कार्यालय अ, पर्यावरण विभाग, क्षेत्रीय कार्यालय ड, अतिक्रमण विभाग, ई-प्रशासन विभाग, विवाह नोंदणी व सामान्य प्रशासन विभागाशी संबंधित असणारे हे तक्रारी अर्ज संबंधित विभागांकडे वर्ग करण्यात आले. अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेत त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे आदेश आयुक्त मीना यांनी दिले. दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी होणाऱ्या लोकशाही दिनात नागरिकांकडून आलेल्या वैयक्तिक तक्रारींचे निराकरण केले जाते. नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडून त्यांची सोडवणूक करून घ्यावी, असे आवाहन आयुक्त मानसी मीना यांनी केले आहे.

## सुनील रेजितवाड यांची गांधी चौकला बदली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ ऑगस्ट -**
औसा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनील रेजितवाड यांची लातूर येथील गांधी चौक पोलीस ठाण्यात त्याचपदावर बदली झाली आहे. त्यांचा कार्यभार सहायक पोलीस निरीक्षक शिवशंकर मनाळे यांच्यावर सोपविण्यात आला आहे.


गांधी चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक साहेबराव नरवाडे यांची नांदेड येथे बदली झाली आहे. त्यांना सोमवारी सोडण्यात आले. रेजितवाड हे सायंकाळी ५ वाजता गांधी चौक पोलीस ठाण्यात रुजू झाले.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सोमवारी रेजितवाड यांच्या बदलीचे आदेश काढले. रेजितवाड हे औसा पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत होते. त्यांच्या जागेवर याच ठाण्यातील सहायक पोलीस निरीक्षक शिवशंकर मनाळे यांच्याकडे पदभार सोपविण्यात आला आहे. गांधी चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक साहेबराव नरवाडे यांची मागील दीड महिन्यापूर्वीच नांदेड येथे बदली झाली आहे. त्यांची पोलीस उपअधीक्षकपदी पदोन्नती होणार आहे. सुनील रेजितवाड यांच्या जागेवर औसा येथे कोणीही अधिकारी न देता त्यांना तेथून उचलण्यात आले आहे, अशी चर्चा सुरू आहे.

## शिव मंदिरांमध्ये भाविक -भक्तांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ ऑगस्ट -**
श्रावण महिन्यातील दुसऱ्या सोमवारी शहरासह जिल्ह्यातील शिव मंदिरांमध्ये महादेवाच्या दर्शनासाठी भाविकांनी सहकुटुंब गर्दी केल्याचे दिसून आले. यामुळे मंदिरांचे परिसर भाविकांच्या भक्तीने ओसंडून वाहताना दिसून आले.



श्रावण महिना मराठी वर्षातील सर्वात पवित्र महिना मानला जातो. पावसाळा सुरू होऊन दीड महिना उलटला असल्याने सर्वत्र निसर्ग हिरवा शालू पांघरलेला असतो. प्रसन्न वातावरणात श्रावण महिन्याला प्रारंभ होतो. हा महिना भक्तीभावाचा महिना म्हणून सर्वपरिचित आहे. या महिन्यात हिंदू धर्मात कोणताही मांसाहार वर्ज्य आहे. श्रावण मासानिमित्त अनेक मंदिरांमध्ये पोथी-पुराणांचे पठण करण्यात येते. अनेकजण संपूर्ण महिना आपल्या घरी पोथीचे पारायण करतात. रामायण, महाभारत असे पोथीचे अध्याय वाचले जातात. या महिन्यात पावसाच्या संततधाराही सर्वत्र बरसत असतात. यामुळे वातावरण प्रसन्न असते. त्याचप्रमाणे भक्तीला उधाण आलेले असते. श्रावण महिन्यातील सोमवारला अधिक महत्त्व आहे. प्रत्येक भाविक महादेवाची पूजा करतात. त्यांना बेल, फूल वाहतात. मंदिरांमध्ये जाऊन सहकुटुंब दर्शन घेताना दिसतात. आज दुसरा श्रावण सोमवार असल्याने लातूरचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर मंदिरासह शहरातील प्रसिध्द असलेल्या तळ्यातील वैद्यनाथ महादेव मंदिर, माळी गल्लीतील भीमाशंकर मंदिर, बाजार समितीतील गौरीशंकर मंदिरांमध्ये पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केल्याचे दिसून आले.

यामुळे मंदिर परिसर भक्तिभावाने न्हाऊन निघाला होता. मंदिर परिसराला जत्रेचे स्वरूप आले होते. पूजेचे साहित्य व लहान मुलांसाठी खेळणे विक्रेते, प्रसादाचे पेढे विक्रेते यांनी दुकाने थाटली होती. यामुळे मंदिर परिसर गजबजून गेल्याचे चित्र पहावयास मिळाले. हजारो भाविकांनी महादेवाचे दर्शन घेऊन आशीर्वाद मागितले. श्रावण महिन्यातील यापुढील सर्व सोमवारी शिव मंदिरांमध्ये भाविकांची दर्शनासाठी गर्दी होणार आहे.

## जगदंबा मंदिरात कुंकुमार्चन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.५ ऑगस्ट -**
येथील गंजगोलातील श्री जय जय जगदंबा मंदिरात पवित्र अशा श्रावण महिन्यातील दुर्गा-अष्टमीचे औचित्य साधून कुंकुम अर्चन अर्थात श्री सूक्तासह जगदंबा मातेला कुंकवाचा अभिषेक करण्यात आला.

पवित्र अशा या श्री सूक्त व वेदातील मंत्रोच्चारात हा कुंकुम अर्चन कार्यक्रम भक्तीमय वातावरणात पार पडला. या कुंकुम अर्चन कार्यक्रमात चारशेपेक्षा अधिक महिला भगिनींचा उत्स्फूर्त सहभाग होता. प्रारंभी श्री जगदंबा मातेचे पूजन करून मंत्रोच्चाराच्या पावन घोषात सुमारे तीन तास कुंकुम अर्चन अर्थात देवी मातेला कुंकवाचा अभिषेक करण्यात आला. धार्मिक विधी वेदमूर्ती सूरज स्वामी यांनी बसवेश्वर स्वामी, शिवा महाराज, संतोष स्वामी यांच्या सहकार्याने पार पाडले.

# मोटरसायकल चोरास आणि जबरी चोरी करून लुटमार करणाऱ्या दोन आरोपींना बीड शहर पोलीसांनी पकडले

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ ऑगस्ट**

मा.पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी मोटरसायकल चोरी आणि इतर चोऱ्यावर नियंत्रण करण्यासाठी सर्व ठाणेदार यांना सूचना दिल्या आहेत.

बीड सरकारी दवाखाना येथील रुग्णालयासमोरून डॉक्टर दिनेश भगवान तुपे, आशापुरा अपार्टमेंट बीड यांची अवेंजर मोटरसायकल सरकारी रुग्णालय बीड येथून चोरी गेली होती. परंतु बीड शहर डीबी पथकाने यात चांगली कामगिरी करून यातील मोटरसायकल चोर पुन्हा एकदा सापळा लावून काही तासातच पकडला आहे. ज्या ठिकाणाहून गाडी चोरी गेली होती त्याच ठिकाणी डीबी पथकाने सापळा लावला होता आणि हाच चोर तेथे गाडी चोरी करण्यासाठी काल दिनांक ४ ऑगस्ट २०२५ दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास येथे आला आणि पोलिसांच्या सापळ्यात गाडी चोरी करत असताना अलगत अटकला. त्यास जागीच पकडण्यात आले आहे आणि त्याने काल चोरी करण्यात आलेली गाडी याची सुद्धा कबुली दिली आणि हॉटेल स्वराज समोर लावलेली डॉक्टर दिनेश तुपे यांची अवेंजर गाडी पोलिसांनी जाऊन ताब्यात घेतली आहे.



अभिलेखावरील गुन्हेगार वैभव संजय वराट राहणार आयटीआय कॉलनी बीड याने दिनांक २.८.२५ रोजी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास बंजारा हॉटेल समोर भैय्यासाहेब नागनाथ सोनकांबळे राहणार सम्राट चौक बीड. याचा मोबाईल आणि बाराशे रुपये नदी असे पैसे असे जबरीने काढून घेतले. परंतु बीड शहर च्या डीबी पथकाने चांगली कामगिरी करत प्रमुख आरोपी वैभव वराट याला तात्काळ अटक केली आहे त्याच्याकडून १२०० रुपये जप्त देखील केले आहेत. वैभव वराट याद दोन दिवस पीसीआर ची मागणी करण्यात आली आहे. यातील एक आणखी आरोपी अटक करणे बाकी आहे.

या दोन्ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री नवनीत कावत, अपर पोलिस अधीक्षक श्री सचिन पांडकर, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री शितल कुमार बल्लाळ, साहेब पोलीस निरीक्षक श्री बाबा राठोड, पोलीस अंमलदार संजय राठोड, शहेंशा सय्यद,संदीप आघाव, अमर घुगे, गहिनीनाथ बावनकर, राम पवार, सुशील उगले,यांनी केली आहे. दोन्ही कारवाईबद्दल नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# अंबाजोगाई रोटरी क्लबचा प्रांतपातळीवर पहिला क्रमांक

## विविध प्रकल्प राबविल्याची मिळाली २५ पारितोषिके

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.५ ऑगस्ट**

वर्षभरात विविध सामाजिक, आरोग्यविषयक व विधायक उपक्रम राबवून सामान्य माणसांच्या समस्या सोडविण्यात आग्रेसर ठरलेला रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी हा क्लब प्रांतपातळीवर पहिला आला आहे. तर विविध प्रकल्पांची नोंद वरिष्ठ पातळीवर अव्वल ठरल्याने क्लबला इतरही २५ पारितोषिके मिळली आहेत. ही उल्लेखनिय कामगिरी क्लबचे अध्यक्ष कल्याण काळे व सचिव धनराज सोळंकी यांनी मागच्या वर्षात केली.

रोटरी क्लबचा प्रांत हा आठरा जिल्ह्यांचा आहे. व यात एकुण १०५ क्लबचा समावेश आहे. या सर्व क्लब मधून रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीने प्रांतपातळीवर आपल्या उल्लेखनिय कार्यातून पहिला क्रमांक पटकावला आहे. तर क्लबला गेल्या वर्षभरात राबविण्यात आलेल्या १३६ प्रकल्पांपैकी २५ प्रकल्पांना विविध पारितोषिके मिळाली आहेत. जालना येथे झालेल्या प्रांत पातळीवरील बक्षिस वितरण समारंभात रोटरीचे प्रांतपाल सुरेश साबु, सौ.निर्मला साबु, विद्यमान प्रांतपाल सुधीर लातुरे, भावि प्रांतपाल जयेश पटेल, क्षिजित झावरे व मान्यवरांच्या उपस्थितीत हा पारितोषिक वितरण सोहळा झाला. या सोहळ्यात अंबाजोगाईच्या क्लबला विविध पारितोषिकांनी सन्मानित करण्यात आले.

अंबाजोगाई रोटरी क्बलबने गेल्या वर्षभरात बारा हजार नागरिकांची मधुमेह तपासणी केली. चार हजार जणांची नेत्र तपासणी करून ५४२ जणांच्या मोतीबिंदु नेत्र शस्त्रक्रिया केल्या. २४० बालकांचे टुडी इको तपासणी करून २४ बालाकांच्या मुंबई येथे हृदयरोगाच्या मोफत शस्त्रक्रिया केल्या. ६०० जणांचे रक्तदान ८ शाळांना सॅनेटरी नॅपकिन, शाळेतील गरजू विद्यार्थ्यानींना ५१ सायकलींचे वाटप, बंधारण्यांची उभारणी, जोगाईवाडी येथे स्मशानभूमीची उभारणी असे अनेक महत्वपुर्ण उपक्रम राबविले. या शिवाय वृक्षारोपन व वृक्षसंगोपन आरोग्य विषयक शैक्षणिक, महिला सक्षमतीकरणाचे विविध उपक्रम राबविले. या सर्व उपक्रमांची दखल घेत. अंबाजोगाईच्या क्लबवर मोठा बक्षीसांचा वर्षावर झाला. त्यामुळे अंबाजोगाई क्लबचे सर्वत्र स्वागत होत आहे.



ही मिळाली पारितोषिके

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीला यावर्षी बेस्ट क्लब ऑफ द-डिस्ट्रीक्ट, बेस्ट सेक्रेटरी ऑफ द डिस्ट्रीक्ट, पब्लिक इमेज, बेस्ट हेल्थ, सेव्ह गर्ल्स अ‍ॅण्ड एज्युकेशन, सेव्ह चालईल्डस, पी.एच.एफ.ऑवार्ड, टी.आर.एफ. ऑवार्ड, वॉटर मॅनेजमॅंट ऑवार्ड, या शिवाय क्लबच्या अध्यक्षा प्रा.रोहिणी पाठक यांना ऑनलाईन गुरूकुल प्रशिक्षण तर क्लबचे प्रशिक्षक संतोष मोहिते यांना आय.टी.क्षेत्रातील कोडी सोडवा या प्रशिक्षणाचे ऑवार्ड मिळाले. विवेक गंगणे यांनाही उत्कृष्ट कार्याचे पारितोषिक मिळाले.

धनराज सोळंकी ठरले बेस्ट सेक्रेटरी-अंबाजोगाई येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीचे माजी सचिव धनराज गौतमचंद सोळंकी यांना यावर्षीचा बेस्ट क्लब सेक्रेटरी हा ऑवार्ड देवून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. सामाजिक व अध्यात्मिक क्षेत्रात सोळंकी हे गेल्या पंधरा वर्षापासुन कार्यरत आहेत. गेल्या वर्षभरात रोटरी क्लबचे सचिव म्हणून त्यांनी केलेल्या उल्लेखनिय कार्याबद्दल बेस्ट सेक्रेटरी म्हणून त्यांना स्मृतीचिन्ह देवून सन्मानित करण्यात आले.

# गोरक्षनाथ टेकडी परिस आहे, सेवा करून जीवनाच सोन करा-सांगळे महाराज





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ ऑगस्ट**

गोरक्षनाथ टेकडी हि गुरू शिष्य परंपरेचा वारसा चालवणारी तपोभूमी आहे गोरक्षनाथांनी गुरू मच्छिंद्रनाथांची सेवा केली तशी गुरू किसन बाबा महाराज यांची सेवा सद्गुरू गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांनी केली. गुरू शिष्य सेवेतून गोरक्षनाथ टेकडी हि पुनीत झाली आहे. गोरक्षनाथ टेकडी हि परिस आहे येथे तुमच्या आयुष्याच सोन करायचं असेल तर तुम्ही गोरक्षनाथ टेकडी सेवा करा गुरू किसन बाबा महाराज, गुरू नवनाथ बाबा महाराज यांची सेवा करा नक्कीच तुमच्या जीवनच सोन झाल्याशिवाय राहणार नाही असे अभंग विवेचन करताना ह. भ. प. संत ज्ञानेश्वर महाराज सांगळे मुंबई यांनी विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरणार्थी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये द्वितीय कीर्तन पुष्प समर्पित करताना व्यक्त केले. या कीर्तनात मृदुंगसाथ ह.भ.प.अरुण महाराज कदम व ह.भ.प.ऋषिकेश महाराज जाधव कीर्तनात कीर्तन साथ ह.भ.प.सुग्रीव महाराज डाके,ह.भ.प. भागवत महाराज नरवडे व ह.भ.प.भीमराज महाराज घुगे नाशिक यांनी दिली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या पुण्यस्मरणार्थ होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये कीर्तन, प्रवचन, अभंगवाणी, संगीत भजन, हरिजागर, भारुड असे भक्तिमय कार्यक्रमाने गोरखनाथ टेकडी भक्ती रसात न्हाऊन निघाली आहे दोन दिवसापासून पंचक्रोशीतील भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती लावत आहेत.

# शहरातील धानोरा रोड, अंकुश नगर रस्त्यासंदर्भात आ.क्षीरसागरांनी घेतली बैठक

## दोन्ही रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याचे दिले निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ ऑगस्ट**

शहरातील धानोरा रोड आणि अंकुश नगर रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. या भागातील नागरिकांना आणि येथून प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच पाऊस पडल्यानंतर तर नागरिकांचे या रस्त्यामुळे अतोनात हाल होत आहेत. हा रास्ता करण्यासाठी काही दिवसांपूर्वीच या भागातील नागरिकांनी आंदोलन केले होते. याची दाखल घेत आ.संदीप क्षीरसागर यांनी सार्वजानिक बांधकाम विभागाची बैठक घेऊन धानोरा रोड आणि अंकुश नगर रोडची तातडीने दुरुस्ती करण्याचे निर्देश दिले.



शहरातील धानोरा रोड आणि अंकुश नगर या मोठी रहदारी असलेल्या रस्त्यांची मोठी दुरावस्था झालेली आहे. सदरील रस्त्यांचा प्रश्न हा या भागातील नागरिकांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा झालेला आहे. या रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात तर पूर्ण रस्ता चिखलमय होऊन रहदारीस मोठी अडचण होत आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांनी एकत्र येऊन दि.२९ जुलै रोजी आंदोलन केले होते. या आंदोलनास आ.संदीप क्षीरसागर यांनी भेट देऊन नागरिकांशी चर्चा करत आंदोलन मागे घेण्याची विनंती केली होती. तसेच येत्या काही दिवसांतच या रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागेल, त्यासाठी मी स्वतः पाठपुरावा करेल, असे आश्वासन दिले होते. आ.क्षीरसागर यांच्या आश्वासनानंतर नागरिकांनी हे आंदोलन मागे घेतले होते. त्यानंतर आ.संदीप क्षीरसागर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाची, सोमवार (दि.७) रोजी बीड शहरातील शासकीय विश्रामगृह येथे बैठक घेऊन या दोन्ही रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याचे निर्देश दिले. पुढील काही दिवसातच धानोरा रोड आणि अंकुश नगर रोडच्या दुरुस्तीचे काम प्रत्यक्षात सुरु होणार आहे. दरम्यान या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी आणि धानोरा रोड आणि अंकुश नगर भागातील नागरिक उपस्थित होते.

# बोगस विना परवाना खत विक्री करणारे आढळून आल्यास कृषी विभगाशी संपर्क साधावा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ ऑगस्ट**

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन,विभागीय कृषी सहसंचालक प्रकाश देशमुख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे,आशिष काळूसे, तंत्र अधिकारी गु.नि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय भरारी पथक प्रमुख साहिल सय्यद, कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद बीड, सायप्पा गरांडे, मोहीम अधिकारी जिल्हा परिषद बीड, वल्लभ भोसले जिल्हा गुण नियंत्रण निरिक्षक, यांच्या उपस्थीतीत आणि सर्वांच्या प्रयत्नाने कृषी अधिकारी (गुण नियंत्रण) तालुका कृषी अधिकारी कवडे एम. बी, माजलगाव यांनी अनधिकृत रित्या विना पावती, बोगस खत विक्री करणाऱ्या जगदंबा कृषी सेवा केंद्र पाथरुड आणि जगदंबा ॲग्रो एजन्सी लामानवाडी ता.माजलगाव यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३, अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ व खत नियंत्रण आदेश १९८५ मधील तरतुदी अन्वये माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन येथे दि ०४ ऑगस्ट २०२५ रोजी पहाटे २:१० वा. गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरील ठिकाणाहून बोगस खताच्या वापरलेल्या (रिकाम्या) २३, सीलबंद १३ व अर्धवट ०३ अशा एकूण ३९ बोगस खताच्या बॅग जप्त करून संबंधित पोलीस स्टेशन यांच्या ताब्यात देण्यात आलेला आहे. अशा प्रकारे कुणीही बोगस विना परवाना, अनधिकृत कृषी निविष्ठा विक्री होत असल्यास कृषी विभागास संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाच्या भरारी पथकाने केले आहे.

# अल्पसंख्याक कल्याण समितीवर सदस्यत्वासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ ऑगस्ट**

अल्पसंख्याक समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी तसेच स्थानिक अल्पसंख्याकांच्या समस्या सोडवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समिती स्थापन करण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला आहे.

जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समितीवर शासकीय अधिकारी, त्या-त्या जिल्ह्याचे राज्यसभा लोकसभा सदस्य तसेच विधानसभा सदस्य, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी यांच्यासह अल्पसंख्याकांसाठी काम करणाऱ्या ०३ नामवंत संस्थांचे अशासकीय प्रतिनिधी यांना या आगोदर अर्ज, करण्यासाठी २० डिसेंबर २०२४ रोजी प्रसिध्दी देण्यात आली होती. कमी प्रमाणात अर्ज आलेले असल्यामुळे नवीन अर्ज करणाऱ्यां उमेदवाराला परत एकदा संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यानुसार या आगोदर अर्ज करण्यात आलेल्या उमेदवाराला परत अर्ज करण्याची आवश्यकता नाही. सदर समितीवर अल्पसंख्यांकांसाठी काम करणाऱ्या ०३ नामवंत संस्थांचे अशासकीय प्रतिनिधी सदस्य असणार आहेत. त्यानुषंगाने अल्पसंख्याकांसाठी काम करणाऱ्या ०३ नामवंत स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांचे नामनिर्देशने शासनास सादर करण्याकरीता, १५.०४.२०१७ मध्ये दिलेल्या दिशानिर्देशास अनुसरुन आपले अर्ज / प्रस्ताव १४ ऑगस्ट २०२५ पर्यंत विहीत नमुन्यात सादर करण्याचे आवाहन जिल्हा नियोजन कार्यालय, बीड यांनी केले आहे.

इच्छुक उमेदवाराकडून सादर करण्यात येणाऱ्या अर्जात, प्रस्तावात पुढील बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे.नाव, पत्ता, जन्मतारीख, व्यवसाय, शिक्षण, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी. अल्पसंख्याकांसाठी काम करणाऱ्या नामवंत समाजसेवी संस्थाचे प्रतिनिधी असल्याचे प्रमाणपत्र. (संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या स्वाक्षरीने अधिकृत),अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी करण्यात आलेल्या सामाजिक कार्याची माहिती.जिल्हास्तरावर अल्पसंख्याक कल्याण समितीवर निवड झालेल्या स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींना,सदस्यांना कोणतेही मानधन व बैठक भत्ता देय होणार नाही,असे जिल्हा नियोजन अधिकारी तथा अल्पसंख्याक अधिकारी सुधाकर चिंचाणे यांनी कळविले आहे.

# प्रधानमंत्री पीक विमा योजनेस ३० ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ ऑगस्ट**

प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२५ मध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजना बीड जिल्हयांत राबविण्यात येत असून या योजनेत कर्जदार व बिगर कर्जदार शेतक-यांनी सहभाग घेण्याची अंतिम मुदत दिनांक ३१ जुलै, २०२५ अशी होती. बीड गत वर्षीच्या तुलनेत कमी सहभागी, शेतकऱ्यांकडे -griStack फार्मर आय डी नसणे, PMFBY पोर्टल सेवेतील व्यत्यय आधार (UID-I) व उडउ सर्व्हरवरील व्यत्यय राज्याच्या पोर्टलच्या तांत्रिक/सेवेतील व्यत्याय इत्यादीमुळे शेतकऱ्यांना योजनेत सहभागावर होणारा परिणाम लक्षात घेऊन केंद्र शासनाने दि. ०१ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या पत्रातील निर्देशानुसार योजनेत बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सहभागी होण्यासाठी १४ ऑगस्ट, २०२५ कर्जदार शेतकऱ्यांना ३० ऑगस्ट, २०२५ पर्यंत विशेष बाब म्हणून मुदतवाढीस मान्यता दिली आहे.

तरी जिल्ह्यातील विमा भरण्यापासून वंचित राहिलेल्या सर्व बिगर कर्जदार शेतकरी बांधवांनी तात्काळ आपल्या पिकाचा विमा १४ ऑगस्ट २०२५ पूर्वी आणि कर्जदार शेतकरी यांनी ३० ऑगस्ट २०२५ पूर्वी भरून घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी केले आहे.

# संस्कार भारती माजलगाव च्या वतीने ऋतू हिरवा कार्यक्रम उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.५ ऑगस्ट**

संस्कार भारती संयोजन समिती माजलगावच्या वतीने रविवार दि.३ ऑगस्ट २०२५ रोजी 'ऋतू हिरवा' या सुरेल संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात नटराज पूजन आणि संस्कार भारती च्या ध्येय गीताने करण्यात आली. यावेळी आवर्जून उपस्थित संस्कार भारती देवगिरी प्रांत अध्यक्ष श्रीमती स्नेहल पाठक, प्रांत मंत्री प्रमोद वझे, जिल्हा सदस्य श्रीराम देशपांडे या सर्वांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचे मनोगत झाले. नंतर मुख्य मैफिलीला सुरुवात झाली. यात श्रेया ठोंगे हिने राग मिया मल्हार ची बंदिश 'बरखा ऋतू झर लागी' गायली तसेच कुणाल कुलकर्णी यांनी 'गरज गरज आज मेघ ' ही याच रागातील बंदिश गायली. चैतन्य जाधव यांनी संसाराचा धंदा हे भक्तीगीत सादर केले. श्रेया ठोंगे हिने ऋतू हिरवा, केतकीच्या बनी तिथे, गा गीत तू सतारी असे बहारदार गाणे गायले. कुणाल कुलकर्णी यांनी मर्म बंधातली ठेव ही, शब्दावाचून कळले सारे, बाजे मुरलिया या गीतांचे सादरीकरण केले. तसेच रानकवी ना.धो.महानोर यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त त्यांना आदरांजली म्हणून त्यांनी लिहिलेले 'चिंब पावसानं रान झालं' हे गीत कुणाल आणि श्रेया यांनी गायले. या गीताला रसिक श्रोत्यांची भरभरून दाद मिळाली. तसेच शेवटी संगीत संयोजक संजय कुलकर्णी यांनी गावती रागातील एक भावगीत सादर केले. या कार्यक्रमासाठी गणेश विभुते, सुबोध देशपांडे, प्रवीण तिवारी यांनी अतिशय सुरेल अशी साथ संगत केली. तसेच कार्यक्रमासाठी प्रद्युम्न नवशिंदे ,कुणाल दुगड, मृदुला नवशिंदे, तसेच जोगडे काका, मंजुषा देशपांडे, संपदा विटेकर, शारदा ठोंगे, रत्नपारखी काका, या रसिक श्रोत्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता संस्कार भारती संयोजन समिती माजलगाव च्या सर्वच सदस्यांनी परिश्रम घेतले. अश्या प्रकारे संस्कार भारती माजलगाव चा ऋतू हिरवा हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.




# मानवलोक समाजकार्य महाविद्यालयात कृतज्ञता सोहळा व माजी विद्यार्थी मेळावा

## डॉ. रमा पांडे यांच्या सेवेचा गौरव; 'समाकार्य शिक्षणातील प्रेरणा आणि योगदान' पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.५ ऑगस्ट**

मानवलोक समाजकार्य महाविद्यालयाच्या २५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा गौरव करण्यासाठी आणि प्राध्यापिका डॉ. रमा पांडे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त कृतज्ञता सोहळा व माजी विद्यार्थी स्नेह मेळावा नुकताच उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

माजी विद्यार्थ्यांचा गौरव

या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते बाबुजी आणि भाभी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व वृक्षारोपण करून झाली. माजी विद्यार्थी संघाचे संचालक अजित कांकरिया यांनी महाविद्यालयाच्या २५ वर्षांच्या योगदानाचा आढावा घेतला. शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात काम करत असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे नाव देशपातळीवर पोहोचवल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या लेखांचे संपादन करून तयार करण्यात आलेल्या 'समाजकार्य शिक्षणातील प्रेरणा आणि योगदान' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.



सेवानिवृत्ती नाही, नव्या अध्यायाची सुरुवात

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक अनिकेत लोहिया यांनी महाविद्यालयातील प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. डॉ. रमा पांडे या सेवानिवृत्त होत नाहीत, तर त्यांच्यावर आणखी मोठी जबाबदारी सोपवली जाईल, असे त्यांनी सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश जाधव यांनी माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या विकासासाठी योगदान द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

सेवानिवृत्त होणाऱ्या डॉ. रमा पांडे यांना माजी विद्यार्थी संघ, विद्यार्थी, सहकारी आणि मानवलोक संस्थेकडून गौरवण्यात आले. यावेळी त्यांनी भावूक होत कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षण हे केवळ ज्ञान देण्याचे नसून, माणूस घडवण्याचे कार्य असल्याचे त्या म्हणाल्या.

अध्यक्षीय समारोपात चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी डॉ. पांडे यांच्या कर्तव्यनिष्ठा आणि शिस्तीची प्रशंसा केली. त्यांची सेवा ही मूल्यांची प्रक्रिया असून, ही सेवानिवृत्ती नसून नव्या अध्यायाची सुरुवात आहे, असे सांगत त्यांनी डॉ. पांडे यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाला ३५० हून अधिक आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी विद्यार्थी सुषमा तोडकर, प्रतिमा कांबळे, राहुल घेवारे व राखी भावठाणकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. हनुमंत साळुंके यांनी केले.

# जिल्हा परिषद निवडणुकांसाठी इच्छुकांची जोरदार फिल्डींग

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. ५ ऑगस्ट -**

परिसरात आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीचे जोरदार वारे वाहत आहेत. स्थानिक इस्लापूरसह शेजारील जलधारा, बोधडी जिल्हापरिषद गटात इच्छूक पुढाऱ्यांनी चांगलीच फिल्डींग लावली असून, तिन्ही गटाच्या आरक्षणाकडे इच्छूकांचे लक्ष लागले असतांनाच मागील अनेक निवडणूकीचा संदर्भ पाहता आपल्याच प्रवर्गाला आरक्षण या वेळेस शंभर टक्के सुटणार अशी गोड आशा मनात बाळगून पुढारी कामाला लागले असून जलधारा जि.प. गटातून शासकीय सेवा बजावून नूकतेच सेवानिवृत झालेले माजी अधिकारी प्रकाश टारफे हे इच्छूकाच्या यादीतील अग्रगण्य नाव म्हणून समोर आले आहे.

आगामी काळात होवू घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीचा बिगूल येत्या ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर मध्ये वाजण्याची दाट शक्यता वर्तविण्यात येत आहे. जिल्हा परिषद गट व पं.स. गण रचनेचा प्रारूप आराखडा १४ जुलैला जाहीर करण्यात आला.यावर प्रशासनाच्या वतीने हरकती आणी सुचना मागीतल्या होत्या. यासाठी २१ जुलै पर्यत अंतीम मुद्दत देण्यात आली होती.यावर आता ७ ऑगष्टला अंतिम सुनावणी होणार आहे. त्यानंत जिल्हापरिषद गटनिहाय आरक्षण सोडत जाहीर होईल. इस्लापूर, बोधडी, जलधारा या तिन्ही गटात पुर्वी सुटलेले आरक्षण यानंतर येणारी निवडणूक आपल्याच प्रवर्गाला आरक्षण सुटेल अशी आशा मनात बाळगून असलेले पुढारी निवडणूकीच्या तयारीला लागलेले आहेत. जलधारा जि.प. गटातून भाजपकडून माजी अधिकारी प्रकाश टारफे यांनी आतापासूनच जोरदार फिल्डींग लावली असल्याची चर्चा काही कार्यकर्त्यांच्या तोंडून ऐकावयास मिळत आहे टारफे हे पक्षातील वरिष्ठ नेत्याच्या भेटी गाठी घेत असल्याचे ऐकावयास मिळत आहे. गेल्या विधानसभा निवडणूकीत शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी अजित पवार गट, भाजप महायुतीत लढविलेल्या निवडणूकीत महायुतीचे उमेदवार आमदार भिमराव केराम हे मोठ्या मताधिक्याने इथे निवडून आले आहेत. किनवट, माहूर मतदारसंघात आमदार भिमराव केराम यांचा दांडगा जनसंपर्क आहे. त्यामुळे आगामी जिल्हापरिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीतही भाजपच्याच उमेदवाराला सुगीचे दिवस पहायला मिळतील अशी चर्चा या इस्लापूरसह बोधडी,जलधारा गटात होत असल्याचे ऐकावयास मिळत असून तर्तास इच्छूक पुढार्यांचे लक्ष आता जि.प. गटनिहाय जाती प्रवर्ग आरक्षणांकडे लागलेले आहे. त्यातच आमदार भीमराव केराम हे कार्यकर्त्याच्या भेटी गाठी घेत किनवट माहूर तालुका पिंजून काढत आहेत येणाऱ्या जि.प. व प.स निवडणुकीमध्ये भाजपा चे जास्तीत जास्त सदस्य निवडून कसे येतील याकडे आमदार केराम हे लक्ष्य देत आहेत.

# मेंडका येथे अण्णाभाऊ साठे जयंती व नवनियुक्त शासकीय कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ५ ऑगस्ट -**

मुदखेड तालुक्यातील मेंडका (भिमनगर) येथील सम्राट अशोक बुद्ध विहार येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. व तसेच नवनियुक्त शासकीय कर्मचाऱ्यांचा सन्मान व स्वागत समारंभ कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला होता.

महावितरण कंपनी, नांदेड परिमंडळ येथे विद्युत सहायक पदावर निवड झालेल्या गुंजन बालाजी जिदेवाड, आकाश कौरेबेनवाड, रामचंद्र भगवान शिंदे, सुमेध संतोष आनमवाड, साईनाथ विश्वनाथ आस्कुलकर,बालाजी माधव दासरे,या गुणवंतांचा विशेष सत्कार करण्यात आला.

इतर यशस्वी नियुक्त्या चंद्रकांत लक्ष्मण निखाते महाराष्ट्र सुरक्षा दल, दत्तप्रसाद नारायण निखाते व संतोष दत्ता निखाते मेस्को फोर्स,शितल शेषेराव निखाते अंगणवाडी सेविका,निखील गंगाधर ईजळकर पोस्टमन,

या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.व प्रमोद शेषेराव निखाते यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत यशाचे शिखर गाठले. स्नेहदीपाचा संघर्ष, जिद्द आणि यश येणाऱ्या पिढींसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.



या सर्व यशस्वी युवक-युवतींचा सत्कार भारतीय बौद्ध महासभा तालुका अध्यक्ष प्रशांत निखाते व प्रकाशपर्व न्यूजचे जिल्हा प्रतिनिधी प्रकाश गवारे यांच्या वतीने करण्यात आला. पामलवाड यांनी अण्णाभाऊ साठे यांचा आदर्श जीवनप्रवास उलगडून सांगितला. ते म्हणाले की, अण्णाभाऊ साठे हे महाराष्ट्रातील थोर लोकशाहीर होते. त्यांनी ३० हून अधिक कादंबऱ्या व १० नाटके लिहिली. त्यांच्या 'फकीरा' या कादंबरीला विशेष साहित्यिक सन्मान मिळाला असून, त्यांच्या साहित्यामध्ये शोषित आणि गरीब वर्गाचे वास्तव जीवन प्रभावीपणे मांडले आहे. गावाचा गौरव करताना प्रशांत निखाते म्हणाले, मेंडका गावाचे ४०० पेक्षा अधिक अधिकारी वेगवेगळ्या शासकीय पदांवर कार्यरत असून, हे गाव प्रेरणास्थान ठरत आहे.

यावेळी गंगाधर दासरे, उत्तम निखाते,बालाजी जंगीलवाड, इस्माईल शेख, गंगाधर निखाते,माधव निखाते, उत्कृष्ट कबड्डी खेळाडू नंदणी हरेंद्र निखाते, उपसरपंच नारायण निखाते,यासह भिमनगरमधील बौद्ध उपासक-उपासिका व इतर ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## शिवसेनेच्या वतीने शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी पदयात्रा

**हाणेगाव** -शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शिवसेना तालुका प्रमुख बालाजी पाटील इंगळे खुतमापुरकर यांच्या नेतृत्वाखाली



व शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांच्या आदेशानुसार दि.४ रोजी हाणेगाव ते देगलुर उपजिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत पदयात्रा काढण्यात आली. शेतकऱ्यांची संपुर्ण कर्जमाफी ,शेतकऱ्यांना वृद्धपकाळात मानधन मिळणे व निराधार मानधणात वाढ करणे,देगलुर ते हाणेगाव मानुर रस्त्याचे काम तातडीनं करावे,सोयाबीन पिकाला वाढीव दर मिळावा ,हाणेगाव येथे राष्ट्रीय बेंक शाखा सुरु करावे ,जलजीवन मिशन अंतर्गत कामे त्वरीत पुर्ण करावे,आदी मागण्या सरकारी दरबारी पोहचण्यासाठी पवित्र श्रावन महीण्याच्या दुसऱ्या सोमवारी टाळ व मृदंगाच्या गजरात हरहर महादेवच्या जयघोषात वरील मागण्या मागण्यांसाठी शेतकरी मजुरकार कष्टकरी शिवसेना उबाठा गट व मित्रपक्षाच्या सहकार्याने हाणेगाव येथील सिद्धेश्वर मंदीर पासुन पदयात्रेस सुरुवात करण्यात आली आणि बसस्टॉप येथे शिवसेना व मित्रपक्षाचे नेतेमंडळींनी या भाजप सरकाच्या धोरणावर आपला रोष व्यक्त करत विविध मागण्यांचा पाढा वाचला आणि शेतकऱ्यांच्या सन्मानात शिवसेना मैदानात जयघोषात भजन किर्तन करत देगलूरकडे यात्रा कुच केली श्रावन सोमवार निमीत्त वाटेतील करडखेड महादेव मंदीरात मुक्काम करुन दुसऱ्या दिवशी म्हणजे दि.५ रोजी देगलुर येथे पोहचुन उपजिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन वरील विवीध मागण्याचे निवेदन सादर करण्यात आले . यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, जिल्हा संपर्क प्रमुख दयाल गीरी,तालुकाप्रमुख बालाजी पाटील इंगळे, उपतालुका प्रमुख उत्तम अन्सापुरे, दिलीप ईनामदार, विवेक पडकंठवार, कांग्रेस पक्षाचे हज्जुसेठ चमकुडे, राष्ट्रवादी पक्षाचे अमोल देशमुख, डॉ. धुमाळे,दिलीप बंदखडके, सरपंच बालाजी चोपडे, पवन ईनामदार, भागवत पाटील, किशोर आडेकर,सुधाकर टोके आदीजन उपस्थित होते यावेळी अनुचीत प्रकार घडुनये म्हणुन मरखेल ठाण्याचे प्रमुख रविंद्र हुंडेकर, विलास पवार,दत्तात्रेय पाटील यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# शासनाच्या योजनांची माहिती आणि तक्रार निवारणासाठी नायगांव व उमरीत 'जनता दरबार'

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ५ ऑगस्ट -**

नायगांव आणि उमरी तालुक्यातील नागरिकांसाठी एक महत्त्वपूर्ण संधी आहे! ७ आणि ८ ऑगस्ट २०२५ रोजी, महसूल दिनाच्या निमित्ताने, आमदार राजेश पवार यांच्या उपस्थितीत 'जनता दरबार' आयोजित करण्यात आले आहे.यामध्ये नागरिकांना



राज्यशासनाच्या विविध योजनेची माहिती मिळवता येणार आहे .तसेच शासकीय कामकाजाशी संबंधित तक्रारींवर थेट चर्चा आणि समाधान मिळवता येईल.या पार्श्वभूमीवर मतदार संघाचे

आ. राजेश पवार यांच्या कार्यालयाकडून दिलेल्या माहितीनुसार, नागरिकांनी यावेळी आपली समस्या मांडून त्यासाठी त्वरित उपाय शोधावा.उमरीतालुका तहसील कार्यालयात गुरुवार,७ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत 'जनता दरबार' होईल. त्यानंतर शुक्रवार, दि.८ ऑगस्ट २०२५ रोजी नायगांव तहसील कार्यालयाच्या प्रांगणात सकाळी १० ते २ वाजेपर्यंत दुसरा 'जनता दरबार' आयोजित करण्यात आलेला आहे.

तालुक्यातील सर्व सामान्य नागरिकांनी या सुवर्ण संधीचा लाभ घेऊन आपले अडी अडचणी, समस्या आणि शासकीय योजनांचा फायदा घेण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन नायगांव मतदार संघाचे आमदार. राजेशपवार यांच्या कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# एसजीजीएस कॉलेज नांदेडचा विद्यार्थी सागर नाठे युपीएससी परीक्षेत देशातून सहावा

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ५ ऑगस्ट -**

एस.जी.जी.एस. अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी नांदेड या संस्थेतून स्थापत्य व जलव्यास्थापन अभियांत्रिकी ची २०१६ मध्ये पदवी प्राप्त केलेला विद्यार्थी सागर नाठे यांनी केंद्रीय लोकसेवा आयोग मार्फत (यूपीएससी.) घेण्यात आलेल्या वैज्ञानिक (सिव्हिल) गट 'अ' परिक्षेत देशात सहावा क्रमांक पटकावून एसजीजीएस संस्थेचे नावलौकिक केले आहे.



नांदेड विष्णुपुरी येथील एसजीजीएस संस्थेत स्थापत्य व जलव्यास्थापन अभियांत्रिकी ची २०१६ मध्ये पदवी प्राप्त केलेला सागर गजानन नाठे हा सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या मुंब्रा गावातील असून त्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उंबरा आणि पाचवी ते दहावी लोकमान्य विद्यालय उमरा येथे झाले. पुढील अभियांत्रिकी शिक्षणासाठी त्यांनी एस.जी.जी.एस. अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था विष्णुपुरी नांदेड या संस्थेची निवड केली व २०१६ मध्ये स्थापत्य व जलव्यास्थापन अभियांत्रिकी पदवी संपादन केली.करून सागर नाठेने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण करून आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षेत दैदिप्यमान यश मिळविले आहे या त्यांच्या यशाबद्दल संस्थेचे नियामक मंडळाचे अध्यक्ष सुनीलजी रायठठा, नियामक मंडळाचे इतर सदस्य, संचालक डॉ. मनेश कोकरे, संस्थेतील विद्यार्थी, विविध अधिष्ठाता, विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे कडून त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी नवीन शासकीय वसतीगृह मंजूर

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. ५ ऑगस्ट -**

हिमायतनगर येथे नव्याने येथे शासकीय वस्तीगृह मंजूर झाल्याची माहिती आमदार बाबूराव कदम कोहळीकर यांनी दिली आहे. हिमायतनगर येथे नवीन शासकीय वस्तीगृह मंजूर करण्यासाठी आ. कोहळीकर यांनी शासनाकडे पाठपुरावा केला होता. अखेर त्यांच्या प्रयत्नाना यश आले आहे. त्यामुळे हिमायतनगर येथे मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या निवास व शिक्षणाची सोय होणार आहे.

या निर्णयाबद्दल आ. कोहळीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांचे आभार मानले आहेत.

# अण्णाभाऊंच्या स्मृतींचा उजाळा नरसीत समाज एकवटला



**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ५ ऑगस्ट -**

लोकशाहीर, साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती नरसी (ता. नायगाव) येथे मोठ्या उत्साहात आणि सन्मानपूर्वक साजरी करण्यात आली. १ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता समाज मंदिर परिसरात ध्वजारोहणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. या वेळी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, संत रविदास आणि अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमासाठी अनेक मान्यवर उपस्थित होते. यामध्ये रामतीर्थ पोलीस ठाण्याचे अधिकारी विक्रम हराळे, ज्येष्ठ पत्रकार गोविंद नरसीकर, गंगाधर गंगासागरे, पोलीस पाटील इब्राहिम बेग पटेल, उपसरपंच अलीमपटेल, पोलीस उपनिरीक्षक परगेवार, ग्रामसेवक नागेश यरसनवार आदींचा समावेश होता.

या कार्यक्रमात अण्णाभाऊ साठे यांच्या प्रेरणादायी जीवनचरित्रावर प्रकाश टाकण्यात आला. सूत्रसंचालन पत्रकार मारोती सुर्यवंशी यांनी तर आभार प्रदर्शन देवीदास सुर्यवंशी यांनी केले.

यावेळी जुन्या गाव नरसी येथून मुख्य चौकापर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत महिलांची, युवकांची,लहान मुले ही उत्स्फूर्त उपस्थिती होती. अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस निरीक्षक विक्रम हराळे यांच्या नेतृत्वाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने गुरु रविदास मंदिर प्रेरणा केंद्रात विशेष अभिवादन कार्यक्रमही घेण्यात आला. रविदास जयंती मंडळाचे पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.

संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन सुरळीत पार पाडण्यासाठी मारोती सुर्यवंशी, देवीदास सुर्यवंशी,मनोहर सुर्यवंशी,दिनेश सूर्यवंशी, जळबा सूर्यवंशी, लालबा सूर्यवंशी, शिवाजी सूर्यवंशी, रमाकांत सूर्यवंशी, विजय सूर्यवंशी, अशोक सूर्यवंशी, सुभाष सूर्यवंशी आणि इतर कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत हृदय शस्त्रक्रियेसाठी १८ बालके मुंबईकडे रवाना

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ५ ऑगस्ट -**

श्री गुरु गोविंदसिंघजी स्मारक जिल्हा रुग्णालयातून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या मार्गदर्शनाखाली हृदयाचे आजार असलेल्या सदृश्य बालकांची २ डी इको तपासणी शिबिर १६ जुलै रोजी घेण्यात आले होते. या शिबिरामधून १८ हृदय शस्त्रक्रियेसाठी पात्र झालेल्या बालकांना राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत मुंबई येथे आज रवाना करण्यात आले.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ संजय पेरके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पांडुरंग पावडे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ राजाभाऊ बुट्टे यांच्या नेतृत्त्वाखाली या बालकांना तपासणी करण्यात आली होती. सदरील कार्यक्रमांतर्गत मागील वर्षीपासून १२५ बालकांच्या हृदय शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आलेल्या असून इतर आजाराच्या ६३४ शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत. एकूण ७६ बालकांना श्रावण यंत्र उपलब्ध करून देण्यात आलेले आल्याने त्यांचा बहिरेपणा दूर झाला आहे. यामुळे राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत तपासणी करण्यात आलेल्या शाळा, अंगणवाडी मधील बालकांची आरोग्य तपासणी होऊन त्यांना असलेल्या आजारापासून मुक्त करण्यासाठी वेळीच औषधोपचार आणि गरजेनुसार शस्त्रक्रिया केल्या जात असल्याने पालक व शिक्षक यांच्याद्वारे समाधान व्यक्त होत आहे.

याकामी अनिल कांबळे आरबीएसके जिल्हा कार्यक्रम समन्वयक, विठ्ठल तावडे डीइआयसी व्यवस्थापक अनिता चव्हाण आणि गुनानंद सावंत तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत असलेले वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी व डीइआयसी वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# माजी मंत्री मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**तभा वृतसेवा**
**लोहा ,दि. ५ ऑगस्ट -**

राज्याचे माजी मंत्री व समाजाचे प्रेरणास्थान सुधीर मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त लोहा शहरात आर्य वैश्य समाजाच्या वतीने वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा हा उपक्रम उपस्थित समाजबांधवांच्या सहभागातून यशस्वी पार पडला.

वृक्षारोपणाच्या माध्यमातून समाजाच्या सामाजिक बांधिलकीचा व पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने सकारात्मक संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन सुस्थितीत पार पडलं असून उपस्थितांनी सुधीरभाऊंना शुभेच्छा देत त्यांच्या प्रेरणादायी कार्याचा गौरव केला.

या कार्यक्रमाचे नेतृत्व आर्य वैश्य समाजाचे अध्यक्ष दिनेश तेललवार यांनी केले. यावेळी माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, बांधकाम समिती उपाध्यक्ष सूर्यकांत कोटगिरे, जिल्हा सदस्य नितीन कोंडावार, उद्योजक तुकाराम कोटलवार, प्रशांत पातेवार, बालाजी कोटगीरे, विजय कटकमवार, तसेच दिपक रूद्रवार, राम वट्टमवार, बंडू कटकमवार, नागेश दमकोंडवार, चंद्रकांत कोंडावार, स्वप्निल दमकोंडवार, विकास कोटलवार, अमोल मोटरवार, स्वप्निल कोटगिरे, मनोज महाजन, भुषण दमकोंडवार, अनिल वट्टमवार, पंकज कोटगिरे, कृष्ण रुद्रवार, हर्ष पोपशेटवार, ऋषिकेश तेललवार, गौरव दमकोंडवार, वैदांत कौडावार यांच्यासह मोठ्या संख्येने आर्य वैश्य समाजाचे सदस्य उपस्थित होते.

**टी सी हरवली**

माझी आशिष राजेश कदम या नावाची टी. सी. निवघा ते बाळापूर प्रवासा दरम्यान हरवली आहे. कुणास सपडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**संपर्क**
८००७७१९७३६

# जय किसान माध्यमिक विद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी



**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ५ ऑगस्ट -**

जय किसान माध्यमिक विद्यालय, कोल्हे बोरगाव येथे दि. ०१ ऑगस्ट २०२५ रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करून केली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक विजयकुमार होपळे ,पांचाळ साहेबराव, हासगुळे बळीराम, अतुल गोपछडे तसेच सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बळीराम हासगुळे यांनी केले.या कार्यक्रमात शाळेतील किशोर दर्पण या भित्तीपत्रकाच्या पाक्षिक अंकाचे प्रकाशन करण्यात आले. हा अंक इयत्ता ८वीच्या विद्यार्थ्यांनी तयार केला होता. संपादकीय मनोगत कु. संजीवनी बुद्धलवाड (इ.८वी) हिने सादर केले.गुणवत्ता विकास प्रकल्पांतर्गत जुलै २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या साप्ताहिक चाचणी परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ व पेन देऊन गौरविण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनचरित्रावर आपले विचार प्रभावीपणे मांडले. उत्कृष्ट भाषण सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण ठरला इयत्ता ५ वीचा विद्यार्थी मल्लिकार्जुन यादव आंबेराव याने साकारलेला लोकमान्य टिळक यांचा वेश. सूत्रसंचालन कु. गंगासागर परसनवाड (इ.९वी) हिने प्रभावीपणे पार पाडले. शेवटी मुख्याध्यापक विजयकुमार होपळे व अतुल गोपछडे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. आभार प्रदर्शन होरे अशोक यांनी केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लगडे काशिनाथ, सुवर्णकार गणेश, आगसे सुभाष,पाटील संतोष,रूपाताई देशमुख (गोपछडे),गोविंद मदेवाड, हणमंत उत्तरवाड व निळकंठ मुठनवाड यांनीप्रयत्न केले.

# बाऱ्हाळी येथे आचार्य बाळकृष्ण यांचा जन्मदिवस साजरा



**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. ५ ऑगस्ट -**

मुखेड तालुक्यातील बाऱ्हाळी येथे पतंजली योग भवन यांच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्र बाऱ्हाळी येथे आयुर्वेदाचार्य आचार्य बालकृष्ण यांचा जन्मदिवस आयुर्वेदिक वनस्पतीचे झाडे लावून व जडीबुटी वाटून साजरा करण्यात आला.

पतंजली योग भवन बाऱ्हाळी येथे नियमित निशुल्क योग घेतला जातो त्यांचाच एक उपक्रम घेण्यात आला.योग गुरु सौ संध्या मठदेवरु व सन्मुख मठदेवरु या परिवाराने बाऱ्हाळी परिसर व मुखेड तालुका योगमय करण्याचा संकल्प घेतला आहे.सौ संध्याताई मठदेवरु यांनी आयुर्वेदिक वनस्पती विषयी माहिती सांगितली

यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र बाऱ्हाळीचे वैद्यकीय अधिकारी डॉ.अमीत मस्कले , औषध निर्माण अधिकारी धनराज मोरे, अशोक पाटील, दत्तात्रय तिपणे, साईनाथ कोटगिरे, उत्तम वाडिकर. सतिष गोरशेटवार, कैलास महाजन, वैभव विजापुरे, बालाजी जाधव, सूर्यकांत पाटील, विनोद वाघमारे, गणेश रेणगुंटवार, सौ. छाया गोरशेटवार सौअल्का काशेटवार, सौ. ज्योती कोटापल्ले, सौ. मनीषा पवार, सौ. गंगासागर मुरमुरे आदि सह प्राथमिक आरोग्य केंद्र येथिल रुग्ण उपस्थित होते .